


सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

धाराशिव | रविवार, ५ जुलै २०२६ | वर्ष ४ थे अंक ११५ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



कार्यसिद्धीच्या दृष्टीने जनसंघटन हे राजकारण आणि राजकीय पक्षांपासून वेगळे आणि स्वतंत्र राहणे आवश्यक आहे. जनसंघटन राजकीय पक्षांचा भाग व्हावे, हे तत्त्व स्वीकारले तर देशात जितके राजकीय पक्ष आहेत, तितक्या संघटना प्रत्येक क्षेत्रात तयार होतील. ही बाब देशाच्या एकतेमध्ये अडथळा निर्माण करणारी आहे.

**स्व. दत्तोपंत ठेंगडी**

भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

## महत्त्वाचे

### बँक ऑफ बडोदाला लाखोंचा दंड

**मुंबई :** बँका, फायनान्स कंपन्या, हाऊसिंग फायनान्स कंपन्यांच्या कामकाजाचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून वेळोवेळी परीक्षण केले जाते. ज्या बँकांकडून बँकिंग संदर्भातील कायद्यांचे आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनांचे पालन केले जात नाही त्यांच्यावर विविध प्रकारे कारवाई केली जाते. रिझर्व्ह बँकेने ३० जून रोजी बँक ऑफ बडोदाला ६३.६० लाख रुपयांचा दंड केला आहे. बँक ऑफ बडोदाला केवायसी आणि फेअर प्रॅक्टिसेस कोड फॉर लेंडर्सच्या काही तरतुदींचे पालन न केल्यामुळे दंड करण्यात आला आहे.

# राज्यात मुसळधार

## मुंबईत धुमाकूळ

### हवामान विभागाकडून अतिवृष्टीचा इशारा, अनेक ठिकाणी शाळांना सुटी

### सखल भागातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी जाण्याच्या सूचना

मुंबई, ४ जुलै

आठवडाभरापूर्वी सक्रिय झालेल्या मान्सूनने दोन दिवसांपासून राज्यात मुसळधार बरसत आहे, तर मुंबईमध्ये धुमाकूळ घातला आहे. दोन दिवसांपासून मुंबई व उपनगरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक भागांत पाणी साचल्याने रस्त्यांना तलावाचे स्वरूप आले. हवामान विभागाने राज्यात तीन दिवस अतिवृष्टीचा इशारा दिल्याने अनेक ठिकाणी स्थानिक प्रशासनाने शाळांना सुटी जाहीर केली, तर सखल भागात राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित स्थळी जाण्याच्या सूचना दिल्या आहे.

हवामान विभागाने मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील सर्वच जिल्ह्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. राज्याच्या किनारपट्टीपासून ते कर्नाटक किनारपट्टीपर्यंत समुद्रसपाटीवर 'ऑफ-शोअर ट्रफ' अर्थात् कमी दाबाचा लांब पट्टा तयार झाला असून, तो संपूर्ण आठवडाभर कायम राहण्याची शक्यता आहे.

वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले असून, पुढील दोन दिवसांत ते आणखी तीव्र होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, ५ ते ७ जुलैदरम्यान पावसाची तीव्रता वाढणार आहे. राज्यातील बहुतांश जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट, ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला. शनिवारी विदर्भातील बहुतांश जिल्हे आणि मुंबई, पुणे, कोकण आणि मराठवाड्यात जोरदार पाऊस झाला. मुंबईत पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, पाणी साचल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले.



२४ तासापासून संततधार सुरू असलेल्या पावसामुळे मुंबईतील रस्त्यांना तलावाचे स्वरूप आल्याने वाहतूक विस्कळीत झाली असताना भरपावसात खाली रस्त्यावर मुलांनी क्रिकेट खेळण्याचा आनंद अनुभवला

**रस्ते, घरांमध्ये शिरले पाणी**

मुंबई, ठाणे, कल्याण, रायगड आणि पालघर या भागांमध्ये पावसाचा जोर कायम असून, सततच्या पावसामुळे अनेक भाग जलमय झाल्याने अनेक कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे वाहनांची वाहतूकही मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली. हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर स्थानिक प्रशासन सतर्क झाले असून, आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. मुंबईतील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली. मुंबईत अनेक रस्त्यांवरील वाहतूक बंद करण्यात आली आहे.

◂ (तभा वृत्तसेवा)

### घराबाहेर पडणे टाळावे : मुख्यमंत्री



हवामान विभागाकडून रविवारी आणि सोमवारी राज्यासाठी अतिवृष्टीचा इशारा दिला असून, नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, शासनाकडून लोकांच्या मोबाईलवर सतर्क राहण्याचा संदेश पाठवण्यात येत आहे. ६ तारखेपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज असल्याने संभाव्य अपघात टाळता यावेत, यासाठी लोकांनी प्रवास टाळावा, असे आवाहन करण्यात आले. ■

# हिंदू विचार जगाला शांततेच्या मार्गावर नेणारा

### भय्याजी जोशी यांचे प्रतिपादन

**पुणे, ४ जुलै**



संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात खळांची व्यंकटी जाण्याची मागणी केली आहे, शुभंकरोतिमध्येही शत्रुबुद्धी विनाशाय असे सांगितले आहे. त्यामुळे व्यक्ती नव्हे, तर व्यक्तीच्या मनातील दुष्ट प्रवृत्ती नष्ट व्हाव्यात हाच हिंदू विचार आहे. हा हिंदू विचार जगाला शांतता, न्याय आणि अहिंसेच्या मार्गावर घेऊन जाणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी यांनी केले.

केसरीवाडा येथील लोकमान्य सभागृहात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संघ शिक्षा वर्गाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून एचईएमआरएलचे समूह संचालक डॉ. हिमांशू शेखर, प्रांत संघचालक सुरेश तथा नाना जाधव, वर्गाचे सर्वाधिकारी दत्तात्रेय गर्गे, कसबा भाग संघचालक प्रशांत यादव उपस्थित होते.

भय्याजी जोशी म्हणाले की, डॉ. हेडगेवारांनी हिंदू समाजाला शक्तिशाली बनविण्यासाठी संघाची स्थापना केली आहे. जगात एकही मुस्लिम किंवा ख्रिश्चन नसता तरी संघ उभा राहिला असता. संघाचे कोणाशीही वैर नाही. इथल्या ऋषिमुनी आणि संतांनी दिलेला हिंदू विचार आपल्याला जगाला द्यायचा आहे. हे कार्य हिंदू समाजाने करायचे असल्यामुळे हिंदू समाज शक्तिशाली होणे आवश्यक आहे. संघ हिंदू समाजाला शक्तिशाली करण्यासाठी योगदान देत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. हिमांशू शेखर यांनी त्यांना संघाविषयी असलेली माहिती प्रसारमाध्यमे किंवा परिचितांकडून मिळालेली असल्याचे सांगत आज संघाचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी भारताला समजून घेणे ही सर्व भारतीयांसाठी अत्यंत आवश्यक बाब असल्याचे सांगत नव्या एनसीईआरटी अभ्यासक्रमामुळे भारताची नव्याने ओळख होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले. ◂ (तभा वृत्तसेवा)

### ...तरीही भारताचे चिरंतन अस्तित्व

श्री अरविंद यांनी भारताला 'मृत्युंजय भारत' म्हटले, तर विवेकानंदांनी 'वयम् अमृतस्य पुत्राः' हा विचार मांडला. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हिंदू विचाराचे वर्णन 'अनादी मी, अनंत मी, अवध्य मी' असे केले असून, ते हिंदू शब्दाच्या व्यापक आशयाशी संबंधित आहे. जगातील अनेक देश परकीय आक्रमणांमुळे नष्ट झाले, मात्र शेकडो आक्रमणे होऊनही भारत टिकून राहिला. भारताच्या या चिरंतन अस्तित्वामागील विचार 'मृत्युंजय भारत' आणि 'वयम् अमृतस्य पुत्राः' या संकल्पनांमध्ये दडलेला असल्याचे भय्याजी जोशी म्हणाले. ■

# संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून

**नवी दिल्ली, ४ जुलै**

संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून सुरू होत आहे. १३ ऑगस्टपर्यंत चालणारे यावेळचे अधिवेशन वादळी होण्याची शक्यता आहे.

सरकारे केलेल्या शिफारसींच्या आधारे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २० जुलैपासून संसदेचे अधिवेशन बोलवयाला मान्यता दिली. सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी या निर्णयांची समाजमाध्यमातून माहिती दिली. पावसाळी अधिवेशनात सरकार अनेक महत्त्वपूर्ण विधेयके सादर करण्याची शक्यता आहे.

आसाम आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या दणदणीत विजयानंतर प्रथमच संसदेचे अधिवेशन होत आहे. त्यामुळे भाजपा गोटात उत्साहाचे वातावरण आहे. केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला विजय मिळाला आहे. त्यामुळे काँग्रेसचेही मनोबल वाढले आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेस पक्षात तसेच शिवसेना उबाठा सांसदीय पक्षात पडलेल्या फुटीमुळे यावेळी लोकसभेतील समीकरणे बदलली आहेत.

राज्यसभेतही आप सांसदीय पक्षात फूट पडली आहे. आपच्या सहा खासदारांनी भाजपात प्रवेश केला आहे. यामुळे लोकसभेत तसेच राज्यसभेतही रालोआ खासदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

तामीळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर द्रमुक इंडिया आघाडीतून बाहेर पडला असून, त्याने सभागृहात आपल्या बसण्याची वेगळी व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

◂ (तभा वृत्तसेवा)




CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शाळांच्या वीजबिलांचा भार ग्रामनिधीतून व्हावा

## शिक्षक सहकार संघटनेचे सीईओंना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जुलै-**



जिल्ह्यातील प्राथमिक शाळांवर वाढत्या वीजबिलांचा आर्थिक ताण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतींच्या ग्रामनिधीतून वीजबिलांची नियमित भरपाई करण्याचा निर्णय प्रभावीपणे राबविण्यात यावा, अशी मागणी शिक्षक सहकार संघटनेने जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दरम्यान, शाळांच्या दैनंदिन खर्चाचा प्रश्न सुटून विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांना अधिक निधी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार प्राथमिक शाळांच्या देखभाल, दुरुस्ती तसेच आवश्यक सुविधा पुरविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर आहे. त्याच धर्तीवर शाळांची वीजबिलेही ग्रामनिधीतून अदा केल्यास शाळांच्या आर्थिक व्यवस्थापनाला मोठा आधार मिळेल, असे संघटनेचे म्हणणे आहे.

सध्या अनेक शाळांना वीजबिलासाठी उपलब्ध निधीतील मोठा हिस्सा खर्च करावा लागत असल्याने स्मार्ट टीव्ही, प्रोजेक्टर, संगणक, डिजिटल शिक्षण, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि इतर शैक्षणिक सुविधांवर परिणाम होत आहे. वीजबिलाची जबाबदारी ग्रामपंचायतींनी स्वीकारल्यास हा निधी थेट विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी वापरता येईल, असा दावा शिक्षक संघटनेने केला आहे.

यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा झाली असून, या प्रस्तावाबाबत आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्याबाबत आश्वासन मिळाल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास जिल्ह्यातील अनेक प्राथमिक शाळांना आर्थिक दिलासा मिळण्याबरोबरच शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम करण्यास मदत होणार आहे.

## महत्वाचे...



## सलगर येथे कारहुणवी सण उत्साहात

**सोलापूर, दि. ४ जुलै-**
अक्कलकोट तालुक्यातील मौजे सलगर येथे कारहुणवी सण साजरा करण्यात आला. यात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे मारुती देवळाभोवती बैलांच्या कारुणी गाड्या पळविण्यात आल्या. सलगर गावासह भीमपूर, चिक्केहळ्ळी, निंगदळी या आजूबाजूच्या गावातील बैलही या उत्सवात सहभागी झाले होते. यावेळी पंचक्रोशीतील तसेच पुण्या-मुंबईसह इतर शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, नगरसेवक व शिवसेना जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे उपस्थित होते. देवस्थानाकडून यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तर रात्री करमणुकीच्या कार्यक्रमात कन्नड नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. सणाचा उत्सव यशस्वी करण्यासाठी मारुती देवस्थानचे ट्रस्टी सातलिंग गुंडरगी, प्रवीण शटगार, अशोक पाटील, रेवणप्पा बोरगाव, सरपंच काशिनाथ कुंभार, उपसरपंच मिलिंद देशमुख, नागनाथ देशमुख, भीमशा समाणे, मल्लिनाथ भासगी, डॉ. घोडके, धसाडे, तोटप्पा बिराजदार आदींनी परिश्रम घेतले.



## शिवबा प्रतिष्ठानच्या श्री गणेशमूर्तीस चांदीचा मुकुट अर्पण

**बार्शी, दि. ४ जुलै-**
बार्शीतील गोंदिल प्लॉट परिसरातील शिवबा प्रतिष्ठानच्या श्री गणेशमूर्तीस जालिंदर (आप्पा) भोसले यांच्यावतीने एक किलो वजनाचा चांदीचा मुकुट अर्पण करण्यात आला. मुकुट अर्पणानंतर वैदिक मंत्रोच्चारात श्रींची विधीवत पूजा, आरती आणि मंगल धार्मिक विधी पार पडले. चांदीच्या मुकुटाने अलंकृत झालेल्या श्री गणरायाच्या मनोहारी रुपाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता. याप्रसंगी शिवबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष वैभव पवार, सचिव गणेश शिंदे, उपाध्यक्ष रमेश शिंदे, खजिनदार समाधान गोंदिल, सदस्य सुहास जाधव, दिपक मोरे, देवेंद्र गव्हाणे, दिपक देशमुख, हनुमंत शिदे, नितीन पवार, निलेश धस, दिनेश धस, ज्ञानेश्वर पवार, तुषार शेलार, अभिनव गव्हाणे, बापू साळुंखे उपस्थित होते.

## ए. जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये शिक्षक विकास कार्यक्रम

**सोलापूर, दि. ४ जुलै-**
शांती एज्युकेशन सोसायटी संचलित ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट, सोलापूरच्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागामार्फत तसेच द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया), सोलापूर लोकल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने इलेक्ट्रिक व्हेईकल टेक्नॉलॉजी या विषयावरील दोन दिवसीय शिक्षक विकास कार्यक्रम (Faculty Development Program) यशस्वीरित्या संपन्न झाला. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स (इंडिया), सोलापूर लोकल सेंटरचे चेअरमन डॉ. एस. बी. जोशी यांनी सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. त्यांनी तंत्रज्ञानातील सातत्याने होणारे बदल आत्मसात करण्यासाठी अशा शिक्षक विकास कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. पहिल्या दिवशी सेंटर ऑफ एक्सलन्स इन इलेक्ट्रिक व्हेईकलचे समन्वयक डॉ. प्रवीण जी. ढवळे यांनी Fundamentals of Electric Vehicle या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी इलेक्ट्रिक वाहनांची मूलभूत रचना, कार्यपद्धती, विविध प्रकारची इलेक्ट्रिक वाहने तसेच या क्षेत्रातील करिअरच्या संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर प्रा. पांडुरंग मोरे यांनी Battery Technology, Thermal Management Energy Storage Systems या विषयावर व्याख्यान दिले. दुसऱ्या दिवशी डॉ. एस. व्ही. खंडाळ यांनी Electric Vehicle Ecosystem या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या समारोप सत्रात गो ईव्ही चार्जिंग इन्फ्रा, पुणे येथील व्यवस्थापक विजय स्वामी यांनी EV Charging Technology Business Model या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष शिवानंद सिद्धेश्वर पाटील तसेच संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले व उपप्राचार्य एस. के. मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक जे. पी. पिंजार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. आर. एस. मोटगी यांनी आभार मानले.

## माळशिरसमधील आरोग्य शिबिराचा २ हजार रुग्णांनी घेतला लाभ

**माळशिरस, दि. ४ जुलै-**
माळशिरस येथील संतोष वाघमोडे सोशल फाउंडेशन सेवासदन मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल, मिरज हॉस्पिटल, ऑन क्लब हॉस्पिटल, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने नगरसेवक संतोष वाघमोडे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर झाले. दोन हजारपेक्षा अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवला. उद्घाटन माजी आमदार रामहरी रुपनवर यांच्या हस्ते व अकलूज येथील हृदयरोग तज्ञ डॉ. एम. के. इनामदार, डॉ. समीर बंडगर यांच्या उपस्थितीत झाले. शिबिरात चष्मे वाटप ६३७, डोळे तपासणी ७८५, कॅन्सर तपासणी ४८, इसीजी तपासणी २२८, जनरल तपासणी ११६, गुडघे व मणका तपासणी ७६ अशा तपासण्या झाल्या. मुख्याधिकारी सुमित जाधव, पोलीस निरीक्षक विकास दिंडोरे, जीवन जानकर, वैद्यकीय अधिकारी मयुरा सोनवलकर, काळे, माजी सरपंच संजीवनी पाटील, माणिक वाघमोडे, ॲड. मिलिंद कुलकर्णी, गौतम माने, नगराध्यक्ष रघुनाथ चव्हाण, बाळासाहेब सरगर, ॲड पी. ई. कुलकर्णी, ॲड. सोमनाथ वाघमोडे, विकास धाईंजे, विष्णुपंत नारनवर, ॲड. दादासाहेब कोळेकर, अमोल यादव आदी उपस्थित होते.

## पत्र्यावरून पडल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि. ४ जुलै-**
रामवाडी परिसरातील धोंडीबावस्ती येथे घराच्या पत्र्यावर चढून ताडपत्री टाकत असताना पाय घसरून खाली कोसळल्याने यल्लाप्पा भीमराव जगले (वय २८) हा तरुण जखमी झाला. ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## रेड्डे येथे लोखंडी बार लागल्याने जखमी

**सोलापूर, दि. ४ जुलै-**
व्यायाम शाळेत विनाकारण पाठीमागून ढकलून दिल्याने लोखंडी बार छातीस लागून हरिहर केरप्पा कांबळे (वय ५८ रा.रड्डे ता.मंगळवेढा) हे जखमी झाले. ही घटना शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यांना मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.



## आषाढी यात्रेनिमित्त सीपीआर व प्रथमोपचार प्रशिक्षण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**
आषाढी यात्रेदरम्यान चंद्रभागा नदीत स्नानासाठी येणाऱ्या लाखो वारकरी भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हृदय-फुफ्फुस पुनरुज्जीवन (सीपीआर) व प्रथमोपचार (फर्स्ट एड) विषयक एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सहयोगी संस्था इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा स्प्रिंट प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने डफरीन चौक येथील इंडियन रेड क्रॉस सोसायटी, सोलापूर शाखा संचलित श्रीमती गोपाबाई दमानी रक्तसंकलन केंद्रात हे प्रशिक्षण पार पडले.

प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक शंकर कांबळे आणि मुख्य अग्निशमन अधिकारी राकेश साळुंखे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर होते. व्यासपीठावर प्रा. डॉ. एन. बी. तेली, डॉ. राजीव प्रधान, वसंत पिचारे, अच्युत दुधाळ, अमरजा थिटे, सुगतरत्न गायकवाड, सुचेता कुलकर्णी आदी उपस्थित होते. सर्व प्रशिक्षणार्थींना इंडियन रेड क्रॉस सोसायटीतर्फे सीपीआर प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र प्रदान करून त्यांना प्रमाणित (सर्टिफाइड) करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले, सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले, तर आभार सुचेता कुलकर्णी यांनी मानले.

## शंकरराव निंबाळकर विद्यालयात निर्भया पथकाचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जुलै-**



शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात निर्भया पथक यांचे मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलिस निरीक्षक सनीला धनवे, निर्भया पथक बार्शी उपविभाग पोहेकॉ बाबासाहेब घाडगे, महिला पोहेकॉ उज्वला नाईकनिंबाळकर, महिला पोकॉ नम्रता गटकूळ, पोकॉ भाऊसाहेब महानोर हे होते तर अध्यक्ष म्हणून अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक गुंड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पूजन करुन झाली.

प्रास्ताविक प्रा. गायकवाड जे.पी. यांनी मांडले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांची ओळख प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी करून दिली. सुरुवातीला महिला पोहेकॉ उज्वला नाईकनिंबाळकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे पोहेकॉ बाबासाहेब घाडगे यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात निर्भया पथकाचा उद्देश्य व कार्य काय आहे याविषयी जाणीव जागृती याविषयी माहिती दिली.

आभार प्रा. एस. एन. शेटे यांनी मानले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. जे. पी. गायकवाड यांनी केले.



## विवेक वर्धिनी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पंढरपूर, दि. ४ जुलै-**
श्री दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ पंढरपूर संचलित विवेक वर्धिनी कनिष्ठ महाविद्यालयातील ३६ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या एमएचटी सीइटी २०२६च्या परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले. त्याबद्दल संस्था व प्रशालेच्या वतीने या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.मदन क्षीरसागर हे होते त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून यश म्हणजे त्यांच्या जिद्दीच्या आणि पालकांच्या संस्कारचे फळ असल्याचे सांगितले. यावेळी संस्थेचे खजिनदार सलीम वडगावकर यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य डॉ.यु.आर मुंढे यांनी यावर्षी मिळालेले हे नेत्रदीपक यश म्हणजे विवेक पॅटर्नच्या शिस्तबद्ध मार्गदर्शनाचे फलित असल्याचे सांगितले. प्रास्ताविक उपप्राचार्य ई.जी.शिंदे यांनी केले. कार्यक्रमासाठी विभाग प्रमुख व्हि.डी.चौगुले तसेच ज्युनिअर कॉलेजमधील सर्व शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन पी.पी.पाटील, आभार डी.एच.करचे यांनी मानले.

## मंगळवेढा न्यायालयात १८ जुलै रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. ४ जुलै-**
महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवेढा येथील दिवाणी न्यायालयात दि. १८ जुलै रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.इ या विशेष लोकअदालतीमध्ये भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा, १८८१ मधील कलम १३८ अन्वये दाखल प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत. धनादेश अनादर (उहशींिश ड्रींपलश) संबंधी प्रलंबित प्रकरणे तडजोडीच्या माध्यमातून निकाली काढण्याची संधी पक्षकारांना उपलब्ध होणार आहे. लोकअदालतीत तडजोडीने निकाली निघालेल्या प्रकरणांमुळे पक्षकारांचा वेळ, पैसा व श्रम यांची बचत होते. तसेच परस्पर संमतीने वाद मिटविण्याची प्रभावी संधी उपलब्ध होत असल्याने संबंधित पक्षकारांनी या विशेष लोकअदालतीचा लाभ घ्यावा तसेच भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा, १८८१ मधील कलम १३८ अंतर्गत प्रलंबित प्रकरणांतील फिर्यादी व आरोपी यांनी आपल्या वकिलांमार्फत अथवा थेट न्यायालयाशी संपर्क साधून लोकअदालतीत प्रकरण ठेवण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन न्या. वृषाली पाटील यांनी केले आहे.

## संस्कार, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच फॅबटेकचे ध्येय : भाऊसाहेब रूपनर

**सांगोला, दि. ४ जुलै-**
गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त आणि सामाजिक जाणीव असलेली पिढी घडविणे हेच फॅब्रटेक पब्लिक स्कूलचे ध्येय आहे. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकार करण्यासाठी चिकाटी, मेहनत आणि प्रामाणिकपणाची कास धरावी असे मत सांगोला फॅब्रटेक पब्लिक स्कूलचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांनी व्यक्त केले. ते स्कूलच्या १० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. आगामी काळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी संस्था अधिक जोमाने कार्य करणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी व्यासपीठावर इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.तानाजी बुरूंगले, स्कूलचे प्राचार्य सिकंदर पाटील, सुरेखा रुपनर, प्रा.सारिका रुपनर, कार्यालयीन अधिक्षक राजेंद्र पाटील, अमरजीत पुजारी, जावेद मुलाणी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्व.बिरासाहेब रूपनर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी डॉ.संगिता स्वामी, डॉ.शितल घोंगडे, सिकंदर पाटील, डॉ.रविंद्र शेंडगे, डॉ.विद्याराणी क्षीरसागर, प्रा.तानाजी बुरूंगले, डॉ.संजय आदाटे, प्रा.सारिका रूपनर यांनी मनोगतात वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेश्मा तोडकर यांनी केले. आभार अनिता शिनगारे यांनी मानले.

## मंगळवारपासून हजरत सय्यद दातापीर शाह कादरी शरीफ दर्गाहचा ऊर्स



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ जुलै-**
अक्कलकोट येथील सोलापूर रोड आस्ताना -ए-हजरत सय्यद दातापीर शाह कादरी रह.अक्कलकोट शरीफ दर्गाहचा ८१ वा ऊर्स ७ जुलै २०२६ मंगळवार पासून प्रारंभ होत असून तीन दिवस चालणाऱ्या या ऊर्स निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत अशी माहिती दर्गाचे आजम सय्यद शाह दातापीर शाह कादरी किबला सज्जादा नशीन व हजरत सय्यद शाह मस्तुर शाह कादरी यांनी दिली.

दर्शनासाठी व प्रसाद घेण्यासाठी भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन दर्गा प्रमुख हजरत सय्यद शहा दाता पीर गुलाम आलमनवाज शहा कादरी किबला यांनी केले.

अक्कलकोट शहर व तालुक्याचे सर्वधर्मस्वभावाचे व जातीय सलोख्याचे मोठे प्रतीक असलेले दातापीर दर्गाच्या उर्स निमित्त ७ जुलै मंगळवार रोजी गंध (संदल), ८ जुलै बुधवार रोजी चिराग ( दिपोत्सव व ऊर्स) व ९ जुलै गुरूवार रोजी जियारत (प्रसाद)असे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ऊर्सच्या तिन्ही दिवशी दिवसभर महाप्रसादाचा (लंगर) आयोजन दर्ग्याच्या वतीने करण्यात येणार आहे. दिनांक ७,८,९ या तीन दिवस चालणाऱ्या ऊर्स व भजन,कवाली, नात, धार्मिक कार्यक्रमांमध्ये आणि तिन्ही दिवस चालणाऱ्या प्रसादाचा जास्तीत जास्त भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान दर्गाचे प्रमुख हजरत दाता पीर शाह कादरी यांनी केले आहे.

यावेळी हजरत सय्यदशाह दातापीर शाह कादरी, किबला, हजरत सय्यदशाह मस्तुरशाह कादरी किबला, हुसेन बळोरगी, नगरसेवक सद्दाम शेरीकर, रजाक सय्यद, सत्तार बळोरगी, सैपनखान चोपदार,फारूक बबर्ची, मूर्तूज बाजे, सोहैल फरास, रफिक पठाण, दाता बळोरगी, आलम कोरबु, जाकीर दरेखा, मुर्तूज बाजे, तौफिक शेख, हाजी महिबूब मुल्ला, दस्तगीर शेख उपस्थित होते.



## वाव संघटनेच्या वतीने १५६ महिलांना मोफत गॅस कनेक्शनचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**
केंद्र सरकारच्या महिलांचा सन्मान योजनेअंतर्गत इंडेन गॅसच्या प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजनेमधून वाव संघटनेच्या वतीने १५६ महिलांना मोफत गॅस कनेक्शनचे आज वितरण करण्यात आले. यामध्ये एक भरलेला सिलेंडर, एक शेगडी, एक रेग्युलेटर व एक रबर ट्यूबचे वाटप करण्यात आले.

कुमठा नाका येथील प्रेषक इंडियन गॅस एजन्सीच्या प्रांगणात भाजपाच्या शहर अध्यक्षा नगरसेविका रोहिणी तडवळकर यांच्या हस्ते सर्व लाभार्थी महिलांना मोफत गॅस टाकी व शेगडीसह गॅस कनेक्शनचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये नगरसेवक शिवाजीराव वाघमोडे, नगरसेवक सात्विक बडवे, नगरसेविका वैदाबानो भंडाले, सभापती व नगरसेवक दत्तात्रय बडगू, नगरसेविका आश्विनी चव्हान, नगरसेवक आनंददादा भवर, माजी नगरसेविका लता फुटाणे, नगरसेवक व्यंकटेश कोंडे, शिवानंद कावडे, ऋतुजा आंदेली, अफरीन पटेल, नगरसेवक अर्जुन जाधव, नगरसेविका नडगिरी, यशोदा सोनवणे, किसन गरजे, जगन्नाथ चवान, नवले, लक्ष्मण सातपूते, सिद्धेश्वर रूपनर, सी.ए. बिराजदार उपस्थित होते. प्रारंभी गॅस एजन्सीच्या प्रवर्तक विद्या लोलगे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजनेबाबत माहिती दिली. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा सत्कार व्यवस्थापक शिवाजी थीटे व कुमार नक्का यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच गॅस एजन्सीतर्फे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नम्रता जाधव, अर्चना अवर, अबू काझी आदींनी परिश्रम घेतल्यामुळे त्यांचाही गौरव करण्यात आला. तसेच अमित कुलकर्णी, अभिजीत राजपूत, किरण राजपूत व श्रीपाद परलेकांडा यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

> यंदा प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजनेअंतर्गत इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत प्रेषक इंडियन गॅस एजन्सीला ७८४ मोफत गॅस कनेक्शनचा कोटा मंजूर झाला असून, इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्याला मिळालेला हा सर्वाधिक व विक्रमी कोटा आहे.
>
> **- विद्या लोलगे**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# ‘बीएलए’च्या हल्ल्यात 32 सैनिक ठार

## ग्वादरमधील जिवानी भागातील घटना, कोस्ट गार्डच्या छावणीत घुसवला स्फोटकांनी भरलेला ट्रक, ५० जवान जखमी


पाकिस्तान कोस्ट गार्डच्या छावणीत झालेल्या स्फोटानंतर संपूर्ण परिसर उद्ध्वस्त झाला


पाकिस्तान कोस्ट गार्डच्या छावणीत झालेल्या स्फोटानंतर संपूर्ण परिसर उद्ध्वस्त झाला

**क्वेटा, ४ जुलै**

पाकिस्तानी लष्कराकडून बलुचिस्तानात सुरू असलेल्या दडपशाहीला प्रत्युत्तर देत बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) मोठा रक्तपात घडवून आणला. ग्वादरमधील जिवानी भागातील पनवान येथे असलेल्या पाकिस्तान कोस्ट गार्डच्या छावणीत स्फोटकांनी भरलेला ट्रक घुसवण्यात आला. भीषण आत्मघाती हल्ल्यात तैनात असलेल्या ३२ पाकिस्तानी सैनिकांच्या अक्षरशः चिंधड्या झाल्या. या हल्ल्यात छावणी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून, ५० पेक्षा अधिक जवान जखमी आहे.

हल्ल्याच्या काही तासांतच बीएलने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारत बलुच नागरिकांवर सुरू असलेल्या अत्याचाराचा सूड घेतल्याचे त्यांनी म्हटले आहे. बीएलएच्या विशेष मजीद ब्रिगेडच्या एका सदस्याने स्फोटकाने भरलेला ट्रक कोस्ट गार्डच्या छावणीत घुसवला. यावेळी शंभरहून अधिक पाकिस्तानी सैनिक तेथे सुरक्षेसाठी तैनात होते. स्फोटाच्या आवाजाने संपूर्ण परिसर दणाणला आणि त्यानंतर आग लागली. यात छावणीत तैनात असलेले ३२ सैनिक ठार झाले. बीएलएच्या प्रवक्त्याने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, रात्री ११ वाजताच्या सुमारात अताउल्लाह बलुच ऊर्फ अजमल नावाच्या आत्मघाती सदस्याने स्फोटकांनी भरलेला ट्रक कोस्ट गार्डच्या छावणीत घुसवला आणि काही सेकंदांतच संपूर्ण परिसरात प्रचंड मोठा स्फोट झाला. पाकिस्तानी लष्कराने तत्काळ बलुचिस्तान खाली करावा अन्यथा त्यांना मृत्युशिवाय पर्याय राहणार नाही.

**स्वातंत्र्य मिळेपर्यंत मोहीम सुरूच**

बीएलएने दिलेल्या माहितीनुसार, बॉम्बस्फोटानंतर त्यांच्या ‘फतेह स्क्वाड’ या रणनीतिक तुकडीने छावणी उद्ध्वस्त झाल्यानंतर आत घुसून जिवंत राहिलेल्या पाकिस्तानी सैनिकांवर गोळीबार केला. दोन्ही बाजूंमध्ये समोरासोर धुमश्चक्री उडाली, ज्यामध्ये अनेक पाकिस्तानी जवान मारले गेले आणि जखमी झाले. पाकिस्तानला बीएलएने इशारा दिला की, जोपर्यंत बलूचिस्तानच्या संपूर्ण स्वातंत्र्याचे आमचे अंतिम ध्येय साध्य होत नाही, तोपर्यंत पाकिस्तानी सुरक्षा दलांना लक्ष्य करणारी आमची ही सशस्त्र मोहीम सुरूच राहील.

◀ (वृत्तसंस्था)

### हिंमत असल्यास मुनीरने बलुचिस्तानात यावे

**बीएलएचा प्रवक्ते जियांद बलुच यांनी म्हटले की, शक्तिशाली स्फोटामुळे पाकिस्तान कोस्ट गार्डची लष्करी छावणी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून, तिचे रूपांतर केवळ ढिगाऱ्यात झाले आहे. बलुच नागरिकांचा छळ करणाऱ्या पाकिस्तानी लष्कर आमचे लक्ष्य आहे आणि या भागात धुडगूस घालणारे जिवंत जाणार नाहीत याची आम्ही काळजी घेऊ. लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्यात हिंमत असल्यास बलुचिस्तानात येऊन दाखवावे. त्यांचा अन्त्यसंस्कार करण्यासाठी मृतदेह देखील पाकिस्तानी सरकारला मिळणार नाही.**

### थरकाप उडवणारी चित्रफीत जारी

**‘बीएलए’ची मीडिया विंग असलेल्या ‘हक्कल’ने या हल्ल्याची ४३ सेकंदांची चित्रफीत जारी केली. यामध्ये स्फोटकांनी भरलेला ट्रक छावणीच्या परिसरात घुसताना आणि त्यानंतर काहीच क्षणात तिथे झालेला महाभयंकर स्फोट दिसत आहे. लष्करी इमारतीचा एक मोठा भाग पूर्णपणे जमीनदोस्त झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. आत्मघाती स्फोट घडवूनच बलूच लढवय्ये थांबले नाहीत, तर त्यानंतर त्यांनी थेट छावणीत घुसून हल्ला केला.**

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जीवे मारण्याची धमकी

## फेसबुकवर पोस्ट; उच्चस्तरीय चौकशी सुरु



**नवी दिल्ली, ४ जुलै**

पुढील आठवड्यात ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. ९ जुलैला मेलबर्नमध्ये होणाऱ्या ‘मेलबर्न मीट्स मोदी’ कार्यक्रमाशी संबंधित एका फेसबुक पोस्टच्या कॉमेंट सेक्शनमध्ये ही कथित धमकी देण्यात आली, अशी माहिती मेलबर्न पोलिसांनी दिली.

ही पोस्ट ३ जुलैला समोर आली. ही कॉमेंट अबू मुस्तफा नावाच्या अकाऊंटवरून करण्यात आली होती. त्यानंतर ऑस्ट्रेलियन फेडरल पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली. ऑस्ट्रेलियन यंत्रणा सध्या या प्रकरणाचा तपास करीत आहेत. त्यांनी या अकाऊंटशी संबंधित आयपी ॲड्रेस शोधल्याचे वृत्त आहे. तथापि, या प्रकरणावर भाष्य करण्यास ऑस्ट्रेलियन फेडरल पोलिसांनी नकार दिला.

नरेंद्र मोदींच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी समोर आलेल्या या कथित धमकीची सुरक्षा यंत्रणांनी गांभीर्याने दखल घेतली आहे.

पंतप्रधान द्विपक्षीय बैठकांव्यतिरिक्त मेलबर्नमधील भारतीय समुदायाच्या एका कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे, नरेंद्र मोदींच्या प्रस्तावित दौऱ्यादरम्यान कडक सुरक्षा व्यवस्था असेल. यामध्ये ऑस्ट्रेलियन फेडरल पोलिस, राज्य पोलिस आणि विशेष सुरक्षा पथकांमध्ये समन्वय साधला जाईल. ऑस्ट्रेलियातील परदेशी राष्ट्रप्रमुख किंवा सरकारप्रमुखांना असलेल्या धमक्यांना सामान्यतः उच्च प्राधान्य दिले जाते.

◀ (वृत्तसंस्था)

### उद्यापासून तीन देशांच्या दौऱ्यावर

पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारपासून इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या सहा दिवसीय दौऱ्यावर आहे. आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील संबंध अधिक मजबूत करणे दौऱ्याचा उद्देश असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनातून दिली आहे. मोदी यांचा दौरा ६ जुलैपासून सुरू होऊन ११ जुलै रोजी न्यूझीलंडमध्ये संपणार आहे. मॉरिशस, सेशेल्स आणि नुकताच जपानच्या पंतप्रधान सानाए ताकाईची यांच्या दिल्ली दौऱ्यानंतर, आता भारताचे लक्ष प्रामुख्याने हिंदी महासागराच्या पूर्व सागरी क्षेत्रावर आणि ‘ॲक्ट ईस्ट’ धोरणावर केंद्रित आहे. ‘ॲक्ट ईस्ट’ हे भारत सरकारचे एक प्रमुख परराष्ट्र धोरण आहे. आशिया-प्रशांत आणि हिंद-प्रशांत क्षेत्रातील देशांशी भारताचे आर्थिक, धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करणे हे दौऱ्याचे उद्दिष्ट आहे. पंतप्रधानांच्या दौऱ्याची सुरुवात इंडोनेशियातून होईल. जकार्तामधील मुख्य बैठकांव्यतिरिक्त ते योग्याकर्ता येथील ऐतिहासिक प्रबंधन मंदिर संकुलाला भेट देतील. त्यानंतर ८ जुलै रोजी ऑस्ट्रेलियात पोहोचतील. तिथे ते तिसऱ्या भारत-ऑस्ट्रेलिया वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील.

## चित्रपट वार्ता

### मोआनाचा लाइव्ह ॲक्शन अवतार भारतात प्रदर्शित

**मुंबई :** डिस्नेची सर्वांत लोकप्रिय आणि प्रेरणादायी नायिकांपैकी एक असलेली मोआना आता लाइव्ह-ॲक्शन रूपात प्रेक्षकांसमोर येणार आहे. ही चित्रपट आवृत्ती १० जुलै रोजी भारतातील चित्रपटगृहांमध्ये इंग्रजी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणार असून, या वर्षातील सर्वांत मोठ्या लाइव्ह-ॲक्शन चित्रपटांपैकी एक म्हणून याकडे पाहिले जात आहे. मोआना पुन्हा एकदा



तिच्या लाडक्या सहकारी माऊईसोबत मोठ्या पडद्यावर परतत असून, काही आठवड्यांपूर्वीच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. लहानपणी एका असहाय्य कासवाच्या पिल्लाचे रक्षण करून त्याला सुरक्षितपणे समुद्रापर्यंत पोहोचवणारी मोआना, पुढे आपल्या बेटाचे आणि समुद्राचे संरक्षण करण्यासाठी अनेक संघर्षांना सामोरे जाते. तिच्या या प्रवासातून ती खंबीरपणे पुढे जात राहते आणि संकटांमध्येही हार न मानण्याची शिकवण देते. ट्रेलरमध्येही तिचा अढळ निर्धार ठळकपणे दिसून येतो, जिथे ती आपल्या बेटाचे आणि समुद्राचे रक्षण करण्यासाठी निर्भीडपणे पुढे सरसावते. अनिश्चिततेच्या काळातही सुरक्षिततेपेक्षा धैर्याची निवड करण्याचा तिचा निर्णयच तिला वर्षानुवर्षे तरुण प्रेक्षकांसाठी प्रेरणेचा स्रोत बनवत आला आहे.

### गौरव मोरेची हिंदी ओटीटीमध्ये दमदार एन्ट्री



**मुंबई :** ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ या लोकप्रिय कार्यक्रमातून घराघरात पोहोचलेला अभिनेता गौरव मोरे आता हिंदी ओटीटी विश्वात पदार्पण करण्यासाठी सज्ज झाला आहे. आपल्या आगळ्यावेगळ्या विनोदशैली आणि प्रभावी अभिनयाच्या जोरावर मराठी मनोरंजनसृष्टीत स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या गौरवला आता दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांच्या निर्मितीतील वेबमालिकेत महत्त्वाची भूमिका साकारण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे त्याच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिग्दर्शक अविनाश अरुण यांच्या ‘प्रीतम ॲण्ड पेड्रो’ या वेबसीरिजचा ३ जुलै रोजी जिओ हॉटस्टारवर प्रीमियर झाला. या मालिकेची निर्मिती राजकुमार हिरानी यांनी केली असून, त्यांचा मुलगा वीर हिरानी याच वेबमालिकेच्या माध्यमातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करीत आहे.

### आली रे आली मराठी सिनेमाची वेळ आली!

**मुंबई :** मराठी, हिंदी आणि हॉलिवूडमधील मोठ्या चित्रपटांच्या तगड्या स्पर्धेतही ‘घबाडकुंड’ने बॉक्स ऑफिसवर उल्लेखनीय



कामगिरी करीत प्रेक्षकांची पसंती मिळवली आहे. रहस्य, थरार आणि भय यांचा अनोखा संगम असलेल्या या चित्रपटाने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवसापासून प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यात यश मिळवले आहे. दुसऱ्या आठवड्याच्या अखेरीस या चित्रपटाने ८.१० कोटी रुपयांची कमाई नोंदवली असून, तिसऱ्या आठवड्यातही त्याची यशस्वी घोडदौड कायम असल्याचे चित्र आहे. ‘राजा शिवाजी’, ‘तुंबाडची मंजुळा’ आणि ‘देऊळ बंद’ या मराठी चित्रपटांसह हिंदी व हॉलिवूडमधील अनेक बिग बजेट चित्रपट सध्या प्रदर्शित असतानाही ‘घबाडकुंड’ने आपल्या वेगळ्या आशयामुळे आणि प्रभावी मांडणीच्या जोरावर स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. राज्यातील अनेक चित्रपटगृहांमध्ये या चित्रपटाचे हाऊसफुल शो सुरू असून, प्रेक्षकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद कायम असल्याचे दिसून येत आहे.

# भारतीय औषधनिर्माण क्षेत्रासाठी बाजारपेठ खुली करावी

## चिनी गुंतवणूक व्यापक संबंध दृढ करेल: दोराईस्वामी

**बीजिंग, ४ जुलै**

चीनने भारतीय उत्पादनांसाठी विशेषतः औषधनिर्माण क्षेत्रासाठी आपली बाजारपेठ खुली करावी आणि त्यासोबतच नवी दिल्लीतील गुंतवणूक हे दोन्ही देशांमधील व्यापक संबंधांसाठी योग्य ठरेल, असे मत भारतीय राजदूत विक्रम दोराईस्वामी यांनी शनिवारी व्यक्त केले. अर्थातच, आम्हाला चीनला अधिक निर्यात करायला आवडेल. विशेषतः औषधनिर्माण क्षेत्रासारख्या ज्या क्षेत्रांमध्ये आम्हाला स्पर्धात्मक फायदा आहे, असे सुचवण्यात काहीही अवास्तव नाही, असेही ते म्हणाले.

चीनच्या त्सिंगहुआ विद्यापीठाने येथे आयोजित जागतिक शांतता मंचावरील ‘संरक्षणवाद आणि जागतिक आर्थिक प्रशासन’ या विषयावरील पॅनेल चर्चेदरम्यान राजदूत दोराईस्वमी यांनी हे विधान केले. भारत-चीन व्यापार आणि गुंतवणूक संबंधांवर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, आम्ही प्रगत बाजारपेठांमध्ये औषधनिर्माण क्षेत्रातील जगातील सर्वात मोठ्या निर्यातदारांपैकी एक आहोत.

**व्यापार, वाणिज्य हे भारत-चीन संबंधांचा महत्त्वाचा घटक**

२०२५-२६ मध्ये चीनने अमेरिकेला मागे टाकून भारताचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार म्हणून स्थान मिळवले असून, द्विपक्षीय व्यापार १५१.१ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे. तथापि, भारतीय वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार याच कालावधीत बीजिंगसोबतची देशाची व्यापारी तूट ११२.१६ अब्ज डॉलर्सच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचली आहे. गत आर्थिक वर्षात भारताची चीनला होणारी निर्यात ३६.६६ टक्क्यांनी वाढून १९.४७ अब्ज डॉलर्स झाली, तर आयात १६ टक्क्यांनी वाढून १३१.६३ अब्ज डॉलर्स झाली. २०२४-२५ मधील ९९.२ अब्ज डॉलर्सच्या तुलनेत २०२५-२६ मध्ये व्यापारी तूट वाढून ११२.६ अब्ज डॉलर्सच्या विक्रमी उच्चांकावर पोहोचली.

**जेनेरिक औषधांची निर्यात चिनी बाजारपेठेतही शक्य**

दोराईस्वामी पुढे म्हणाले, चीनने आपली माहिती तंत्रज्ञान, औषधनिर्माण आणि कृषी क्षेत्रे खुली करावीत, अशी भारताची बऱ्याच काळापासून मागणी आहे. कारण ही त्या देशाची बलस्थाने आहेत. व्यापार संबंध अधिक दृढ करण्याच्या उपक्रमांवर चर्चा करण्यासाठी दोराईस्वामी यांनी अलिकडेच चीनच्या वाणिज्य मंत्रालयाच्या आशियाई व्यवहार विभागाचे महासंचालक वांग लिपिंग यांच्याशी चर्चा केली. अमेरिकेत आणि इतर ठिकाणी निर्यात होणारी उच्च-गुणवत्तेची जेनेरिक औषधे तयार करणाऱ्या कंपन्यांची निर्यात चिनी बाजारपेठेतही करता यावी, हे सुनिश्चित करण्यासाठी चिनी भागीदार भारतासोबत काम करतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

◀ (वृत्तसंस्था)

# चीनच्या दडपशाहीला कंटाळून तिबेटी नागरिकाचे आत्मदहन

## संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयासमोर स्वतःला पेटवले, न्यायासाठी टोकाचे पाऊल

**न्यू यॉर्क, ४ जुलै**

तिबेटच्या स्वातंत्र्याची मागणी करीत येथील संयुक्त राष्ट्र मुख्यालयाबाहेर तिबेटमधील एका आंदोलनकर्त्याने स्वतःला पेटवून घेतले. तिबेटी संघटनांनी या घटनेचा संबंध चिनी धोरणांविरोधातील आंदोलनांशी जोडला आहे. चीनच्या दडपशाहीला कंटाळून त्याने टोकाचे पाऊल उचलले. तिबेटला चीनपासून मुक्त करण्याचे नारे देताना त्याने स्वतःवर ज्वलनशील पदार्थ ओतले.



संयुक्त राष्ट्र मुख्यालयासमोर तिबेटी ध्वज हातात घेऊन तिबेटी कार्यकर्ते ५२ वर्षीय लोग्बा रंगझेन काही दिवसांपासून आंदोलन करीत होते. आंदोलनाची दखल न घेतल्याने त्यांनी शुक्रवारी स्वतःला पेटवून घेतले. तिबेटी लोकांसाठी काम करणाऱ्या ‘व्हॉइस ऑफ तिबेट’ या संस्थेने निवेदनात म्हटले की, रंगझेन यांनी पेटवून घेतल्यानंतर त्यांना तत्काळ रुग्णालयात हलवले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. चिनी सरकारने लादलेल्या निर्बंधांमुळे रंगजेन खूप संतप्त होते. तिबेटला चीनपासून मुक्त करावे या मागणीसाठी संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयाबाहेर आंदोलन सुरू केले होते. मात्र, आंदोलनाची दखल न घेतल्याने त्यांनी टोकाचे पाऊल उचलले.

**तिबेटवरील नियंत्रण वाढवले**

आंतरराष्ट्रीय मानवाधिकार गट आणि निर्वासितांनी तिबेटी प्रदेशांमधील चीनच्या दडपशाही राजवटीचा वारंवार निषेध केला आहे. चीनमध्ये वांशिक अल्पसंख्याकांशी संबंधित मुद्दे अत्यंत संवेदनशील आहेत. तिबेटी आणि इतर अल्पसंख्याकांवर कथित फुटीरतावादाच्या कोणत्याही चिन्हासाठी बारकाईने लक्ष ठेवले जाते. २०१२ मध्ये शी जिनपिंग राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून चीनने तिबेटवरील आपले संस्थात्मक नियंत्रण आणखी वाढवले आहे.

◀ (वृत्तसंस्था)

### नवीन वांशिक ऐक्य कायद्याचा निषेध

चीनने नुकताच वांशिक ऐक्य कायदा लागू केला. अमेरिका आणि युरोपियन युनियनने या कायद्यावर आक्षेप घेतला आहे. वादग्रस्त कायद्यामुळे चीनला सीमेबाहेरील लोकांविरुद्ध कारवाई करण्याचा कायदेशीर अधिकार मिळते. हा कायदा देशातील ५५ वांशिक अल्पसंख्याक गटांमध्ये (ज्यात तिबेटी आणि उइघुर यांचा समावेश आहे. एक समान राष्ट्रीय ओळख निर्माण करतो. जगभरातील तिबेटी लोकांनी याचा निषेध करीत निदर्शने सुरू केली आहे.

# मॉलमध्ये गोळीबार, पाच जण ठार

**वॉशिंग्टन, ४ जुलै**

अमेरिकेतील मिशिगन राज्यातील डियरबॉर्न येथील फेअरलेन टाऊन सेंटर मॉलमध्ये दोन गटात झालेल्या हाणामारीनंतर बेछूट गोळीबार झाला. यात पाच नागरिकांचा मृत्यू झाला, तर तीन जखमी आहे. हल्ल्यातील आरोपी पसार झाले असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहे.

मिशिगन राज्यातील डियरबॉर्न येथील एका शॉपिंग मॉलमध्ये दोन गटात हाणामारी झाली, त्यानंतर एका गटातील हल्लेखोराने गोळीबार केला. हिंसक संघर्षात पाच नागरिकांना जीव गमवावा लागला. मॉलमध्ये गोळीबार सुरू होताच, खरेदीसाठी आलेल्या नागरिकांमध्ये घबराट पसरली आणि ते जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागले. डियरबॉर्नचे पोलिस प्रमुख इसा शाहीन यांनी सांगितले की, मॉलबाहेरून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना एका वाहनाने धडक दिल्याने एक व्यक्ती जखमी झाली.

◀ (वृत्तसंस्था)

# शरजील-खालिदला जामीन नाकारला

**नवी दिल्ली, ४ जुलै**

दिल्ली दंगल प्रकरणातील आरोपी उमर खालिद आणि शरजील इमामचा जामीन अर्ज कडकडडूमा न्यायालयाने फेटाळून लावला. ५ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा पूर्वीचे जामीन अर्ज फेटाळल्यापासून या प्रकरणात कोणतीही लक्षणीय प्रगती झालेली नाही, असा युक्तिवादही आरोपींनी केला. तसेच त्यांनी त्यांच्या सहा वर्षांच्या अटकेचा दाखला दिला. यापूर्वी न्यायालयाने या याचिकांवरील आपला निर्णय राखून ठेवला होता.



सुनावणीदरम्यान, उमर खालिदचे प्रतिनिधित्व करणारे वकील त्रिदीप पैस यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने अंद्राबी प्रकरणात उमर खालिद आणि शरजील इमामचे जामीन अर्ज फेटाळण्याच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. साक्षीदारांचे जबाब नोंदवले गेले नसल्यास एका वर्षानंतर जामीन अर्ज दाखल करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आता लागू होत नाही. शरजील इमामचे प्रतिनिधित्व करणारे वकील तालिबा मुस्तफा यांनी सांगितले की, जामीन अर्ज दाखल करण्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर मोठ्या न्यायासनाकडूनही विचार केला जाणार आहे. या प्रकरणातील इतर सह-आरोपींना यापूर्वीच जामीन मंजूर करण्यात आला आहे.

**त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी**

दिल्ली पोलिसांनी सांगितले की, जोपर्यंत मोठ्या न्यायासनाकडून स्पष्ट आदेश जारी होत नाही, तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा आदेश अंमलात राहील. त्यांना स्पष्टीकरण हवे असल्यास त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश अंमलात असताना सत्र न्यायालय काहीही करू शकत नाही. न्यायालयाने १३ जूनला दिल्ली पोलिसांना नोटीस बजावली होती.

◀ (वृत्तसंस्था)

# संभाव्य दुष्काळाबाबत सतर्क रहा

## केंद्रीय गृहमंत्री आणि कृषी मंत्र्यांनी घेतला आढावा




**नवी दिल्ली, ४ जुलै**

जून महिन्यात देशाच्या काही भागांमध्ये सामान्यपेक्षा कमी पाऊस आणि संभाव्य दुष्काळाच्या पृष्ठभूमीवर गृहमंत्री अमित शाह यांनी कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासोबत उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. या बैठकीदरम्यान शाह यांनी सर्व केंद्रीय मंत्रालये आणि विभागांना सतर्क राहण्याचे आणि खरीप पिकांच्या पेरणीबाबत शेतकऱ्यांना वेळेवर व अचूक सल्ला देण्यासाठी राज्य सरकारांशी उत्तम समन्वय साधण्याचा निर्देश दिला.

एका अधिकृत निवेदनानुसार, या बैठकीत शेतकऱ्यांना पुरेशी वीजपुरवठा करणे, सर्व जलाशयांमधील पाण्याच्या पातळीवर सतत लक्ष ठेवणे आणि जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देण्याच्या गरजेवर भर देण्यात आला. जून महिन्यात देशात सामान्यपेक्षा सुमारे ४० टक्के कमी पावसाची नोंद झाली. सर्वांत मोठा परिणाम मध्य भारतात दिसून आला, जिथे पावसात ५०.४ टक्क्यांनी घट झाली.

**खरीप पेरणीचे क्षेत्र २३ टक्क्यांनी कमी**

कमी पावसामुळे यंदा खरीप पिकांच्या पेरणीवरही परिणाम झाला. २५ जूनपर्यंत खरीप पिकांखालील क्षेत्र २३ टक्क्यांनी कमी होऊन १८२.७२ लाख हेक्टरवर आले. या बैठकीदरम्यान अमित शाह म्हणाले, आम्ही अल निनोमुळे देशाच्या काही भागांमध्ये सामान्यपेक्षा कमी पाऊस आणि संभाव्य दुष्काळाच्या परिस्थितीवर सरकार सतत लक्ष ठेवून आहे. अशा परिस्थितीत, अधिकाऱ्यांनी राज्य सरकारांशी समन्वय साधून शेतकऱ्यांना स्थानिक परिस्थितीला अनुकूल पिके पेरण्याचा सल्ला द्यावा, असा निर्देशही त्यांनी दिला.

**आवश्यक ती पावले उचला**

शाह पुढे म्हणाले, जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी देशभरातील सर्व जलाशयांच्या पाण्याच्या पातळीवर सतत लक्ष ठेवावे. चारा, भरडधान्ये आणि कडधान्ये यांसारख्या कमी पाणी लागणाऱ्या पर्यायी पिकांना प्रोत्साहन द्यावे, यावर भर देत त्यांनी ऊर्जा सचिवांना शेतकरी आणि सामान्य ग्राहकांना अखंडित व पुरेसा वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावेत, असा निर्देश दिला.

◀ (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## रोखठोक

# भरकटणाऱ्या भविष्याचे भय

दिनेश गुणे

बेभरवशी आणि अनिश्चित आयुष्य वाट्याला येण्याची जी काही कारणे आजकालच्या युवा पिढीसमोर आव्हान होऊन उभी राहिली आहेत, त्यामध्ये बेरोजगारी, गरिबी आणि अंधारमय भविष्याचे भय या कारणांचा महत्त्वाचा वाटा आहे. कोणाही युवकाच्या उमेदीच्या वयात त्याच्या नजरेसमोर एका सुखी, समाधानी भविष्याचे स्वप्न तरळत असते. ते स्वप्न साकार व्हावे यासाठी त्याचे सदैव प्रयत्न सुरू असतात. त्या ध्येयाने पछाडलेला प्रत्येक युवक त्यासाठी स्वतःची पात्रता सिद्ध करण्यासाठी धडपडत असतो आणि अशी पात्रता प्राप्त झाल्याचा विश्वास मनात रुजला, की भविष्याचे स्वप्न मुठीत पकडण्याचा प्रयत्न सुरू करतो. हा त्याच्या आशावादाचा काळ असतो. या काळात नशीब सोबत असेल, तर त्याचे भविष्य उजळते आणि एखाद्या बेसावध क्षणाची शिकार होऊन नशिबाचे फासे उलटे पडलेच, तर मात्र त्याला अनिश्चित आणि बेभरवशी आयुष्याच्या खडतर वाटचालीशी सामना करावा लागतो. आपल्या आसपास अशा हजारो तरुणांच्या फौजा भविष्य घडविण्याची साधने हाती मिळविण्यासाठी धडपडत असताना आणि त्यासाठी कोणत्याही आव्हानास सामोरे जाण्याची मानसिक व शैक्षणिक तयारी करत असताना, त्यांना गळाला लावून त्यांची पिळवणूक करण्याचा एक अमानवी धंदा गेल्या काही दशकांपासून देशात आणि बहुधा जगातील अनेक देशांत सुरू आहे. मानवी तस्करी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या अमानवी धंद्याची शिकार होणाऱ्यांमध्ये केवळ तरुणच नव्हेत, तर बालके, महिलांचीदेखील अमानुष पिळवणूक होत असून भविष्य तर पुसले जातेच, पण वर्तमानाविषयीच्या अपेक्षांचाही चक्काचूर होऊन त्यांची आयुष्ये केवळ भकास होतात. अशी अनेक प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यात उघडकीस येऊ लागली असून त्यांचे बळी ठरलेल्यांना न्याय मिळावा यासाठी अधूनमधून उमटणारे आवाजदेखील दुबळे ठरावेत अशा ताकदीने हा अमानवी व्यवहार अखंडपणे सुरू आहे. गेल्या काही दशकांत हजारो माणसे या तस्करीला बळी पडून उद्ध्वस्त झाली. त्यांचे भविष्य तर संपलेच, पण मानवी समूहाशी असलेल्या त्यांच्या नात्यांचे धागेदेखील तोडून मानवी जगाच्या या अनैतिक व्यवहारांनी त्यांचा अक्षरशः मानसिक बळी घेतला आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या वेबसाईटवर एक विशेष पान पाहावयास मिळते. या पानांवरील मजकूर धक्कादायक आहेच, पण ही समस्या गेल्या अनेक वर्षांपासून दिवसागणिक अधिक गंभीर होत चालली आहे याचीही या मजकुरावरून जाणीव होते. अनिवासी भारतीय व्यक्तींसोबतच्या विवाहातून उद्भवलेल्या या समस्येत गेल्या काही वर्षांत ४० हजारांहून अधिक महिलांच्या आयुष्याची अक्षरशः धूळधाण झाली असून त्यांचे भविष्य अंधारमय झाले आहे. यापैकी अनेक महिला न्यायासाठी झगडत आहेत, तर अनेकींनी न्यायाची अपेक्षादेखील सोडून दिली आहे. मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आल्यानंतर या समस्येची सोडवणूक करण्यासाठी प्रत्यक्षात गांभीर्याने काही हालचाली झाल्यात. दिवंगत सुषमा स्वराज या परराष्ट्र व्यवहार मंत्री असताना काही समस्याग्रस्त महिलांची कैफियत त्यांच्यासमोर मांडली गेली आणि अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने हा विशेष अनिवासी भारतीय कक्ष सुरू केला. देशाच्या अनेक भागांतील महिलांचे भविष्य या प्रकारात अस्थिर झालेच, पण विशेषतः पंजाबमधील ३५ हजारांहून अधिक महिलांची परदेशात नोकरी, व्यवसाय करणाऱ्या मुलांसोबत संसार थाटण्याची व सुखी जीवनाची स्वप्ने उद्ध्वस्त झाली आहेत. या महिलांना त्यांच्या अनिवासी पतीने बेकायदेशीरपणे किंवा फसवणूक करून वाऱ्यावर सोडले आहे. परदेशातील कायद्यांचा अपुरा आधार, कायद्याविषयीचे अज्ञान, सामाजिक प्रतिष्ठेपोटी वाच्यता न करण्याची मानसिकता यामुळे या महिला कुढत राहिल्या आहेत. आपल्या मुलीला परदेशातील संपन्न आयुष्य जगणारा पती मिळावा आणि तिचे भविष्य उजळावे या आशेने अनेकदा आईवडील घाईघाईने मुलीचा विवाह एखाद्या अनिवासी मुलाशी लावून देतात आणि लग्नानंतर काही दिवसांतच परदेशी परतलेला पती आपल्या पत्नीशी संपर्कच तोडून टाकतात. अशा प्रकरणांत लग्नातून मिळालेला हुंडा व भरमसाट संपत्ती लुटण्याचा स्वार्थी हेतू असतो, हे उघड आहे. एकदा संपत्ती आणि पैसा हाती आला, की अनिवासी पती परदेशात पळून जातो, वधू माहेरी अडकून पडते आणि पतीने सोडून दिलेली महिला असा सामाजिक कलंक माथी घेऊन या महिला आपले आयुष्य ढकलत राहतात. परदेशातील कायदे वेगळे असल्यामुळे घटस्फोट घेणे, पोटगी मागणे किंवा न्याय मिळविणेदेखील अवघड होते. त्यामुळे, फसवणूक झालेल्या महिलांनी भारतात तक्रार नोंदवली तरी आरोपी पतीचा शोध घेऊन त्याला भारतात परत आणणे, त्याच्यावर कायदेशीर कारवाई करणे या प्रक्रिया क्लिष्ट होतात आणि बनावट विवाहाद्वारे संपत्तीची लूट करून आयुष्ये उद्ध्वस्त करण्याचा खेळ सोपा होतो काही तरुण विवाहानंतर पत्नीस परदेशात घेऊन जातात आणि तेथे वेठबिगारीची कामे करण्यास भाग पाडतात असेही काही प्रकरणांत उघडकीस आले आहे. पंजाबमध्ये गेल्या काही वर्षांत सुमारे ३२ हजार महिलांना अनिवासी पतींनी सोडून दिल्याची धक्कादायक माहिती गेल्याच महिन्यात राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी पंजाबमधील एका कार्यक्रमात बोलताना उघड केली. एकट्या पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणावर होणारा हा अनिवासी विवाह घोटाळा आटोक्यात आणणे हे सरकारसमोरील मोठे आव्हान बनले आहे.



पंजाबमधील अकालगढ येथील ही घटना अशा घोटाळ्याचे अस्तित्व अधोरेखित करणारी ठरते. अकालगढमधील एका कुटुंबाने आपल्या मुलीचा विवाह जर्मनीतील हॅम्बर्ग येथे राहणाऱ्या एका अनिवासी तरुणाशी ठरविला. विवाहानंतर आपल्या मुलीला जर्मनीत चांगले जीवन जगता येईल या आशेने हुंड्यासाठी सुमारे आडेआठ हजार डॉलर्सची रक्कम कर्ज घेऊन उभी केली आणि सोने, कपडे, महागडे फर्निचर भेट देऊन थाटामाटात विवाह सोहळा साजरा केला. लग्नानंतर लवकरच कागदपत्रांची आणि आवश्यक प्रक्रियांची पूर्तता करून पत्नीला घेऊन जाण्याचे आश्वासन देऊन पती जर्मनीस निघून गेला आणि माहेरी राहिलेली पत्नी पतीच्या प्रतीक्षेत जीवन जगू लागली. आपल्याशी विवाह केलेल्या तरुणाचे जर्मनीत लग्न झाले आहे आणि त्याला पत्नी व मुलेही आहेत, ही बाब लग्नानंतर आठ वर्षांनी तिला समजली, तेव्हा मानसिक धक्क्याने ती कोलमडून गेली होती. आता त्यांनी आपल्याला फसविणाऱ्या त्या अनिवासी व्यक्तीविरुद्ध पंजाबमधील एका न्यायालयात खटला दाखल केला आहे आणि न्यायाच्या प्रतीक्षेत त्या कोर्टाच्या पायऱ्या झिजवत प्रत्येक दिवस ढकलत आहेत.

एका बाजूला माणसांसोबत असे अमानवी वर्तन करून आर्थिक फसवणुकीचा धंदा करणाऱ्या अनिवासी व्यक्तींचे गुन्हे आव्हान म्हणून उभे असताना, संघटितपणे सुरू असलेली मानवी तस्करी हा मानवतेला लागलेला शाप पुसण्याचे आव्हानही अधिक खडतर होत आहे. यामागे मोठ्या आर्थिक उलाढालीत गुंतलेल्या आंतरराष्ट्रीय टोळ्यांचे हितसंबंध गुंतलेले असल्याने त्यांचा संपूर्ण बीमोड करणे अद्याप तरी शक्य झालेले नाही. त्यामुळे या धंद्याच्या जाळ्यात अडकलेल्यांचे भविष्य अक्षरशः वाऱ्यावर भरकटते आणि एखाद्या नशीबवानासच पुन्हा आपल्या आयुष्याची भरकटलेली दिशा पूर्वपदावर आणण्याची संधी मिळते. मानवी तस्करीमागे अनेक उद्देश असतात आणि त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारात तस्करीच्या जाळ्यात अडकलेल्या माणसांची वस्तूच्या मोलाने खरेदी-विक्री होऊन त्यांचा वापर पुढे अनैतिक व बेकायदा आर्थिक गुन्हेगारीकरिता केला जातो हे आता गुपित राहिलेले नाही. आता या गुन्हेगारीला आणखी एक नवा मार्ग सापडला आहे. बेरोजगारीच्या आणि कौटुंबिक समस्यांच्या त्रासाने स्वास्थ्य हरवलेल्या तरुणांच्या फौजा जेव्हा भविष्याच्या शोधात भरकटत असतात, तेव्हा त्यांच्यावर आमिषांचे जाळे टाकून त्यांना भविष्याची सुंदर स्वप्ने दाखविणे आणि पुढे गळाला लागलेल्या प्रत्येकाची पिळवणूक करून त्यांच्या अस्तित्वाच्या खुणादेखील अनोळखी करून टाकणे हा या नव्या धंद्याचा राक्षसी मार्ग आहे आणि भविष्याच्या स्वप्नपूर्तीच्या आशेने किंवा अन्य कोणत्याही कारणाने एखाद्या बेसावध क्षणी त्यावर भरकटलेल्या असंख्य महिला, मुले, तरुणांची आयुष्ये उद्ध्वस्त झाली आहेत.

विकासाच्या स्पर्धेत देशाचे नेतृत्व करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. तरीही या राज्यालादेखील मानवी तस्करीच्या भीषण समस्येचा मोठा डाग लागला आहे. सुमारे तीन वर्षांपूर्वी, मार्च २०२३ मध्ये देशाच्या लोकसभेतील कामकाजादरम्यानच्या चर्चेतून समोर आलेले एक वास्तव या चिंतेला पुष्टी देणारे आहे. त्याआधीच्या तीन वर्षांतील महाराष्ट्रातील मानवी तस्करीच्या उघडकीस आलेल्या प्रकरणांची एक गंभीर आकडेवारीच त्या दिवशी लोकसभेत केंद्रीय गृहराज्यमंत्र्यांनी सभागृहासमोर मांडली. राष्ट्रीय गुन्हे नोंद शाखेचा अहवाल हा या आकडेवारीचा अधिकृत स्त्रोत असल्याने, या वास्तवाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. २०२१ च्या अहवालानुसार त्याआधीच्या तीन वर्षांत महाराष्ट्रात मानवी तस्करीच्या सुमारे ७८५ प्रकरणांची नोंद झाली होती. २०१९ ते २०२१ या तीन वर्षांत, देशभरातील १८ वर्षांखालील दोन लाख १० हजार मुले मानवी तस्करीच्या जाळ्यात सापडली, तर १८ वर्षांवरील सुमारे पाच लाख ८० हजार महिलांना या अमानवी धंद्याची शिकार व्हावे लागले. लैंगिक शोषण हा या अमानुष धंद्यामागचा भीषण हेतू आहे हे स्पष्ट आहेच, पण गरीब, बेरोजगारांना लक्ष्य करून त्यांचा गुन्हेगारी धंद्यांसाठी वापर करण्याचे प्रकारही वाढले आहेत. परदेशात नोकरी मिळविण्याच्या आशेने व भविष्याच्या स्वप्नांच्या प्रभावाने हुरळलेले तरुण अशा आमिषांना बळी पडतात, परदेशी जाण्यासाठी हाती असलेली पुंजी खर्च करतात आणि या टोळ्यांच्या माध्यमातून परदेशात दाखल झाल्यानंतर पैसा, पासपोर्ट, पत्ता असे स्वतःची ओळख असलेले सारे काही गमावून बसतात. अशा आमिषाने जाळ्यात पकडलेल्या भारतीय तरुणांना परदेशांतील अज्ञात ठिकाणी ओलिस ठेवून त्यांना सायबर गुन्हेगारी भाग पाडल्याची असंख्य उदाहरणे यापूर्वी उघडकीस आली होती. कंबोडियामध्ये पाच हजारांहून अधिक भारतीय तरुणांना या गुन्हेगारीसाठी ओलिस ठेवून राबविले गेल्याची एक बातमी दोन वर्षांपूर्वी देशात चिंतेची लाट पसरवून गेली होती, तर रशियामध्ये हेल्पर म्हणून नोकरी देण्याचे आमिष दाखवून तस्करी मार्गाने रशियास पाठविलेल्या तरुणांच्या हाती शस्त्रे देऊन त्यांना सक्तीने युक्रेन युद्धात पाठविले गेल्याचेही उघड झाले होते. दोन वर्षांपूर्वी, जुलै २०२४ मध्ये परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंह यांनी लोकसभेतच ही माहिती दिली होती. अनैतिक लैंगिक धंद्याकरिता महिलांची तस्करी, भीक मागण्यासाठी किंवा अमली पदार्थांची ने-आण करण्यासाठी बालकांची तस्करी होत असल्याचे प्रकार तर सतत कानावर येतच असतात. म्हणूनच, मानवी तस्करीच्या या भयावह धंद्याचे आंतरराष्ट्रीय जाळे भेदून सामान्य जनतेस सुरक्षित आणि भयमुक्त जगण्याची हमी देण्याचे आव्हान आता सोपे राहिलेले नाही.

कंबोडिया, म्यानमार आदी देशांत सायबर गुन्हेगारीकरिता भारतीय तरुणांची मोठ्या प्रमाणावर तस्करी झाल्याची कबुली गेल्या फेब्रुवारीत लोकसभेत सरकारने दिली आणि या आव्हानाच्या मर्यादाही उघड झाल्या. आमिषांना बळी पडून अशा नोकऱ्यांच्या आकर्षक फसव्या जाहिरातींकडे आकर्षित होणारे तरुण स्वतःहूनच दलालांच्या जाळ्यात ओढले जातात आणि आपले भविष्य पणाला लावतात, त्यामुळेच हे आव्हान सोपे नाही, याची सरकारला जाणीव आहे. २०२२ मध्ये सुमारे साडेचारशे, २०२३ मध्ये सुमारे साडेपाचशे आणि २०२५ मध्ये सुमारे चार हजार ३०० भारतीय तरुणांची या दमनचक्रातून मुक्तता करण्यात आली असली, तरी नव्याने पुन्हा या जाळ्यात अडकून आपले भविष्य अंधारात ढकलणाऱ्या तरुणांचे आव्हान कायम आहे. म्यानमार हे अशा तस्करीचे मोठे केंद्र असावे असे या आकडेवारीवरून दिसते. मात्र, या गुन्ह्याचे जाळे तेवढ्यापुरते मर्यादित नाही, हे थायलंड-म्यानमार सीमेवरील एका अज्ञात छावणीत डांबल्या गेलेल्या सुमारे ८०० भारतीय तरुणांच्या नव्याने समोर आलेल्या करुण कहाणीवरून पुन्हा स्पष्ट झाले आहे. थायलंडमध्ये मोठ्या पगाराची नोकरी देण्याचे आमिष दाखवून फसविल्या गेलेल्या या ८०० तरुणांमध्ये महाराष्ट्राच्या बीड जिल्ह्यातील सुमारे २५ तरुणांचा समावेश असल्याने, महाराष्ट्राच्या तरुणांसमोरील समस्यांचे एक गंभीर चित्र या नव्या प्रकरणातून समोर आले आहे. बीड जिल्ह्याच्या केज या गावातील एका तरुणास बँकॉकमधील लठ्ठ पगाराच्या नोकरीचे आमिष खुणावू लागले आणि तो या जाळ्यात अडकला. बँकॉकमध्ये पोहोचल्यावर त्याला म्यानमारमधील एका जंगलातील अज्ञात स्थळी असलेल्या सायबर गुन्हेगारी केंद्रात ऑनलाईन फसवणुकीच्या कामाला जुंपण्यात आले. एक संधी साधून या तरुणाने आपल्या कुटुंबासोबत संपर्क साधल्याने या नरकयातनांचा आणि आंतरराष्ट्रीय तस्करीचा उलगडा झाला आहे. आता त्यांच्या सुटकेसाठी केंद्र आणि राज्य सरकार प्रयत्न करतील आणि या अमानवी धंद्याचे दलाल नवे जाळे घेऊन गरजवंतांच्या स्वप्नांना त्यामध्ये गुरफटविण्यासाठी तयारी करतच राहतील. तरुणांना आणि सुखी भविष्याच्या स्वप्नात दंग राहून आंधळेपणाने कोणाच्याही गळ्यात माळ घालत स्वतःची फसवणूक करून घेणाऱ्या विविहेच्छुक तरुणींच्या कुटुंबांना केवळ सावध करणे एवढाच अशा अमानवी धंद्याला आळा घालण्याचा उपाय पुरेसा नाही. तरुणांना आणि भविष्याचे स्वप्न रंगविणाऱ्या तरुणींना त्यांच्या क्षमता सिद्ध करता येतील अशा रोजगाराच्या संधी स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देणे हा त्यावरचा एकमेव उपाय आहे. ते शक्य होईल, तेव्हा मानवी तस्करीच्या आणि फसवणुकीद्वारे संपत्ती जमवून परदेशात सुखाने राहत अनेक महिलांची आयुष्ये उद्ध्वस्त करणाऱ्या अमानवी धंद्याचे आव्हान पेलणेही सोपे होईल. ■

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### टप्प्याटप्प्याने पंढरीची वारी

पंढरपूर येथे जाणाऱ्या संतांच्या पालख्या आणि त्यामागून पायी जाणारे वारकरी अशी ही वारी, हे आपल्या महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. एकूण १४टप्पे आणि काही ठिकाणी मुक्काम मिळून साधारण १७ दिवसांची ही वारी. संत ज्ञानेश्वरांची पालखी आळंदीहून तसेच संत तुकारामांची



पालखी देहू येथून निघते. अशा अनेक संतांच्या पालख्या वेगवेगळ्या ठिकाणांहून निघतात. पालखी आणि वारकरी यांचे एकच ध्येय असते. ते म्हणजे आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरच्या विठुरायाचे दर्शन. अशीही आगळीवेगळी वैशिष्ट्य पूर्ण वारी. संत ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे पंढरीचे वारकरी. ज्ञानेश्वर महाराजांना पंढरीच्या वारीची दीक्षा त्यांचे गुरू व वडील बंधू निवृत्तिनाथ यांनी दिली. पंढरीचा सोज्वळ मार्ग माझ्या गुरूंनी दाखवून मला कृतार्थ केले असे संत ज्ञानदेव म्हणतात.

साधु संत मायबाप तिही केले कृपा दान
पंढरीचे यात्रे नेले घडले चंद्रभागे स्नान
श्री गुरु निवृत्तीराये मार्ग दाविला सोज्वळ
बाप रखुमा देवीवरू विठ्ठल दीनांचा दयाळ

हैबतराव बाबांनी ही पंढरीची वारी सुरू केली. हा सोहळा आज कित्येक वर्षे अव्याहतपणे सुरू आहे. सगळे संत पूर्वी पंढरपूर येथे एकत्र येत आणि समाजाच्या सुधारणेसाठी विचार करून समाजाच्या प्रगतीसाठी कसे कार्य करायचे ते ठरवत. अशी या वारीची माहिती शाळेतील विद्यार्थ्यांना मी दरवर्षी देत असे. एकदा एका विद्यार्थ्याने, 'बाई तुम्ही कधी वारीला गेला आहात का?' असा प्रश्न विचारला. त्यावर एवढे दिवस रजा मिळत नाही म्हणून मी वारीला गेले नाही असे सांगितले. पण त्याच्या प्रश्नाने मी अंतर्मुख झाले. आमच्या शिक्षिका खोलीत मधल्या सुट्टीत ज्या गप्पा होत त्यातून एकेक टप्पा करून वारीला जाता येते हे कळले. मग दर वर्षी एकेक टप्पा अशी आनंदमयी वारी सुरू झाली. माझ्याबरोबर माझे पती सप्रे हेही वारीला येत होते.

शुक्रवार ४ जलै २०२५ ला आमचा वारीचा शेवटचा टप्पा आम्ही (भेंडी शेगाव ते वाखरी आणि पुढे पंढरपूर) पूर्ण केला. पंढरपूरच्या देवळाच्या कळसाला मनोभावे नमस्कार करून वेगळे समाधान मिळवून घरी परतलो. एका विद्यार्थ्याने विचारलेला प्रश्न माझ्या वारीसाठी प्रेरणादायी ठरला. तसेच माझ्या शिक्षिका भगिनींनी दिलेली माहिती उपयुक्त ठरली.

**सविता सप्रे**/पुणे. ९२२६०९६७७७

■■■

### आधाराच्या शोधात हरवणारी तरुणाई

तरुणपण हा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा असतो. आजची तरुणाई अभूतपूर्व संधी आणि आव्हानांच्या काळात जगत आहे. शिक्षण, करीअर, स्पर्धा, सामाजिक अपेक्षा आणि बदलत्या जीवनशैलीमुळे तरुणांच्या मानसिकतेवर मोठा ताण निर्माण होत आहे. या वयात व्यक्ती अनेक स्वप्ने पाहत असतो, नवीन नातेसंबंध निर्माण करत असतो आणि स्वतःची ओळख घडवत असतो. मात्र याच काळात मानसिक ताण, अपयश, एकटेपणा आणि असुरक्षिततेच्या भावना देखील अनुभवाव्या लागतात. अशा परिस्थितीत अनेक तरुण भावनिक आधार शोधतात. आधाराची गरज नैसर्गिक असली तरी योग्य मार्गदर्शनाऐवजी चुकीच्या व्यक्ती, नातेसंबंध किंवा आभासी जगावर अवलंबून राहिल्यास किंवा त्याचा अतिरेक झाल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

कुटुंब हे व्यक्तीच्या भावनिक विकासाचे पहिले केंद्र असते. परंतु आज अनेक कुटुंबांमध्ये संवादाचा अभाव जाणवतो. पालक आणि मुलांमध्ये मोकळेपणाने विचारांची देवाणघेवाण होत नाही. तरुणांच्या भावना, समस्या आणि अपेक्षा समजून घेण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नाही. परिणामी, अनेक तरुण आपल्या मनातील गोष्टी कुटुंबाऐवजी बाहेरील व्यक्तींशी शेअर करण्यास प्राधान्य देतात.

कौटुंबिक पारदर्शकतेचा अभाव ही देखील एक गंभीर समस्या आहे. घरातील निर्णय, नातेसंबंध किंवा आर्थिक परिस्थिती याबाबत स्पष्टता नसल्याने तरुणांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होते. त्याचबरोबर वाढते मतभेद, विरोधकांची संख्या आणि सतत होणारी टीका यामुळे आत्मविश्वास कमी होतो. अशा परिस्थितीत सहानुभूती दाखवणारी कोणतीही व्यक्ती त्यांना जवळची वाटू लागते. भावनिक आधार घेताना अनेक तरुण विवेक गमावतात. समोरची व्यक्ती आपली काळजी घेते, आपल्याला समजून घेते या भावनेतून ते तिच्यावर पूर्ण विश्वास ठेवतात. काही वेळा अशा विश्वासाचा गैरफायदा घेतला जातो. भावनिक शोषण, फसवणूक, आर्थिक नुकसान किंवा मानसिक छळ यांसारख्या समस्या उद्भवू शकतात.

काही तरुण एखाद्या व्यक्तीवर इतके अवलंबून होतात की स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता कमी होते. त्या व्यक्तीशिवाय जगणे अशक्य वाटू लागते. जेव्हा नातेसंबंध तुटतात किंवा अपेक्षा पूर्ण होत नाहीत, तेव्हा नैराश्य, चिंता, आत्मविश्वासाचा अभाव आणि काही वेळा आत्मघातकी विचारदेखील निर्माण होऊ शकतात. सोशल मीडियाने ही समस्या आणखी गुंतागुंतीची केली आहे. अनेकदा आभासी जगातील नातेसंबंध वास्तवापेक्षा अधिक महत्त्वाचे वाटू लागतात. लाईक्स, कमेंट्स आणि फॉलोअर्स यांच्या माध्यमातून मिळणारा तात्पुरता भावनिक आधार अनेकांना आकर्षित करतो. मात्र ही नाती नेहमीच विश्वासापात्र असतील असे नाही. त्यामुळे फसवणूक आणि भावनिक दुखापत होण्याची शक्यता वाढते.

भावनिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रत्येक तरुणाने स्वतःवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. समस्या आल्यास त्यांचा सामना करण्याची तयारी, सकारात्मक विचारसरणी, कुटुंबाशी मोकळा संवाद आणि योग्य मार्गदर्शन यामुळे भावनिक स्थैर्य प्राप्त होते. आधाराची गरज असली तरी स्वतःची ओळख आणि स्वाभिमान जपणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येक तरुणाने आत्मविश्वास, स्वावलंबन आणि भावनिक परिपक्वता विकसित करणे आवश्यक आहे. कुटुंबातील संवाद वाढवणे, विश्वासाचे वातावरण निर्माण करणे आणि मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे ही काळाची गरज आहे. भावनिक आधाराचा शोध घेताना विवेक, आत्मभान आणि योग्य मार्गदर्शन यांचे महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. भावनांवर नियंत्रण आणि स्वतःवरील विश्वास हेच यशस्वी व संतुलित जीवनाचे खरे आधारस्तंभ आहेत.

**उर्वशी मनीष संघवी**/अकोला

■■■

### दिवाण लेआऊटच्या समस्यांवर हव्या उपाययोजना

प्रभाग ३४ मधील दिवाण लेआऊटमध्ये अनेक समस्या आहे. त्याचा पाठपुरावा अनेक वर्षापासून सुरू आहे, पण त्याकडे नेहमीच दुर्लक्ष झाले आहे. या प्रभागात चार नगरसेवक आहेत. सुमारे एक कोटीचा निधी विकासासाठी मिळाला आहे. योग्य नियोजन केले तर या प्रभागाचा विकास निश्चित होईल. दिवाण लेआऊटमध्ये गडर लाईन्सची अवस्था दयनीय असून त्यात सुधार करण्याची गरज आहे. अंतर्गत रस्ते खाली-वर झाल्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचते. अंतर्गत रस्ते चहुबाजूंनी फुटले आहेत. रस्त्याचे सिमेंटीकरण होणार असेल तर रस्ता वर आणि घरं खाली अशी स्थिती होऊ नये. दिवाण लेआऊटमधून मोठा नाला वाहतो. त्याची दोन्ही बाजूच्या भिंतीची उंची अतिशय लहान आहे. पावसाळ्यात नाल्याचे पाणी नागरिकांच्या घरात शिरो. दोन वर्षापूर्वी घरात पाणी शिरल्यामुळे हजारो रुपयांचे नुकसान झाले. परिणामी नाल्याच्या भिंतीची उंची वाढविणे अनिवार्य आहे. पावसाला सुरुवात झाली असून हे काम युद्ध पातळीवर व्हावे, ही अपेक्षा. या लेआऊटमध्ये एक छोटेखानी मैदान आहे. त्या ठिकाणी सकाळी प्रभात शाखा आणि सायंकाळी संघाची सायं शाखा लागते. रोज सकाळी ६ ते ७ पर्यंत महिला योग साधना करतात. पण या मैदानात अस्वच्छता, अपुरा प्रकाश आहे. येथे विहीर आहे, पण त्याचा अनेक वर्षापासून उपयोग झाला नाही; त्यामुळे विहिरीतील पाणी दूषित झाले असावे. ज्येष्ठ नागरिकांना बसायला बेंचेस ठेवले होते, पण ते काढून नेले. मुलांना व्यायाम करायला साहित्य लावले होते; तेही तोडफोड करण्यात आले. याबद्दल अनेक तक्रारी यापूर्वी करण्यात आल्यात, पण उपयोग शून्य. याच ठिकाणी आमदार मोहन मते यांच्या निधीतून व्यासपीठ बांधण्यात आले आहे. पण ते चारही बाजूने खुले असल्यामुळे उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात त्याचा फारसा उपयोग होत नाही.

संबंधित नगरसेवकांनी लक्ष घालून या समस्यांचे निवारण करावे, ही अपेक्षा.

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

■■■

### हॉस्पिटलचा वेटिंग एरिया

हॉस्पिटलच्या वेटिंग एरियात एक वेगळीच शांतता असते. ती पूर्ण शांत नसते; मशीनचा मंद बीप, नर्सच्या घाईघाईने पडणाऱ्या पावलांचा आवाज, स्ट्रेचरची हलकी हालचालः पण त्या सगळ्या आवाजांपेक्षा जास्त बोलकी असते तिथे बसलेल्या माणसांची निःशब्द प्रतीक्षा. हातात रिपोर्ट्स, डोळ्यांत प्रश्न आणि मनात प्रार्थना घेऊन प्रत्येक जण कोणाच्या तरी 'ठीक आहे' या एका वाक्याची वाट पाहत असतो. तिथे वेळ घड्याळाच्या काट्यांनी पुढे सरकत नाही. तो रिपोर्ट येईपर्यंत थांबतो, डॉक्टर बाहेर येईपर्यंत अडकून राहतो आणि आश्वासक स्मित दिसेपर्यंत श्वास रोखून धरतो. त्या काही खुर्च्यांवर बसलेली माणसं आयुष्याचे अनेक रंग दाखवतात. एक मुलगा रात्रभर आईच्या आयसीयूच्या दाराकडे डोळे लावून बसलेला असतो. दुसरीकडे एक वृद्ध गृहस्थ पत्नीच्या रिपोर्टची वाट पाहत हातातल्या पाण्याच्या बाटलीचं झाकण पुनःपुन्हा उघडतात आणि बंद करतात. काळजी माणसाला किती निःशब्द बनवते, हे तिथे जाणवतं. कधी एखादं कुटुंब डिस्चार्ज पेपर हातात घेऊन बाहेर पडतं. चेहऱ्यावरचा थकवा तसाच असतो, पण डोळ्यांत समाधानाचं हास्य उमललेलं असतं तर कधी डॉक्टरांचं एक वाक्य कुणाचं संपूर्ण जग बदलून टाकतं. आशा आणि भीती यांच्या सीमेवर उभं असलेलं हे जग रोज नव्याने जगायला शिकवतं. हॉस्पिटलमध्ये प्रेमाचा आवाज मोठा नसतो; तो कुजबुजतो... 'काही खाल्लंस का?', 'तू थोडा वेळ झोप.', 'मी आहे ना...' ही साधी वाक्यं; त्या क्षणी औषधांपेक्षाही जास्त दिलासा देतात. हॉस्पिटल माणसाला नकळत बदलतं. पुढे ढकललेले फोन, 'नंतर बोलू' म्हणून राहून गेलेल्या भेटी, आईची काळजी, वडिलांचा मूक आधार या सगळ्यांची किंमत तिथे नव्याने समजते. कारण आयुष्याची अनिश्चितता तिथे रोज डोळ्यांसमोर उभी असते. माणूस कितीही खंबीर असला, तरी आपल्या माणसांसाठी तो आतून कायम हळवा असतो. म्हणूनच मला नेहमी वाटतं, हॉस्पिटलच्या वेटिंग एरियात फक्त रुग्णांची तपासणी होत नाही; तिथे नात्यांची धडधड, प्रेमाची खोली आणि आशेची ताकदही मोजली जात असते आणि मनात नकळत एकच प्रार्थना उमटते... 'जरा थांब ना; श्वासांना अजून तुझी सवय आहे.'

**गीता राहुल कित्तूर**/कर्वेनगर, पुणे. ८३८००८११२०

■■■

### शिक्षण व्यवस्था पोषक हवी

कुठल्याही व्यवस्थेत भोंगळपणा वाढला की भ्रष्टाचार वाढला म्हणून समजावे. खरं तर शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात हा प्रकार अत्यंत गलिच्छ आहे. शिक्षण क्षेत्रात सर्रास पेपरफुटी वाढली आहे. पूर्वी अशा परीक्षा नव्हत्या तर काय चांगले डॉक्टर, इंजिनीअर, शिक्षक निर्माण झाले नाहीत काय? केवळ लोकसंख्या वाढीची कारणे आणि योग्य विद्यार्थ्यांची निवड व्हावी ही कारणे दाखविली तरी त्यामागे पैसा कमाविणे हा एकच उद्देश आहे, हे लक्षात आल्यानंतर या घोडदौडीत कोण मागे राहणार? शिक्षणाची स्वायत्तता आर्थिक वर्गाकडे झुकल्यामुळे अशा व्यक्तींनी आपल्या खाजगी शाळा व महाविद्यालये भरपूर प्रमाणात काढल्या. त्यामध्ये शिक्षण देण्याचा उद्देश कमी आणि पैसा कमाविणे जास्त असावा, हे अभ्यासाअंती म्हणता येते. (अर्थात अपवाद वगळल्यास) कारण नियमाप्रमाणे शिक्षकांची भरती येथेही केली जाते, परंतु शिक्षकांचे आर्थिक शोषण मात्र वाढतेच आहे. केवळ स्वार्थीपणा हा शिक्षणाचा पाया जेथे असतो तेथे इमारत कशी उभी राहणार? हिंदू राष्ट्र अथवा विश्वगुरू होण्यासाठी नवीन पिढी अतिशय संस्कारक्षम असलीच पाहिजे. राष्ट्रप्रेम, देशभक्ती या भावनांची या शिक्षणामध्ये पेरणी केली गेली पाहिजे. त्याचप्रमाणे सध्या कुचकामी असलेल्या डिग्र्या बंद कराव्यात (चीन देशामध्ये या धोरणाचा विचार कधीच केलेला आहे) सध्या उपयुक्त आणि पोटापाण्याला लावणारे शिक्षणच उपयोगी ठरणार आहे. तेथे धर्म-जात याचा कोणताही विचार नको. राष्ट्र निर्माण करायचे आहे आणि संपूर्ण जगताला अभिमान वाटावा अशी जनता निर्माण करणे हेच प्राथमिक स्वप्न असल्यास समाजाची सर्व अंगे निरोगी, निरामय बनतील आणि मेंदूही सडणार नसल्याने केवळ आपल्यासाठी नाही तर समाजासाठी आणि देशासाठी आपल्याला जगायचे आहे, हा एकच संदेश शिक्षणामधून जावा. राष्ट्र निर्मितीसाठी कोणतीही गोष्ट करणे असंभव नाही. फक्त योग्य कृती आणि सकारात्मक परिणाम एवढेच हवे आहेत.

**डॉ. अचला तांबोळी**/९८९०६१७५३९

■■■

### देशी वृक्षांची लागवड करा



वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हेही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात. त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बुंध्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखे दिसणारे पक्षी दिसेनासे झाले आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्ष्यांद्वारे होणाऱ्या बीजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या अस्तित्वाशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. देशी वृक्ष जितका ऑक्सिजन देतात तितका ऑक्सिजन विदेशी वृक्ष देत नाही. वातावरणातील ऑक्सिजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीत जास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीत जास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

■■■

### ब्रेक्स...

माझं शालेय शिक्षण सी.पी. ॲण्ड बेरार हायस्कूल नागपूर येथे झाले. एकदा फिजिक्सच्या पावडे सरांनी आम्हा विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला, 'तुम्ही सायकल चालवता का?' सर्वांनी एकसुरात 'हो' म्हटले. मग त्यांनी आम्हाला आणखी एक प्रश्न विचारला. 'सायकलला ब्रेक्स का लावलेले असतात?' त्यावर विद्यार्थ्यांकडून निरनिराळी उत्तरे आली, थांबण्यासाठी... वेग कमी करण्यासाठी... अपघात टाळण्यासाठी! सर्वात चांगले उत्तर सरांचे होते. ते म्हणाले, 'जास्त वेगाने जाता येण्यासाठी..!' सर पुढे म्हणाले, गोंधळले असाल ना अशा उत्तराने. मग असे कसे? जरा विचार करा, जर तुमच्या सायकलला ब्रेकच नसते तर तुम्ही जास्तीत जास्त किती वेगाने सायकल चालवाल? सायकलला ब्रेक आहेत म्हणूनच तुम्ही वेगाने सायकल चालवण्याचे धाडस करू शकता व तुमच्या इच्छित स्थळी कमी वेळात सुखरूपपणे पोहोचू शकता. असे असले, तरी ब्रेक्सचे महत्त्व केवळ वाहनापुरते मर्यादित नाही. आपल्या आयुष्यालाही ब्रेक्सची गरज असते. जीवनाच्या धावपळीत, महत्त्वाकांक्षांच्या शर्यतीत आणि यशाच्या मागे धावताना कधी कधी थांबून स्वतःकडे पाहणे आवश्यक असते. विचारांना, भावनांना आणि निर्णयांना योग्य वेळी 'ब्रेक' लावला तर अनेक चुका टाळता येतात. राग आला की शब्दांना ब्रेक हवा, अहंकार वाढला की वर्तनाला ब्रेक हवा आणि यश मिळालं की गर्वाला ब्रेक हवा. कारण नियंत्रण नसलेला वेग जसा अपघात घडवतो, तसंच नियंत्रण नसलेलं जीवनही संकट निर्माण करू शकतं. एक सुंदर तत्त्वज्ञान असं सांगतं की, गाडीला ब्रेक्स असतात म्हणून ती वेगाने धावू शकते. जर ब्रेक्स नसते, तर चालक कधीच आत्मविश्वासाने वेग वाढवू शकला नसता. त्याचप्रमाणे जीवनातही मूल्ये, संस्कार, संयम आणि विवेक हे आपल्या मनाचे ब्रेक्स आहेत. हेच आपल्याला योग्य मार्गावर ठेवतात आणि पुढे जाण्याचं धैर्य देतात. म्हणूनच गाडीतील ब्रेक्स आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतात. 'थांबण्याची क्षमता असेल, तरच पुढे जाण्याचा वेग सुरक्षित आणि यशस्वी ठरतो.' जीवनातही वेग हवा, प्रगती हवी, स्वप्नांची उंच भरारी हवी; त्याचबरोबर योग्य वेळी थांबण्याचं शहाणपणही हवं. कारण वेग यश देतो, पण ब्रेक्स सुरक्षितता देतात; आणि सुरक्षितता असेल तरच प्रवास आनंददायी होतो. जीवनात वेळोवेळी आलेल्या अशा ब्रेक्समुळेच तुम्ही आज आहे ते स्थान मिळवू शकला आहात. असे ब्रेक्स नसते तर तुम्ही कुठंतरी भरकटला असता. म्हणूनच जीवनात येणाऱ्या अशा ब्रेक्सची जाण ठेवा.

**संजय करगुटकर**/९८९०७५९००५ ■

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# चंद्रभागेच्या वाळवंटात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत स्वच्छता मोहीम

## आषाढी वारीसाठी पंढरपूर सज्ज: स्वच्छता मोहिमेचा श्रीगणेशा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

आषाढी वारी २०२६ च्या अनुषंगाने यात्रा कालावधीत १२ ते १५ लाख भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे येतात. यातील लाखो भाविक भीमा नदीच्या तीरावर स्नान व दर्शनासाठी येत असतात. मात्र, नदीपात्राच्या दोन्ही बाजूला वाळवंटात कचरा व कचरायुक्त वस्तू मोठ्या प्रमाणात पडलेल्या असतात. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाच्या वतीने भीमा नदीच्या वाळवंटात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्वतः वाळवंटातील कचरा उचलून या मोहिमेची सुरुवात केली. तर पंढरीत आषाढी वारीत स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार असल्याचा निर्वाळाही जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिला.

या स्वच्छता मोहिमेत पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह महसूल, पोलीस, नगरपरिषद व अन्य विभागांचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आषाढी वारीसाठी येणाऱ्या लाखो वारकरी-भाविकांना स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण मिळावे, या उद्देशाने ही मोहीम हाती घेण्यात आली. चंद्रभागेच्या वाळवंटात प्लास्टिक पिशव्या, निर्माल्य, खाद्यपदार्थांचे अवशेष व इतर कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी नागरिकांना व भाविकांना आवाहन केले की, पंढरपूर हे लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान आहे. नदीपात्र व वाळवंट स्वच्छ ठेवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. प्रशासनाच्या वतीने ही नियमितपणे कचरा उचलण्यासाठी सफाई कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. परंतु नागरिक, भाविक यांनी कचरा वाळवंटात नदी तीरावर कुठेही न टाकता कचराकुंडीत टाकावा व प्रशासनाला सहकार्य करावे. यावर्षीच्या वारीतही स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले की, यात्रा कालावधीत स्वच्छतेबरोबरच सुरक्षिततेवरही विशेष भर दिला जाणार आहे. नगरपरिषद मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी वारी काळात नियमित स्वच्छता, पिण्याचे पाणी व इतर सुविधा पुरविण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याचे स्पष्ट केले. या विशेष मोहिमेमुळे आषाढी वारीपूर्वीच भीमा नदीचे वाळवंट स्वच्छ झाले आहे. तसेच नगरपरिषदेच्या वतीने नियमितपणे स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे.

# शासनाचे अपडेट्स मिळणार व्हॉट्सअप अन् पब्लिक ॲपवर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, ५ जुलै-

समाजमाध्यमांच्या विविध प्लॅटफॉर्म्सद्वारे नागरिकांपर्यंत अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने आता 'व्हॉट्सप' चॅनल आणि 'पब्लिक' ॲपवर अधिकृत, प्रमाणित खाती सुरू केली आहेत.

आता नागरिक 'व्हॉट्सप' चॅनलवर DGIPR, Govt of Maharashtra या नावाने, तर पब्लिक पवर महाराष्ट्र शासन या नावाने शासकीय घडामोडींचे थेट अपडेट्स मिळवू शकतील. या दोन्ही प्लॅटफॉर्म्समुळे जनतेपर्यंत अधिक गतीने, अचूक, अधिकृत आणि वस्तुनिष्ठ माहिती थेट आणि व्यापक स्वरूपात पोहोचण्यास मोठी मदत होणार आहे.

शासन आणि जनतेला जोडणारा महत्त्वाचा दुवा आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपूर्ण समन्वयन करणारी यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे. शासनाचे विविध लोकोपयोगी उपक्रम, योजना जनतेपर्यंत पोहोचविणे आणि त्याबाबतच्या जनतेच्या प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविण्याची दुहेरी जबाबदारी महासंचालनालय पार पाडत असते. हे काम करताना डिजिटल क्रांतीचा पुढचा टप्पा म्हणून महासंचालनालयाने हायपरलोकल कंटेंट देणाऱ्या 'पब्लिक ॲप' वर आणि 'व्हॉट्सप चॅनल' वर आपली उपस्थिती नोंदवली आहे.

## महत्वाचे...

# बार्शीतील आरोग्य सुविधांसाठी आ. राजेंद्र राऊत यांचा पाठपुरावा

**बार्शी, दि. ४ जुलै-**

मुंबई येथील मंत्रालयात आमदार राजेंद्र राऊत यांनी महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन बार्शी तालुक्यातील बार्शी, पांगरी आणि वैराग येथील शासकीय रुग्णालयांच्या विविध प्रलंबित कामांबाबत चर्चा केली. याप्रसंगी आमदार राजेंद्र राऊत यांनी पुढील महत्त्वाच्या मागण्या मंत्री महोदयांकडे मांडल्या. बार्शी शहरातील गाडेगाव रस्ता येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीसाठी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. पांगरी येथील प्रस्तावित ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीसह वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा. वैराग येथील प्रस्तावित ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करावी. या सर्व मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी संबंधित कामांवर लवकरच आवश्यक कार्यवाही करुन मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन आमदार राजेंद्र राऊत यांना दिले. बार्शी तालुक्यातील नागरिकांना अधिक सक्षम, आधुनिक व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आमदार राजेंद्र राऊत यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरु आहे.





# एसपीएम इंग्लिश स्कूलमध्ये सीड बॉल कार्यशाळा उत्साहात

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

एस. पी. एम. इंग्लिश स्कूल सोलापूर येथे परसबाग सोलापूर व शाळेच्या इको क्लब वतीने 'Seed Ball Preparation' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे मार्गदर्शन परसबाग सोलापूर चे अध्यक्ष व पर्यावरणप्रेमी शिरीष गोळवलकर आणि नारायण पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांना सीड बॉल म्हणजे काय, त्याची निर्मिती कशी करावी, त्यामागील वैज्ञानिक दृष्टिकोन तसेच पावसाळ्यात या सीड बॉलच्या माध्यमातून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कसे करता येते, याबाबत त्यांनी अतिशय सोप्या व प्रेरणादायी पद्धतीने माहिती दिली. शाळेच्या इको क्लब समितीने समन्वयक शिक्षिका शर्वरी कुलकर्णी, विद्यार्थी अध्यक्ष संस्कार जानगवळी, उपाध्यक्ष नवल माकणीकर यांनी उपक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत उपक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. मुख्याध्यापिका संगीता कोळी यांनी आभार मानले. यावेळी शाळा समिती अध्यक्ष अनिल बर्वे व सदस्य सुरेशबाबु मंकणी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत या उपक्रमाचे कौतुक केले.



# ओबीएल सामाजिक संस्थेतर्फे शालेय साहित्यांचे वाटप

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजांची जाणीव ठेवत ओबीएलसामाजिक संस्था यांच्या वतीने पितापूर येथील जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत लहान चिमुकल्या विद्यार्थ्यांना टिफिन, पाण्याच्या बॉटल्स आणि वह्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुल्फाम पठाण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांचे मनोबल उंचावले. या उपक्रमात इब्राहिम मुजावर यांचे योगदान लाभले. शेवटी मौला मुदगल यांनी आभार मानले. याप्रसंगी इब्राहिम शेख, राज बागवान, सलमान सातखेड, मोसिन गोल्डन, एजाज तुळजापूरे, सैफ अली दिना, जुबेर मुजावर, मोहसीन मुजावर, सोनू कुरेशी उपस्थित होते.



# संस्कृत सरल परीक्षेत हरिभाई देवकरण प्रशालेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

संस्कृत भारती पश्चिम महाराष्ट्र प्रान्त आयोजित संस्कृत सरल परीक्षा २०२५-२०२६ अंतर्गत सरला, सुगमा, सरसा व सुखदा या परीक्षा जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आल्या.

या परीक्षेला ७३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ४६ विद्यार्थ्यांनी विशिष्ट श्रेणी प्राप्त केली. तसेच २७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली. इयत्ता ५ वी ते १० वी चे विद्यार्थी या परीक्षेत सहभागी झाले. सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे, उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे,पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, महेंद्र रणधीर ,गणेश नेवरे, मारुती शहाणे तसेच दयानंद शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्रा. पन्हाळकर यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन कौतुक करण्यात आले. प्रस्ताविक संस्कृत विभाग प्रमुख निखिल बडवे यांनी केले. विद्यार्थी यादी वाचन अंजली ढगे यांनी केले. सर्व विद्यार्थ्यांना राघवेंद्र पिल्ले, अंजली ढगे व निखिल बडवे यांचे मार्गदर्शन लाभले. आभार राघवेंद्र पिल्ले यांनी मानले.

# खिलारवाडी-हलदहिवडी सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ४ जुलै-**

सांगोला तालुक्यातील खिलारवाडी येथे माजी आ. शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते खिलारवाडी (बागल वस्ती) ते हलदहिवडी या सिमेंट काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन सोहळा पार पडला.



याप्रसंगी जि.प.सदस्य दादासाहेब लवटे, पं.स.सदस्य बाळासाहेब बंडगर, उमेश पाटील, मानाजी खिलारी, प्रल्हाद खांडेकर, शंतनू खिलारी, सिद्धेश्वर गाडे, अमित पाटील, ओंकार पाटील, उमेश चव्हाण, विकास इंगोले, विजयसिंह खबाले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या रस्त्यामुळे खिलारवाडी, हलदहिवडी, गायगव्हाण, तिसंगी, गार्डी आणि शिरभावी या गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. यावेळी बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, मी आमदार असो वा नसो, तालुक्यातील तळागाळातील सर्वसामान्य माणसाच्या मूलभूत प्रश्नांसाठी कायमचा आग्रही राहीन. राज्यातील वरिष्ठ नेत्यांकडून तालुक्याच्या सर्व विकास प्रकल्पांसाठी लवकरात लवकर निधी आणून सर्व कामे पूर्णत्वास नेईन. तसेच या भागातील पाण्याच्या कॅनॉलचा फाटा प्रश्न लवकरच कायमस्वरूपी मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.



# आयटीआयच्या पेंटर जनरल तुकडीला निरोप; १०० टक्के शिकाऊ उमेदवारीचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

राणी कित्तूर चेन्नम्मा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची), सोलापूर येथील पेंटर जनरल व्यवसायाच्या विद्यार्थिनींचा निरोप समारंभ शनिवारी पार पडला.

यावेळी विद्यार्थिनींना ऑन-द-जॉब ट्रेनिंग (जगढ) प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच पेंटर जनरल बॅचला १०० टक्के शिकाऊ उमेदवारी मिळाल्याबद्दल विद्यार्थिनी आणि निदेशकांचा विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनियुक्त प्राचार्या इंदिरा रणभिडकर होत्या, तर मंत्री महोदयांचे स्वीय सहाय्यक संतोष गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राचार्या रणभिडकर यांनी जगढ चे महत्त्व स्पष्ट करताना प्रत्यक्ष उद्योगातील अनुभव, तांत्रिक कौशल्ये, शिस्त आणि जबाबदारी या गुणांमुळे विद्यार्थिनींच्या करिअरला नवी दिशा मिळते, असे सांगितले. टाटा मोटर्स (पुणे), पियाजिओ प्रा. लि. (बारामती) आणि माजगाव डॉक (मुंबई) येथे शिकाऊ उमेदवारीसाठी निवड झालेल्या विद्यार्थिनींचे त्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पेंटर निदेशक विवेक चंदालिया यांनी संस्थेतील प्रशिक्षणाचा उपयोग समाजहितासाठी आणि वैयक्तिक प्रगतीसाठी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात प्रशांत सुतार, तात्यासाहेब तांबे यांच्यासह दोन्ही बॅचमधील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. विद्यार्थिनींनी संस्थेतील आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# सीए फाऊंडेशनमध्ये दिशा इन्स्टिट्यूटचा प्रेम नोगजा देशात चौथा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

सीए फाऊंडेशन मे २०२६ परीक्षेत दिशा इन्स्टिट्यूटच्या प्रेम धनराज नोगजा याने ऑल इंडिया रँकमध्ये चौथा क्रमांक पटकावला आहे. यंदाच्या परीक्षेत दिशा इन्स्टिट्यूटच्या इतर विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश मिळवत संस्थेच्या निकालात भर घातली.

तनिष्का कटवे यांनी ३२२ गुण, कौस्तुभ पाटील यांनी ३१० गुण, हिमांक केनिया यांनी २८८ गुण, संगमेश कलशेट्टी यांनी २५५ गुण, अथर्व निचल यांनी २५३ गुण, तर श्रावणी पुला यांनी २१४ गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली. इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. नंदा भट्टड यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन केले. डॉ. भट्टड यांनी प्रेम धनराज नोगजा याचे अभिनंदन केले.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विविध अभियांत्रिकी कामे**

डीआरएम, मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-टेंडर मागवीत आहेत:टेंडर नोटीस क्रमांक: 07-2028-DEN-Tr दिनांक: ०२.०७.२०२६ कामाचे नाव: सोलापूर विभागात एच-बीम स्लीपर्ससाठी फिटिंग्जची तरतूद करणे. - (कुर्डूवाडी-मिरज) सेक्शनमधील / च्या अखत्यारीत ब्रिज अप्रोच आणि ब्रिज सेंट्रल स्लीपर्सचा वापर करून पुलांवरील स्लीपर्स बदलणे. कामाची अंदाजित किंमत: १४९,३५,६४८.७७ बयाणा रक्कम : २,९८,७००/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ (बारा) महिने, देखभाल कालावधी : काही नाही टेंडर फॉर्मची किंमत: काही नाही www.ireps.gov.in या वेबसाईटवर टेंडर सादर करण्याचा दिनांक आणि वेळ: २४.०७.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर टेंडर उघडण्याचा दिनांक आणि वेळ: २४.०७.२०२६ रोजी दुपारी १५:३० नंतर.

वेबसाईट तपशील: www.ireps.gov.in

टीप: इच्छुक कंत्राटदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी टेंडर बंद होण्याच्या तारखेपूर्वी या टेंडर वेबसाईटला www.ireps.gov.in वारंवार भेट द्यावी, जेणेकरून जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक त्यांच्या निदर्शनास येईल.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे),**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
AK/Sur-38

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर उभे राहून प्रवास करणे टाळा.


**जाहीर प्रसिद्धीकरण**

दिवाणी की. अ. नं. ०७/२०२६
नि. ६

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर साहेब यांच्या कोर्टात**

**तारामती अंकुश पवार**
वय : ६० वर्षे, धंदा : घरकाम
रा. कळंबवाडी (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर -- अर्जदार
**विरुद्ध**
**कोणी नाही** **-- सामनेवाले**

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, अर्जदार या मयत अंकुश नारायण पवार यांच्या कायदेशीर पत्नी असून, मयत अंकुश नारायण पवार यांचे दि. १४/०६/२०२५ रोजी निधन झाले आहे. अर्जदार व मयत अंकुश नारायण पवार यांच्यामध्ये मा. दिवाणी न्यायालय, बार्शी येथे हिंदू विवाह अधिनियम, कलम १० अन्वये दि. २०/०९/१९९६ रोजी चा हुकूम झाला होता. तथापि, दोघांमध्ये घटस्फोट झालेला नसल्यामुळे अर्जदार हीच मयताची कायदेशीर पत्नी आहे. मयताच्या नावे मौजे सासुरे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील गट नं. ५८७ ही जमीन असून, सदर मिळकतीवर वारस म्हणून नाव नोंदविण्यासाठी अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेकामी या मा. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, सदर मयत अंकुश नारायण पवार यांना अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणताही कायदेशीर वारस असल्यास अथवा कोणाचा वारस हक्क, हितसंबंध किंवा हरकत असल्यास, त्यांनी ही जाहीर प्रसिद्धी प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. सि. ज. सि. डि., बार्शी यांच्या न्यायालयात लेखी म्हणणे / हरकत दाखल करावी. अन्यथा, कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वारसाचा दाखला देण्याबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. पुढील नेमलेली तारीख ०४/०८/२०२६.

ही जाहीर प्रसिद्धीकरण दिले ता. ३०/०६/२०२६

**(सही)** **कनिष्ठ लिपीक** — शिक्का — **(सही)** **सहा. अधिक्षक**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमली तारीख: १८/८/२०२६
दि.कि.अ.नं. २६/२०२६
नि. ०५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**गजराबाई चंद्रभान काळदाते,** वय ८५ वर्षे,
धंदा-घरकाम, रा.येळंब, ता. बार्शी, जि.सोलापूर **-- अर्जदार**
**विरुद्ध**
**कोणी नाही** **-- गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार हिस मुलगा शहाजी चंद्रभान उर्फ चंद्रकांत काळदाते हा होता तो दि. ०४/१२/२०२१ रोजी येळंब ता.बार्शी जि.सोलापूर येथे मयत झालेला आहे. तसेच मयत शहाजी चंद्रभान उर्फ चंद्रकांत काळदाते यास आदिका शहाजी काळदाते ही पत्नी म्हणजेच अर्जदाराची सुन होती सदर आदिका शहाजी काळदाते ही दि. १८/१०/२०२३ रोजी येळंब ता.बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेली आहे. मयत शहाजी चंद्रभान उर्फ चंद्रकांत काळदाते व आदिका शहाजी काळदाते यांनी त्यांचे हयातीत बँकेत खाते उघडून रक्कम ठेवलेली आहे ते मयत झालेने यातील अर्जदार हीच त्यांची कायदेशीर वारस असलेने अर्जदारांनी सदर रक्कमेची मागणी केली असता तेथील अधिकाऱ्यांनी अर्जदारास वारस प्रमाणपत्राची मागणी केली असे कथन करुन अर्जदारांनी ती मयत शहाजी चंद्रभान उर्फ चंद्रकांत काळदाते व आदिका शहाजी काळदाते यांचे वारस असलेबाबत वारसप्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे कांही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतांनी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारखेस या मे.कोर्टात स्वतः अगर माहितगार वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. कोर्टाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख: ०४/०७/२०२६

**(सही)** **कनिष्ठ लिपीक** **दिवाणी न्यायाधीश** **क. स्तर, बार्शी** — शिक्का — **(सही)** **अधिक्षक** **दिवाणी न्यायाधीश** **क. स्तर, बार्शी**


**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**COMMISIONERATE OF HEALTH SERVICE**
**CIVIL SURGEON SOLAPUR**
E-mail: cssolapur@gmail.com Phone : 0217-2310745
District Hospital, Guru Nanak Chowk, Solapur 413003.

**SHORT-TERM EXPRESSION OF INTEREST (EOI) NOTICE STANDBY AIR AMBULANCE SERVICES FOR ASHADHI EKADASHI WARI 2026**

**EOI Reference Number - DHS/SOLAPUR/EOI/AIR-AMB/ASHADHI/05/2026**

Civil Surgeon, Solapur, on behalf of the Government of Maharashtra, invites online Expressions of Interest (EOI) from DGCA-approved, reputed Aviation Companies / Air Ambulance Service Providers for the positioning and operation of a dedicated Emergency Medical Air Ambulance.

**Scope of Service**

- Stationing a fully equipped Advanced Life Support (ALS) Air Ambulance (Helicopter/ FixedWing ready for immediate medical evacuation) on a standby, round-the-clock basis for critical patient transit during the Ashadhi Pandharpur Wari.
- Deployment Period: 7 Days (During peak pilgrim congregation period). Primary Evacuation Sectors: Pandharpur / Solapur to tertiary care hospitals in Pune and Mumbai.
- Essential Eligibility Criteria:
- Must hold a valid Non-Scheduled Operator's Permit (NSOP) issued by DGCA, India.
- Minimum 3 years of experience.
- Average Annual Financial Turnover of not less than INR 10 Cr during the last 3 audited financial years (FY 2022-23, 2023-24, 2024-25), certified by a registered CA.
- Onboard medical equipment must comply with Advanced Life Support (ALS) guidelines.
- Proven track record of managing medical air evacuations or VIP emergency charters.

The offer should be submitted within 7 days from the publication of this notice to the office of **"CIVIL SURGEON, DISTRICT HOSPITAL, GURU NANAK CHOWK SOLAPUR 413003"** with self-attested / original copies of supporting documents" personally or on mail mentioned below. The bids shall be opened after 7th day and received bids will be finalized within 3 days from then. There after bids will be considered as and when submitted. Government may hold conference meeting with prospective bidders. Government reserves its right to accept one or more bids or reject all bids if not found satisfactory or cancel this notice without giving any explicit reason thereof. **Email: cssolapur@gmail.com**
Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 10/07/2026 (17.00 PM)

Date : 04/07/2026

(Dr. Varsha Diophode)
Civil Surgeon Solapur

Aryan Creation



Classifieds

**पाहिजेत**

पार्ट-फुल टाईम राहत्या घरातून ऑनलाईन ऑफलाइन काम करून अधिक इन्कम मिळवा संधी सर्वांसाठी
संपर्क:
समाधान सर ९७६३२६४११५

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



# उत्कंठावर्धक अंतिम-32 सामन्यात अर्जेंटिनाचा केप वर्देवर 3-२ ने विजय

**मियामी, ४ जुलै**

फिफा विश्वचषकात अखेरच्या क्षणापर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या अंतिम-३२ फेरीच्या सामन्यात विश्वविजेत्या अर्जेंटिनाने केप वर्देवर ३-२ असा रोमहर्षक विजय नोंदविला आणि स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

अनेक उतार-चढावांनी रंगलेल्या या १२० मिनिटांच्या खेळात केप वर्देने विद्यमान विजेत्या अर्जेंटिनाला ऐतिहासिक धक्का देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांनी अर्जेंटिनाला खेळाच्या इतिहासातील एका मोठ्या धक्क्याच्या अगदी उंबरठ्यावर आणून ठेवले होते, परंतु अर्जेंटिना संघाने आपले अनुभव पणाला लावून विजय खेचून आणला आणि चाहत्यांची मने जिंकली, पण त्याआधी केप वर्देने आमच्यातही विश्वविजेत्या संघाला हरवून दाखविण्याची ताकद, जिद्द आणि कौशल्य आहे, हे दाखवून दिले.

मेस्सी व केप वर्देचा गोलरक्षक वोजिन्हा यांच्यातील आमनेसामनेच्या प्रसंगांपासून ते अतिरिक्त वेळेच्या उत्तरार्धात केप वर्देने केलेल्या दुसऱ्या बरोबरीच्या गोलपर्यंतचा थरार रोमांचक होता.

सामना संपल्याची शिट्टी वाजताच अर्जेंटिनाचे खेळाडू गुडघ्यावर बसले, तर प्रेक्षागृहात सुटकेचा निःश्वास, आनंद आणि नेहमीचा तो 'भक्तीभावाने' साजरा केला जाणारा जल्लोष पुन्हा एकदा पाहायला मिळाला. ३-२ अशा विजयामुळे आता अर्जेंटिनाचा अंतिम-१६ फेरीचा सामना अटलांटा येथे इजिप्तशी होणार आहे.



मियामी गार्डन्स येथे अंतिम-३२ फेरीच्या सामन्यादरम्यान केप वर्देचा गोलरक्षक वोझिन्हा (1) याच्याविरुद्ध पहिला गोल करताना अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सी (10)

पण केप वर्देचा संघ अजूनही हार मानण्यास तयार नव्हता. त्यांनी आक्रमक खेळ केला आणि लागोपाठ तीन कॉर्नर मिळविले. आणि १०२ व्या मिनिटाला सिडनी लोपेस कॅब्रालने आपल्या अद्भुत कौशल्याच्या जोरावर स्कोअर २-२ असा बरोबरीचा केला. तो गोल विश्वचषकातील महान क्षणांपैकी एक वाटला – ज्यामध्ये १९८६ मधील जोसिमार आणि १९९० मधील फ्रँकोइस ओमाम-बियिक यांच्या खेळाची झलक पाहायला मिळाली.

सामन्याच्या २९ व्या मिनिटाला अपेक्षेनुसार लिओनेल मेस्सीने गोलरक्षक वोजिन्हाला हुलकावणी देत गोल केला व अर्जेंटिनाला १-० अशी आघाडी मिळवून दिली, मध्यंतरानंतर ५९ व्या मिनिटाला डेरॉय दुआर्तेने गोल करून केप वर्देला १-१ अशी बरोबरी मिळवून दिली. अतिरिक्त वेळेत लिसांड्रो मार्टिनेझने ९२ व्या मिनिटाला गोल करून पुन्हा अर्जेंटिनाला २-१ असे आघाडीवर आणले, परंतु सिडनी सोपेझ कॅब्रिएलने १०३ व्या मिनिटाला गोल करून केप वर्देला २-२ अशी बरोबरी मिळवून दिली. मात्र अखेरच्या क्षणी अर्जेंटिनाला डिनेने १११ व्या मिनिटाला आत्मघाती गोल केला व अर्जेंटिनाचा ३-२ असा विजय निश्चित केला. ◂(वृत्तसंस्था)

# मेस्सीचा नवीन ऐतिहासिक विक्रम

**मियामी, ४ जुलै**

मियामी : फिफा विश्वचषकात केप वर्देविरुद्ध अर्जेंटिनाने ३-२ अशा फरकाने (अतिरिक्त वेळेत) मिळविलेल्या रोमांचक विजयादरम्यान लिओनेल मेस्सीने अनेक ऐतिहासिक विक्रम मोडीत काढले. मियामीमध्ये झालेल्या या सामन्यातील मेस्सीच्या अविश्वसनीय कामगिरीत २९ व्या मिनिटाला त्याने केलेले सुरुवातीचे गोल महत्त्वपूर्ण ठरले आणि त्याद्वारे त्याने काही प्रमुख टप्पे गाठले :-

सर्वाधिक गोल करणारा खेळाडू : हा गोल त्याच्या कारकिर्दीतील २० वा फिफा विश्वचषक गोल ठरला. त्यामुळे या स्पर्धेच्या इतिहासात सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूचा त्याचा विक्रम अधिक भक्कम झाला.

सलग गोल करण्याची मालिका : सलग आठ विश्वचषक सामन्यांमध्ये गोल करणारा तो इतिहासातील पहिला खेळाडू ठरला.

३० विश्वचषक सामने : मैदानात उतरताच, ३० विश्वचषक सामने खेळणारा तो इतिहासातील पहिला पुरुष खेळाडू झाला.

बाद फेरीत वर्चस्वः स्पर्धेच्या इतिहासात सलग पाच विश्वचषक बाद फेरीच्या सामन्यांमध्ये गोल करणारा तो पहिला खेळाडू ठरला.

गोलमधील सहभाग : विश्वचषकात गोलमधील सहभागाचा (गोल किंवा असिस्ट) त्याने १२ वा टप्पा गाठला. ◂(वृत्तसंस्था)



मियामी गार्डन्स, फ्लोरिडा येथे विश्वचषकाच्या अंतिम-३२ फेरीतील सामन्यानंतर केप वर्देचा गोलरक्षक वोझिन्हा याच्याशी संवाद साधताना अर्जेंटिनाचा लिओनेल मेस्सी (उजवीकडे)

## मेस्सी 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत आघाडीवर

लिओनेल मेस्सी ७ गोलसह २०२६ फिफा विश्वचषक 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत आघाडीवर आहे, तर कियालियन एमबाप्पे ६ गोलसह त्याच्या अगदी जवळ आहे. 'ॲडिडास गोल्डन बूट'च्या शर्यतीतील सर्वाधिक गोल करणारे खेळाडू आणि प्रमुख दावेदार खालीलप्रमाणे आहेत : लिओनेल मेस्सी (अर्जेंटिना)– ७ गोल, कियालियन एमबाप्पे (फ्रान्स) – ६ गोल, अर्लिंग हालंड (नॉर्वे)– ५ गोल, हॅरी केन (इंग्लंड)– ५ गोल, उस्मान डेम्बेले (फ्रान्स)– ४ गोल, विनिसिअस ज्युनियर (ब्राझील) – ४ गोल.

# इजिप्त उप–उपांत्यपूर्व फेरीत

**डॅलस, ४ जुलै**

डॅलस स्टेडियमवर झालेल्या फिफा २०२६ फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम-३२ फेरीच्या सामन्यात १-१ अशी बरोबरी झाल्यानंतर, पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये इजिप्तने ऑस्ट्रेलियाचा ४-२ असा पराभव करून स्पर्धेच्या ऐतिहासिक उप-उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

इजिप्त संघाने इमाम अशूरच्या गोलमुळे सुरुवातीलाच आघाडी घेतली होती; मात्र उत्तरार्धात मोहम्मद हानीने स्वतःच्याच गोलपोस्टमध्ये (आत्मघाती गोल) हेडरद्वारे चेंडू मारल्याने सामना अतिरिक्त वेळेत गेला.

अतिरिक्त वेळेत दोन्ही संघांना निर्णायक गोल करता आला नाही, तरीही इजिप्तने अधिक चांगल्या संधी निर्माण केल्या आणि सामन्याच्या शेवटी ते अधिक प्रभावी ठरले.

इजिप्तकडून महमूद साबेर, रामी राबिया, मोहम्मद सलाह आणि होसाम अब्देल-मजीदने पेनॉल्टीवर गोल केले, तर ऑस्ट्रेलियाकडून जॅक्सन इर्विन आणि अवर माबिलने गोल नोंदविले, मात्र हॅरी साउटर व लुकास हेरिंग्टन गोल करण्यात अपयश आले, त्यामुळे इजिप्तने आपल्या विश्वचषक इतिहासातील एका अविस्मरणीय विजयाची नोंद केली.



या विजयाबरोबरच इजिप्तने 'अंतिम-१६' मध्ये स्थान मिळविले आहे,. आता ७ जुलै रोजी अटलांटा स्टेडियमवर त्यांचा उप-उपांत्यपूर्व सामना विश्वविजेत्या अर्जेंटिनाशी होईल.

आफ्रिकन फुटबॉलसाठी ही स्पर्धेतील आणखी एक महत्त्वाची घटना ठरली; कारण 'अंतिम-१६' फेरीमध्ये पोहोचणाऱ्या आफ्रिकन खंडातील संघांमध्ये आता मोरोक्कोसोबत इजिप्तचाही समावेश झाला आहे.

पाचव्या मिनिटाला ख्रिस्टियन वोल्पॅटोचा जोरदार फटका क्रॉसबारला लागल्याने ऑस्ट्रेलियाने इजिप्तला धक्का देण्याची चिन्हे निर्माण केली होती. मात्र, इजिप्तने त्वरित प्रत्युत्तर दिले आणि सुरुवातीच्या टप्प्यावर सामन्यावर आपले वर्चस्व निर्माण केले. १३ व्या मिनिटाला इजिप्तला यश मिळाले; करीम हाफेझने डाव्या बाजूने अचूक 'क्रॉस' दिला आणि अशूरने उंच उडी मारत हेडरद्वारे ऑस्ट्रेलियन गोलरक्षकाला चकवून गोल केला. आक्रमक आणि बचावात्मक अशा दोन्ही आघाड्यांवर प्रभावी कामगिरी केल्यामुळे अशूरला 'सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू' हा पुरस्कार देण्यात आला.

५५ व्या मिनिटाला ऑस्ट्रेलियाने बरोबरी साधली; एका धोकादायक फ्री-किकचा चेंडू दूर करण्याचा प्रयत्न करताना हानीने चेंडूवर हेडर मारला, पण तो चेंडू गोलरक्षक शोबेरला चकवून स्वतःच्याच जाळीत गेला. ◂(वृत्तसंस्था)

# कोलंबियाचा 'अंतिम १६' मध्ये प्रवेश

**कॅन्सस सिटी, ४ जुलै**

जॉन एरियासने नोंदविलेल्या एकमेव महत्त्वपूर्ण गोलच्या बळावर कोलंबियाने घानावर १-० असा विजय नोंदवून फिफा फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम-१६च्या फेरीत प्रवेश केला.

बाकावरून मैदानात उतरल्यानंतर काही वेळातच लुईस सुआरेझने जॉन एरियासला निर्णायक गोलसाठी मदत केली. या विजयामुळे कोलंबियाचा मंगळवारी व्हँकुव्हर येथे स्वित्झर्लंडविरुद्ध होणारा 'अंतिम १६' मधील सामना निश्चित झाला.

२०१४ च्या विश्वचषकात उपांत्यपूर्व फेरीत ब्राझीलकडून पराभूत होऊन त्यांनी जी सर्वोत्तम कामगिरी केली होती, तिची बरोबरी (किंवा त्याहून चांगली कामगिरी) करण्याची क्षमता या संघात नक्कीच दिसून येते.



कॅन्सस सिटी, मिसूरी येथे अंतिम-३२ फेरीतील सामन्यादरम्यान चेंडूसाठी संघर्ष करताना घानाचा अँटोइन सेमेन्यो (मध्यभागी), कोलंबियाच्या जेफरसन लेर्मा (16) आणि डॅनियल मुनोझ

या विजयाचे महत्त्व खूप मोठे आहे, असे त्यांचे व्यवस्थापक नेस्टर लोरेन्झो म्हणाले. लोरेन्झो हे १९९० च्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात पराभूत झालेल्या अर्जेंटिना संघाचा भाग होते; जर त्यांचा संघ स्वित्झर्लंडला हरवून पुढे गेला, तर उपांत्यपूर्व फेरीत त्यांना आपल्याच देशाच्या (अर्जेंटिना) संघाचा सामना करावा लागू शकतो. ◂(वृत्तसंस्था)

### आजचे सामने
### अंतिम-1६ फेरीचे सामने

**ब्राझील वि. नॉर्वे**
**वेळ :** रात्री १.३० वाजता
स्थळ : न्यू यॉर्क स्टेडियम

**मेक्सिको वि. इंग्लंड**
**वेळ :** पहाटे ५.३० वाजता
**स्थळ :** मेक्सिको सिटी स्टेडियम, मेक्सिको

**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५) वर

# कदार विजापूर व फैज कादरी संघांचा विजय

## लिटिल चॅम्प १२ वर्षाखालील क्रिकेट : समृद्धी चट्टे व रोमाण शेख सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

लिटिल चॅम्प १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत कदार विजापूर आणि फैज कादरी संघांनी अनुक्रमे अंबादास पवार आणि रामभाऊ देगावकर संघांवर एकतर्फी विजय मिळवत शानदार कामगिरी केली.

जुळे सोलापूरातील भंडारी मैदानावर शनिवारी झालेल्या सामन्यात सामन्यात कदार विजापूर संघाने शानदार कामगिरी करत अंबादास पवार संघाचा तब्बल १00 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना कदार विजापूरने २६ षटकांत ३ बाद १४0 धावांची भक्कम धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरात अंबादास पवार संघाचा डाव कदार विजापूरच्या अचूक गोलंदाजीपुढे अवघ्या १४.१ षटकांत ४0 धावांवर गारद झाला.

कदार विजापूरच्या समृद्धी चट्टे हिला तिच्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीसाठी सामनावीर पुरस्कार देण्यात आला. तिने फलंदाजीत ३३ चेंडूत ४ चौकारांसह नाबाद २९ धावा केल्या, तसेच गोलंदाजीत २ षटकांत २ निर्धाव षटके टाकत ३ धावा देऊन ३ बळी घेतले. दुसऱ्या सामन्यात फैज कादरी संघाने रामभाऊ देगावकर संघाचा ८ गडी राखून पराभव करत शानदार विजय मिळवला. रामभाऊ देगावकर संघाने प्रथम फलंदाजी केली. मात्र, त्यांचा पूर्ण डाव १६ षटकांत अवघ्या ३२ धावांवर आटोपला. विजयासाठी मिळालेले ३३ धावांचे लक्ष्य फैज कादरी संघाने अवघ्या ६ षटकांत २ बाद ३४ धावा करत सहज पूर्ण केले. उत्कृष्ट गोलंदाजी करणारा एम. रोमाण शेख सामन्याचा मानकरी ठरला. त्याने ३ षटके गोलंदाजी करताना २ षटके निर्धाव टाकली आणि फक्त १ धाव देऊन २ बळी घेतले. या दोन्ही सामन्यांमध्ये अशोक डोंबाळे व परवीन कुलकर्णी यांनी पंच म्हणून, तर शुभम मुत्तूर यांनी स्कोअरर म्हणून काम पाहिले.





# सोलापूरच्या संध्याराणी बंडगर, उमेश बडगेर व गिरिजा येरवडेकर यांचा अंतिम फेरीत प्रवेश

## वरिष्ठांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

वरिष्ठांच्या पाचव्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत ४0 वर्षांवरील महिला गटात उपांत्य फेरीत सोलापूरच्या संध्याराणी बंडगर, गिरिजा येरवडेकर यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली एम एसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल आणि इलिझियम क्लबच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत ४0 वर्षांवरील महिला गटात पहिल्या उपांत्य फेरीच्या लढतीत अव्वल मानांकित सोलापूरच्या संध्याराणी बंडगरने शितल गोरुलेचा ६-४, ६-१ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात दुसऱ्या मानांकित गिरिजा येरवडेकरने धर्मिष्ठावर ६-१, ६-0 असा विजय मिळवत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. ३0 वर्षापुढील पुरुष गटात सोलापूरच्या उमेश बडगेरने चेन्नईच्या बालाजी पारीचा टायब्रेकर सेटमध्ये ७-५,६-१,१0-७ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.



आजचे निकाल: ४0 वर्षांवरील पुरुष: उपांत्य फेरी: संदीप पवार१ (भारत) वि.वि. पंकज अहलावत (भारत) ६-१, ६-१; रमझान शेख (भारत)वि.वि.भरत पॉल सिंग (भारत) ६-२, ६-१;

**४५ वर्षांवरील पुरुष: उपांत्यपूर्व फेरी:**

नितेश रुंगता (भारत) वि.वि.कुमार रावा (भारत) ६-२, ६-१; नरेंद्र सिंग चौधरी (भारत) वि.वि.आशुतोष शर्मा (भारत) ६-0, ६-१; बोसेकिरननाल्लमोथु (भारत) वि.वि.चंद्रशेखर व्ही (भारत)४ ६-३, ६-१; संदीप बेडेकर(भारत)३वि.वि.सुमेश नायर(भारत)३-६, ६-१, ११-९.

**४0 वर्षांवरील महिला: उपांत्य फेरी:**

गिरिजा येरवडेकर २ (भारत) वि.वि.धर्मिष्ठा (भारत) ६-१, ६-0; संध्याराणी बंडगर१ (भारत) वि.विशितल गोरुले (भारत) ६-४, ६-१.



# फरहान बागवान, यस्मिता लीला सोलापूर जिल्हा बास्केटबॉल कर्णधार

## छत्रपती संभाजीनगर येथील राज्य बास्केटबॉल स्पर्धेत सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**

सोलापूर जिल्हा बास्केटबॉल संघाच्या कर्णधारपदी फरहान बागवान, यस्मिता लीला यांची निवड करण्यात आली.

छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक ४ जुलैपासून सुरू झालेल्या १६ वर्षांखालील ४१ व्या राज्य चॅम्पियनशीप बास्केटबॉल स्पर्धेत मुले व मुली दोन्ही संघ सहभागी झाले. सोलापूर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव साकिब शेख शेख यांनी हे संघ जाहीर केले. संघास जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष के. डी. पाटील, उपाध्यक्ष मनोज यलगुलवार, खजिनदार दिनेश सारंगी आणि अभिजित टाकळीकर यांनी शुभेच्छा दिल्या.

**संघ :**

**मुली :** यस्मिता लीला (कर्णधार), वृष्टी बिनगे, नेहारिका मोने, रुषिता मोने, सीया कांबळे, गागी देशपांडे, वाफिया अतार, आर्या वाघमारे, माही देशमाने, अवणी साबळे, अभिरा तिवारी, संयुक्ता बारंगुळे. प्रशिक्षक -ताबेज शेख.

**मुले :** फरहान बागवान (कर्णधार), अभिराज तिडके, अबुबकर इनामदार, समर्थ उकले, सुवेज तांबोळी, यश हारबोळे, उमेर जमादार, वेदांत तमशेट्टी, रनविरसिंग गौर, नोमान मुजावर, शशांक सावंतुल, , अंरहत घुर्गे. प्रशिक्षक - नावेद मुन्शी.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### कुर्डूवाडीत अमर जवान अब्दुल हमीद यांची जयंती साजरी

**कुर्डुवाडी, दि. ४ जुलै-**

काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभागातर्फे परमवीर चक्र विजेता अमर जवान अब्दुल हमीद यांची जयंती साजरी झाली. प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काँग्रेस अल्पसंख्याक शहराध्यक्ष हमीद शिकलकर, काँग्रेस कमिटी शहराध्यक्ष फिरोज खान, रफिक सय्यद, अतुल गोरे, साबीर शिकलकर, सोहेल सय्यद, वालिमोहमद शेख आदी उपस्थित होते. संयोजक हमीद शिकलकर यांनी आभार मानले.

### महेश इंगळे यांनी घेतले तुळजाभवानी मातेचे दर्शन

**अक्कलकोट दि. ४ जुलै**

तुळजाभवानी मातेच्या चरणी नतमस्तक होऊन मनाला विलक्षण ऊर्जा व शांती मिळाल्याचे मत श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी व्यक्त केले. नगरसेवक महेश इंगळे यांनी नुकतीच तुळजापूर येथील आई तुळजाभवानी मंदीरास भेट देऊन आई तुळजाभवानीचे दर्शन घेतले. यावेळी तुळजाभवानी मंदिर समिती संस्थानचे पीआरओ सचिन साळुंखे, पुजारी राम छत्रे यांनी त्यांचा आई तुळजाभवानीची प्रतिमा, श्रीफळ देवून सत्कार केला. यावेळी महेश इंगळे बोलत होते. यावेळी तुळजाभवानी देवस्थानचे धार्मिक विधी प्रमुख शितोळे साहेब, चंद्रकांत पवार, बाळासाहेब एकबोटे, संदीप पंडित, मनोज जगताप, ज्ञानेश्वर भोसले, श्रीशैल गवंडी, सागर गोंडाळ, रमेश शिंदे, स्वामीराव मुसळे आदींसह भाविक उपस्थित होते.



### स्वामिनी पार्क मधील श्री गणेश मंदिरात संकष्टी चतुर्थी भक्तीभावाने साजरी

**अक्कलकोट, दि. ४ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मैंदर्गी रस्त्यावरील स्वामिनी पार्क मधील श्री गणेश मंदिरात शुक्रवारी संकष्टी चतुर्थी मोठ्या भक्ती भावाने साजरी करण्यात आली. मंदिरात सायंकाळी बालाजी सुंटनुरे व विजयालक्ष्मी सुंटनुरे या दांपत्याच्या हस्ते पूजा करण्यात आली. भक्तांना प्रसाद रुपी मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. पूजेचे मानकरी सुंटनुरे दांपत्याचा सत्कार अरविंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी अतुल जाधव , माजी सैनिक श्रीकांत मोरे , जयसिंग शिर्के , पिंटू गोंधळ ,प्रवीण घाडगे , गोटू माने , निखिल पाटील , सेवानिवृत्त होमगार्ड अधिकारी हंद्राळमठ , प्रतिभा जाधव , अश्विनी सिंदगीकर ,सुरेखा होदलूरे , नम्रता सगर ,दीपिका बकरे आदींसह बालगोपाळांसह गणेश भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रिक्षाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

डीमार्ट ते कल्याण नगर येथे दुचाकीवरून डबलसीट जात असताना पाठीमागून एमएच १३- ४०७७ या क्रमांकाची रिक्षा धडकल्याने नागप्पा करनूल (वय ५० रा.लष्कर सोलापूर ) हा इसम जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडला. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून येथील येथील शासकीय रुग्णालयात सतीश (मुलगा) यांनी दाखल केले.

### गांधीनगर झोपडपट्टीत शस्त्राने मारहाण

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

एमआयडीसी परिसरातील गांधीनगर झोपडपट्टी क्र.६ येथे घराजवळ सांडपाणी का टाकतो म्हणून दगड लाथाबुक्क्या आणि धारदार शस्त्राने केलेल्या मारहाणीत बाळासाहेब गायकवाड (वय ३०) हा जखमी झाला. ही घटना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. शरणप्पा महेश गायकवाड आणि इतर तिघांनी मिळून मारहाण केली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### साठे शिंदे वस्ती येथे महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. ४ जुलै-**

डोणगाव रोडवरील साठे शिंदे वस्ती येथे या जागेवर घर का बांधले असे विचारत लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत लक्ष्मी संगटेकर (वय ४५) ही महिला जखमी झाली. ही घटना आज शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. त्यांना चैतन्य पाटील याने मारहाण केली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## निधन वृत्त...

### हनीफ शेख



**सोलापूर, दि. ४ जुलै-**

भवानी पेठ परिसरातील रहिवासी म.हनीफ उमरअली शेख यांचे अल्पशा आजाराने राहत्या घरी शनिवार ४ जुलै रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ६८ वर्षाचे होते. त्यांची अंत्ययात्रा मुस्लिम पाच्छा पेठ येथील राहत्या घरापासून काढून अक्कलकोट रोड जडेसाहब मुस्लिम कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला. डॉ. ए. एम. शेख (जमियत ए उलमा) व सोलापूर बार असोसिएशन येथील ॲड. अब्दुल शेख यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे .

# वारीत प्रथमच एअर ॲम्ब्युलन्सची सुविधा

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर; आरोग्य सुविधांबाबतच्या आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जुलै -**

आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या गर्दीतून वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका, बाईक ॲम्बुलन्सचा वापर करण्यात येतो. यावर्षीपासून अत्यावश्यक रुग्णांकरिता एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना पालखी मार्ग व तळांवर देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, ऑनलाईनद्वारे आमदार अभिजीत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, नगराध्यक्षा प्रणिता भालके, पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.



### ४३ ठिकाणी सुसज्ज आयसीयूची सुविधा

पालखी मार्गावर ४३ ठिकाणी सुसज्ज आयसीयूची सुविधा असेल. प्राथमिक उपचारांसाठी १५६ ठिकाणी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' उभारणार आहेत. २१५ फिरते आरोग्य दूत नेमणार आहेत. पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांमध्ये १६ ठिकाणी सुसज्ज आयसीयू कक्ष व १७ ठिकाणी तात्पुरते 'आपला दवाखाना' सुरू राहणार आहेत. पालखी मार्गावर ३५३ रुग्णवाहिका सज्ज असतील. दिंडी प्रमुखांना प्राथमिक औषधोपचार किटचे वाटप करणार आहे. ३ हजार ८७ वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी तसेच फिरते मनुष्यबळ उपलब्ध असेल. ३०२ विशेष तज्ज्ञांची नेमणूक करणार आहे. पंढरपूर येथे तीन दिवस आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे, असेही मंत्री आबिटकर म्हणाले.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, ''वारकरी वारीसाठी घरातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा घरी पोहोचेपर्यंत आरोग्याच्या सर्व आवश्यक सुविधा पुरवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. त्या नियोजनाप्रमाणे सर्व सेवा पुरवाव्यात. वारी कालावधीत भाविकांना डिजिटल आरोग्य सुविधा देणार आहेत. 'आरोग्य संपन्न वारी' व 'वारी सहाय्य' या माध्यमातून पालखी मार्गावर वारकरी भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत. प्रत्येक आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांच्यामार्फत माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.''

वारी कालावधीत आरोग्य सुविधा देण्यासाठी पंढरपूर येथील स्थानिक डॉक्टरांची उपलब्धता राहण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकांनी स्वतंत्र बैठक घेऊन त्यांना सूचना द्याव्यात. पालखी मार्गावरील तसेच शहरातील खासगी वैद्यकीय रुग्णालयांतील दहा टक्के खाटा आरक्षित करण्यात येणार आहेत, असेही आबिटकर यांनी सांगितले. आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर जिल्हा रुग्णालयातील २०० बेडच्या हॉस्पिटलसाठी आवश्यक ती कार्यवाही करून हॉस्पिटल सर्व सुविधायुक्त कार्यान्वित करावे, अशी मागणी केली. वारी कालावधीत शहरात आयसीयू सेंटरची संख्या वाढवावी, असेही सांगितले. आमदार राजू खरे यांनी पालखी मार्गावरील सुविधा व उपजिल्हा रुग्णालयातील सुविधा व स्वच्छता कायम ठेवावी, असे सांगितले. आमदार अभिजीत पाटील यांनी वारी कालावधीत ६५ एकर परिसरात आरोग्य शिबिराचे आयोजन करावे, अशी मागणी केली. नगराध्यक्षा प्रणिता भालके यांनी वारी संपल्यानंतरही आरोग्य सुविधा उपलब्ध ठेवाव्यात, असे सांगितले. आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार यांनी पीपीटीद्वारे वारी कालावधीत वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

**पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयाला भेट**

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे भेट देऊन रुग्णालयाची स्वच्छता पाहिली. रुग्णांशी संवाद साधून आरोग्य सुविधांची माहिती घेतली. आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

# सायन्स ऑलिंम्पियाड फाउंडेशनच्या परीक्षेत सुयश विद्यालयाचे यश

## ३५ विद्यार्थ्यांची सुवर्ण कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जुलै -**

सुयश विद्यालय, बार्शी येथे राबविण्यात येणाऱ्या फाउंडेशन कोर्सच्या गुणवत्तेचा पुन्हा एकदा प्रत्यय आला आहे. सायन्स ओलंपियाड फाउंडेशन ( अंतर्गत घेण्यात आलेल्या सायन्स ओलंपियाड व मॅथेमॅटिक्स ओलंपियाड या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत इंटरनॅशनल गोल्ड, इंटरनॅशनल ब्राँझ, झोनल गोल्ड व झोनल ब्राँझ पदकांची भरघोस कमाई केली.

सुयश विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व विविध स्पर्धा परीक्षांची भक्कम तयारी व्हावी या उद्देशाने फाउंडेशन कोर्स प्रभावीपणे राबविण्यात येतो. या कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सायन्स, गणित व इंग्रजी विषयांच्या आंतरराष्ट्रीय ओलंपियाड परीक्षांसाठी सक्षमपणे तयार केले जाते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यालयातील ३५ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करुन विद्यालयाचा नावलौकिक उंचावला.

सायन्स ओलंपियाड- झोनल ब्राँझ पदक विजेते विद्यार्थी-



मानस मारुती जाधव- झोनल ब्राँझ, सानवी संदीप गायकवाड- झोनल ब्राँझ, स्नेहजीत संजय पाटील- झोनल ब्राँझ, स्वराली श्रीनिवास धोंगडे- झोनल ब्राँझ, आरोही नरसिंह अंबुरे- झोनल ब्राँझ, विरेन आशय सातारक - झोनल ब्राँझ, अद्विक जयकुमार घनचेकर- झोनल ब्राँझ, मनस्वी रविकांत शिंदे- झोनल ब्राँझ, युवा मयूर बलदोटा - झोनल ब्राँझ, अद्विका धीरज पवार- झोनल ब्राँझ, रेहान शाहिद सौदागर- झोनल ब्राँझ, अविनाश गणेश शिंदे- झोनल ब्राँझ, अवंती सुदर्शन पवार- झोनल ब्राँझ, अन्वी प्रसाद तळेकर- झोनल ब्राँझ.

मॅथेमॅटिक्स ओलंपियाड-इंटरनॅशनल गोल्ड/ झोनल गोल्ड/ इंटरनॅशनल ब्राँझ पदक विजेते विद्यार्थी- ओवी समाधान रोटे - इंटरनॅशनल गोल्ड, नक्षत्रा धनेश जगदाळे- इंटरनॅशनल गोल्ड, रेहान शाहिद सौदागर- इंटरनॅशनल गोल्ड, श्लोक नरेंद्र कंगेटी- इंटरनॅशनल गोल्ड, शौर्य उमेश देशमाने- इंटरनॅशनल गोल्ड, मनस्वी रविकांत शिंदे- इंटरनॅशनल गोल्ड, अनिरुद्ध गणेश राऊत- झोनल गोल्ड, विरेन आशय सातारकर - इंटरनॅशनल ब्राँझ पदक, आरोही नरसिंह अंबुरे- इंटरनॅशनल गोल्ड, स्वराली श्रीनिवास धोंगडे- इंटरनॅशनल गोल्ड, त्रिशा तुषार पाडुळे- इंटरनॅशनल गोल्ड, सानवी संदीप गायकवाड - इंटरनॅशनल गोल्ड, मानस मारुती जाधव- इंटरनॅशनल गोल्ड, कार्तिक श्रीपाद कोळेकर- इंटरनॅशनल गोल्ड, कुणाल बिरमल रोंगे- इंटरनॅशनल गोल्ड, वेणू सचिन बुरांडे- इंटरनॅशनल गोल्ड, अभिनव अजित निकम- इंटरनॅशनल गोल्ड.

विद्यार्थ्यांना सायन्स विषयासाठी मोनल डमरे व अमृता गवारे तर गणित विषयासाठी लता आंबुरे व अनुराधा जाधव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बार्शी नगरपरिषदेचे उप मुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे हे उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक शिवदास नलवडे, मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, मुख्याध्यापिका अलका जगताप तसेच उपमुख्याध्यापक येवले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



## दरोड्याचा छडा लावल्याबद्दल सराफ व्यावसायिकांतर्फे पोलिसांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै -**

सोलापूरच्या गुन्हे शाखेने ७२ तासांत सशस्त्र दरोड्याचा छडा लावल्याबद्दल सोलापूर सराफ असोसिएशन आणि सुवर्णकार संघातर्फे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार झाला.

शहरातील ७० फूट रोडवरील शिवकुमार ज्वेलर्स येथे पिस्तुलाचा धाक दाखवून सोन्याचे नेकलेस लुटणाऱ्या पुणे येथील दोन सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याकडून ६ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या या वेगवान आणि धाडसी कामगिरीमुळे सराफ व्यापाऱ्यांमधील भीतीचे वातावरण दूर झाले असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. सत्कार सोहळ्यात पोलिस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त यावलकर, उपायुक्त अश्विनी पाटील, दिलीप पवार व अरविंद माने यांच्यासह संपूर्ण गुन्हे शाखा आणि तपास टीमला सन्मानित करण्यात आले.

सोहळ्याप्रसंगी सराफ व्यापारी संघाचे अध्यक्ष गिरीश देवरमनी, उपाध्यक्ष सिद्धाराम शिंगारे, सुवर्णकार संघाचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, चडचणकर बंधू, देगावकर बंधू, व्यंकटेश बिटला, व्यंकटेश म्हंता, अमित शिरशी, पराग गांधी, अमोल शहाणे, नागेंद्र रायकर, अनिल बिराजदार, नाना कळसकर, आनंद भीमनपली, भीमा करजगीकर, लक्ष्मण भाईकट्टी, संजय ताडमारे, गिरीश शहाणे, येलगंटी आदी पदाधिकारी व सराफ व्यावसायिक उपस्थित होते.

## तांदुळवाडी येथील 'हनुमान हायस्कूल'चा ४२ वा वर्धापन दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ४ जुलै -**

तांदुळवाडी ता. माळशिरस येथील 'हनुमान हायस्कूल व ज्युनियर कॉलेज' चा ४२ वा वर्धापन दिन विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांनी साजरा झाला. सुरुवातीला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व ह. भ. प. सुखदेव शिंदे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त किसन करंडे होते.व्यासपीठावर सचिव ज्ञानेश्वर उघडे, उपाध्यक्ष दत्तात्रय उघडे, विश्वस्त शशिकांत कदम, बापूसाहेब काकडे, प्राचार्य देवकर, पर्यवेक्षक कुचेकर, निनाद पाटील, अभिजित जाधव, उदय कदम, ओंकार आडत, सतिश पारसे उपस्थित होते.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून इयत्ता १० वी आणि १२ वी मधील गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा विशेष सन्मान केला. प्रत्येक वर्गातून




निवडलेल्या 'आदर्श विद्यार्थी' आणि 'आदर्श वर्ग' यांना सन्मानचिन्ह दिले. गरजू मुला-मुलींना मोफत गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप केले.

शाळेने ५ वर्षांपासून लावलेल्या ५ झाडांचे यशस्वी संगोपन केल्याबद्दल, माळशिरस तालुका पत्रकार संघाकडून शाळेला ५ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह दिले. कामधेनू सेवा परिवाराबाबत संस्थापक डॉ. लक्ष्मण आसबे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे निनाद पाटील यांनी विद्यार्थ्यांनी भविष्यात मोठे अधिकारी बनण्यासाठी कठोर परिश्रम करावेत, असे सांगितले. कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साळुंखे यांनी केले. आभार प्रा. गायकवाड यांनी मानले.



## यमाई तलाव बचावासाठी विशेष सभा घ्या

### नगरसेवकांची मागणी; गोशाळेसाठी जागा देण्याच्या निर्णयाला विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.४ जुलै -**

शहरातील यमाई तलावालगतची सुमारे ३.१२ हेक्टर जागा आणि त्या ठिकाणी शासनाने आरक्षित केलेल्या पिकनिक स्पॉटचे आरक्षण बदलून ती जागा श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला गोशाळा विस्तारासाठी देण्याचा निर्णय नगरपरिषदेला विश्वासात न घेता घेतल्याचा आरोप करत नगरसेवकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. निर्णयाच्या निषेधार्थ पंढरपूर नगर परिषदेची विशेष सर्वसाधारण सभा तातडीने बोलवावी, अशी मागणी नगराध्यक्षा डॉ. प्रणिता भालके यांच्याकडे केली आहे.

आरक्षण उठवताना नगरपरिषद सर्वसाधारण सभेची मान्यता बंधनकारक आहे. परंतु, पंढरपूर नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी न घेता परस्पर गोशाळेसाठी जागा देण्याचा प्रयत्न शासनाकडून होत असल्याने पंढरपूरकरांत तीव्र नाराजी आहे

नगराध्यक्षांकडे गटनेते भागवत बडवे, सुजितकुमार सर्वगोड, नगरसेवक लक्ष्मण शिरसट, अमोल डोके, ॲड. सुनील वाळूजकर, विनायक संगीतराव, गुरुदास अभ्यंकर यांच्या शिष्टमंडळाने मागणी केली आहे. यावेळी नगरसेवक ओंकार जोशी, राहुल शिंदे अक्षय गंगेकर नागेश यादव उपस्थित होते. नगराध्यक्षांनी विशेष सर्वसाधारण सभा लवकरच आयोजित केली जाईल, असे आश्वासन दिले.

# संजय गांधी लाभार्थ्यांना मिळेनासे झाले दाखले

- नव्या बदलांचा फटका; शाळेचा व जन्माचा दाखला मिळणे अवघड
- आ.समाधान आवताडे यांनी लक्ष घालण्याची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. ४ जुलै -**

संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी शासनाने दि.२७ मार्च २०२६ रोजी केलेल्या बदलांचा खऱ्या लाभार्थ्यांना फटका बसत आहे. बदलांमुळे लाभार्थ्यांना शाळेचा व जन्माचा दाखला मिळणे अवघड झाले आहे. आ.समाधान आवताडे यांनी याची दखल घेवून अधिवेशनात प्रश्न उपस्थित करुन पर्यायी मार्ग काढावा अशी मागणी होत आहे.

लाभार्थी अर्थात अर्जदार यांना जन्म प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला बंधनकारक केला आहे. काही लाभार्थ्यांनी शिक्षण न घेतल्यामुळे व वयाची नोंद ग्रामपंचायतकडे न केल्याने त्यांना अडचणीचे ठरत आहे. यापुर्वी ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला वयाचा दाखला ग्राह्य मानला जात होता. मात्र नवीन आदेशामुळे तो अमान्य केल्याने जे लाभार्थी शाळेतच गेले नाहीत, त्यांना शाळा सोडल्याचा दाखला मिळणे अशक्य बनले आहे. पुर्वी माता ह्या बाळाला जन्म घरीच देत असल्यामुळे जन्माची नोंद करण्याची प्रथा नसल्यामुळे जन्म दाखलाही मिळणे जिकरीचे ठरले आहे. अशा पात्र निराधार व्यक्तींच्या पुढे हे दाखले मिळविणे एक यक्षप्रश्न बनला आहे. खरे लाभार्थी लाभापासून वंचित राहत असल्याचे विदारक चित्र पहावयास मिळत आहे.

सध्याच्या युगात प्रत्येकजण शाळेत जात असल्यामुळे शाळेत दाखला व ग्रामपंचायतला जन्माचा दाखला सहज उपलब्ध होत आहे. मात्र पुर्वीच्या लोकांनी शिक्षणच घेतले नाही तर दाखला मिळणार कसा? असा सवाल ही उपस्थित होत आहे. आ.समाधान आवताडे यांनी हा गंभीर प्रश्न चालू अधिवेशनात मांडून याला पर्यायी मार्ग काढून निराधार व्यक्तींसमोर असलेला प्रश्न तात्काळ सोडवून त्यांना लाभ मिळवून द्यावा अशी मागणी होत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### सावकाराला पैसे देण्याच्या कारणावरुन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.४ जुलै-**
सावकाराला पैसे देण्याच्या कारणावरुन एकाने विषारी द्रव्य पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. सुनील महादेव जाधव (वय-४४, रा.उमानगरी, मुरारजी पेठ, सोलापूर) असे त्याचे नाव आहे. शनिवार, दि.४ जुलै २०२६ रोजी सकाळच्या सुमारास त्याने विषारी द्रव्य पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याला एका खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन पत्नी गीतांजली जाधव यांनी शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले.

---

### पायी जात असताना चक्कर येऊन पडल्याने ३९ वर्षीय युवकाचा मृत्यू

**सोलापूर, दि.४ जुलै-**
पायी चालत जात असताना चक्कर येऊन पडल्याने एका ३९ वर्षीय युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सायबू चंद्रप्पा काकलर (रा.स्वागतनगर, सोलापूर) असे त्याचे नाव आहे. शनिवार, दि.४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास स्वागतनगर येथील दिकोंडा कॅन्टीन येथून तो पायी घराकडे निघाला होता. ज्ञानेश्वर शाळेजवळ येताच चक्कर येऊन पडल्याने त्याच्या डोकीस मार लागून तो जखमी झाला होता. त्याचा भाऊ उमेश काकलर याने त्यास बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

---

### लहान भावाला मारहाण केल्याचा जाब विचारल्याने मारहाण; दोघे जखमी

**सोलापूर, दि.३ जुलै-**
लहान भावाला मारहाण केल्याचा जाब विचारण्यासाठी गेले असता लाकडी वासा आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना अक्कलकोट रोडवरील समाधान नगरात शुक्रवार, दि.३ जुलै २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास घडली अजय केदार शिवरे (वय-१९), शशिकांत शंकर बागलकोटे (वय-२१, दोघेही रा.समाधान नगर, सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. राहुल पवार, ईश्वर मोहिते आणि त्याच्या साथीदाराने मारहाण केली. जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

---

### सुलेरजवळगे येथे दोन दुचाकींची समोरासमोर धडक; एक जण जखमी

**सोलापूर, दि.४ जुलै-**
अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे येथे दोन दुचाकींची समोरासमोर झालेल्या अपघातात एकजण जखमी झाल्याची घटना शुक्रवार, दि.३ जुलै २०२६ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली. मारुती भैरवसिध्द सलगर (वय-२५, रा.सुलेरजवळगे, ता.अक्कलकोट) असे जखमीचे नाव आहे. मारुती सलगर हा तिलाटी स्टेशन ते सुलेरजवळगे असा प्रवास करीत असताना हा अपघात घडला. त्याचा मित्र म्हाळप्पा याने त्याला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

---

### दारुसाठी पैसे दिले नाही म्हणून एकाने केला आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.४ जुलै-**
दारुसाठी पैसे दिले नाही या कारणावरुन एका ३८ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना महाराणा प्रताप झोपडपट्टी येथे घडली. सुनील नारायण गोरंदेवाले (रा. सिध्दार्थ सोसायटी सध्या रा.महाराणा प्रताप झोपडपट्टी) असे त्याचे नाव आहे. शुक्रवार, दि.३ जुलै २०२६ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घरातील दोघांनी दारु पिण्यासाठी पैसे दिले नाही. या कारणावरुन त्याने छताच्या लाकडी वाशाला साडीने गळफास घेतला होता. त्याचा शेजारी राहत असलेला राजू याने फासातून सोडवून त्याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

---

### पंढरपूर येथे मोटारीच्या धडकेने पादचारी तरुणी जखमी

**सोलापूर, दि.४ जुलै-**
पंढरपूर येथील तीनरस्ता जवळ रस्त्यावरुन पायी जात असताना मोटारीच्या धडकेत काजल भोसले (वय-२०, रा.रांजणी, ता.पंढरपूर) ही तरुणी जखमी झाली. हा अपघात शुक्रवार, दि.३ जुलै २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास घडला. तिला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करुन आई सुरेखा भोसले यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले.



# सोलापुरात रिमझिम! जिल्ह्यात अवघ्या १० टक्के पेरण्या

## बळीराज आणखीन पावसाच्या प्रतिक्षेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जुलै-**
मुंबई, ठाणे, कोकण आणि पुण्यासह महाराष्ट्राच्या घाट विभागाला हवामान विभागाने पुढील ४८ तासांसाठी 'रेड अलर्ट' दिला आहे. अनेक जिल्ह्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस सुरू आहे. मात्र सोलापूरकरांवर पाऊस कोपला असून, रोज रिमझिम बरसत आहे. यामुळे जिल्ह्यात अवघ्या १० टक्के पेरण्या झाल्या असून, बळीराजा पावसाच्या प्रतिक्षेत आहे.

पुणे, मुंबई, भिवंडी आदी विविध ठिकाणी सतर्कतेचा उपाय म्हणून, प्रशासनाने अनेक भागांत शाळा आणि अंगणवाड्यांना सुट्या जाहीर केल्या आहेत. मुंबई आणि काही शहरे आणि उपनगरात रोज मुसळधार पाऊस सुरू आहे. ठाणे आणि पालघर, रत्नागिरी आणि रायगडमध्ये अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. संपूर्ण मराठवाड्यात अवघ्या २ लाख हेक्टरवरच पेरणी झाल्याची माहिती मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यात आता पावसाळी वातावरण निर्माण झाले असून, आता आर्द्रा नक्षत्राच्या पाऊसधारा बसरल्या तरच खरिपाच्या पेरण्याचा टक्का वाढणार आहे. हे नक्षत्र कोरडे गेल्यास खरिपाची पेरणी कमी प्रमाणात होण्याची भीतीही जाणकार शेतकरी व्यक्त करीत आहेत.

---

### भाजपाच्या सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हा उपाध्यक्षपदी वैभव मोरे



**मोडनिंब, दि. ४ जुलै-**
भारतीय जनता पक्षाच्या सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हा उपाध्यक्षपदी मोडनिंब (ता.माढा) येथील वैभव विलास मोरे यांची नियुक्ती करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांच्या हस्ते नियुक्तीचे पत्र त्यांना देण्यात आले.

---

# पावसाळ्याच्या अनुषंगाने महापालिकेची आपत्कालीन नियंत्रण कक्ष २४ तास सज्ज

- इमारत पडणे, झाड कोसळणे, ड्रेनेज तुंबणे
- पाणीपुरवठा तक्रारींसाठी स्वतंत्र हेल्पलाईन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जुलै-**
पावसाळ्यात शहरात उद्‌भवणाऱ्या संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी सोलापूर महापालिकेने २४ तास कार्यरत आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुरू केला आहे. इमारत पडणे, झाडे कोसळणे, सखल भागात पाणी साचणे, ड्रेनेज तुंबणे तसेच पाणीपुरवठ्याशी संबंधित तक्रारींसाठी स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे.

महापालिकेच्या नगर अभियंता विभागाकडे इमारत पडणे, झाडे कोसळणे, सखल भागात पाणी साचणे आणि नाल्यालगत पाणी तुंबण्याच्या तक्रारींची नोंद केली जाणार आहे. तर सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाकडे ड्रेनेज लाईन तुंबणे, पाणी ओव्हरफ्लो होणे तसेच पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन फ टणे आदी तक्रारींसाठी स्वतंत्र संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

नागरिकांच्या सहकार्यामुळे संभाव्य धोके टाळण्यास आणि जीवित व वित्तहानी रोखण्यास मदत होईल. पावसामुळे कोणतीही आपत्ती अथवा समस्या निर्माण झाल्यास नागरिकांनी संबंधित नियंत्रण कक्षाशी त्वरित संपर्क साधून माहिती द्यावी, असे आवाहन सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

#### महत्त्वाचे संपर्क क्रमांक याप्रमाणे

नगर अभियंता विभाग (इमारत पडणे, झाड पडणे, पाणी साचणे)
दूरध्वनी : ०२१७-२७४०३३५/०२१७-२७३५२९३
टोल फ्री : १८००२३३१९१४, १८००२३३१९१६
मोबाईल : ९४२३९९१६५३, ९४२३९९३९०६
सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग (ड्रेनेज तक्रारी)
८४२१०४०७५५
झोन १ व २ : ८६६९१७८४६२
झोन ४ व ५ : ८२३७३८२८७३
झोन ३ व ८ : ९५७९८५४५६८
झोन ६ व ७ : ८३८१०९०७७७
पाणीपुरवठा तक्रारी
टोल फ्री :
९६०७९८०३९९
७७०९०८९३७१
हे क्रमांक नागरिकांनी पावसाळ्यातील आपत्कालीन परिस्थितीत तक्रार नोंदविण्यासाठी वापरावेत, असे आवाहन सोलापूर महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

#### कामाचे कौतुक; कर्मचारी वर्ग तैनात

स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांनी काही दिवसांपूर्वी त्यांच्या प्रभागातील कुंभार वस्ती, अथर्व गार्डन परिसरातील विविध समस्या आपत्कालीन यंत्रणेने तातडीने सोडविल्याबद्दल विभागाला दूरध्वनी करुन कौतुक केले. दरम्यान, नगर अभियंता सारिका अकुलवार यांच्या नियंत्रणाखाली सहाय्यक अभियंता प्रकाश दिवाणजी, एक उपअभियंता संगमनाथ उप्पीन, चार कनिष्ठ अभियंते आणि सुमारे ५० मजूर-सेवकांचे पथक आपत्ती व्यवस्थापन पथक कार्यरत आहे.

---

# समर्थ बँक निवडणूक; उमेदवारी अर्जांची उद्या छाननी

- दै.तरुण भारतचे समूह मुख्य संपादक दिलीप पेठे यांच्यासह ४५ जणांनी केले अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जुलै-**
येथील समर्थ सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक कार्यक्रम झाला असून दैनिक तरुण भारतचे समूह मुख्य संपादक दिलीप यशवंतराव पेठे यांच्यासह एकूण ४५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. प्राप्त अर्जांची सोमवार, दि.६ जुलै २०२६ रोजी छाननी होणार आहे.

दि.७ ते २१ जुलै या कालावधीत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. आवश्यक असल्यास दि.२ ऑगस्ट २०२६ रोजी मतदान होणार आहे. दरम्यान, सिंग या एकाच कुटुंबातील तब्बल सात जणांनी विविध मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.




मतदारसंघनिहाय अर्ज दाखल केलेल्यांची नावे याप्रमाणे; महिला मतदारसंघ-सुजाता इनामदार, स्वाती देसाई, मालती सिंग, कीर्ती सिंग. अनुसूचित जाती मतदारसंघ-देवेंद्र संगेपाग, महानंदा कांबळे. भटक्या विमुक्त जातीजमाती मतदारसंघ-देवेंद्र मदने, मोहन बाणूर. इतर मागासवर्गीय मतदारसंघ-रवींद्र गरुडकर, ऐश्वर्या माने, युवराज माने.

सर्वसाधारण मतदारसंघ-दिलीप पेठे, उमेश थोब्बी, हरीश दुदगीकर, संतोष पंतोजी, राजीव देसाई, अमित कामतकर, संजय अजनसोंडकर, स्वाती देसाई, नारायण झळकीकर, चंद्रकांत रेम्बर्सू, मिलिंद नंदुरकर, श्रीधर गोखले, अनिरुध्द देशपांडे, चंद्रकांत पवार, नागनाथ नवगिरे, विवेक जोशी, किरण करकमकर, मदनगोपाळ खंडेलवाल, दिलीप दुलंगे, प्रशांत बागेवाडीकर, संजय भोईटे, रवींद्र गरुडकर, मिलिंद अदवानकर, ऐश्वर्या माने, युवराज माने, पुरुषोत्तम मित्रगोत्री, मुरलीधर खाडीलकर, ओमप्रकाश सिंग, राहुल सिंग, मंजुलता सिंग, दिव्यांग सिंग, जुई साधुका, राजेंद्र सिंग, स्वरुप चौधरी.

---

# माजी उपमहापौर कोल्हे यांचा कदम यांच्यावर शाब्दिक हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जुलै-**
सोलापुरातील अवैध धंदयांच्या विरोधात आरोप-प्रत्यारोपांचे जणू मालिका सुरु आहे. माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांनी शनिवार,दि.४ जुलै २०२६ रोजी सायरा शेख यांच्या समवेत पत्रपरिषद घेत सुहास कदम यांच्यावर शाब्दिक हल्ला चढवित कदम यांच्या कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली.

सरकारी नोकरी, टेंडर मिळवून देतो असे म्हणून अनेकांची फसवणूक केली. त्याच्या विरोधात विनयभंग, शासकीय कामात अडथळा, लोकसेवकांवर हल्ला करण्याचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत, असेही त्यांनी सांगितले. माझ्यासह अनेक महिलांची सुहास कदम याने फसवणूक कली, असे सायरा शेख यांनी यावेळी बोलताना सांगितले. दरम्यान, सोलापुरात सुरु असलेल्या अवैध धंदयांकडे आ.जयंत पाटील यांनी विधानसभेचे लक्ष वेधले होते.

---

# अंत्योदय योजना शिधापत्रिकाधारकांना प्रतिकुटूंब एक साडी मोफत वितरित होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.४ जुलै-**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मुंबई यांचेकडील शासन निर्णय दि.१० नोव्हेंबर २०२३ व कक्ष अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मुंबई यांचेकडील पत्रान्वये अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधारकांना प्रतिकुटूंब एक साडी मोफत वितरण करण्याचे आदेश दिल्याची माहिती प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली.

गोदामात येणारे साडयांचे गठ्ठे तसेच रास्त भाव दुकानात पाठवण्यात येणाऱ्या साडयांच्या गठ्ठयांची नोंद ऑनलाईन पध्दतीनेच ठेवणे आवश्यक आहे.

प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावातील रास्त भाव दुकानापर्यंत विहित वेळेत साड्या पोहोचतील याची दक्षता घेण्यासही कळविण्यात आलेले आहे. पुरवठा करावयाच्या साडीच्या १०० साडया म्हणजे एका गाठीचे वजन हे ४१ ते ४६ किलो इतके राहील.

सदर साडयाचे वाटप ई-पॉस मशीनव्दारे करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

---

# सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जुलै-**
राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, तालुका आरोग्याधिकारी डॉ.एकनाथ बोधले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय सरडे, आरोग्याधिकारी डॉ. महेश सुडके उपस्थित होते.



आषाढी यात्रेनिमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्यासह सर्व संतांचे पालखी सोहळे वाखरी येथे मुक्कामी दाखल होतात. येणाऱ्या लाखो वारकरी भाविकांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या व देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची त्यांनी माहिती घेतली.

---

# जैन विद्यार्थ्यांसाठी राज्यात सात ठिकाणी वसतिगृह उभारणार : ललित गांधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ जुलै-**
जैन समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी राज्यात मुंबई, पुणे, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, छ. संभाजीनगर, कोल्हापूर अशा एकूण सात ठिकाणी वसतिगृह उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जैन अल्पसंख्याक विकास आर्थिक महामंडळाच्या संचालक मंडळाच्या चौथ्या बैठकीत घेण्यात आला. ही बैठक महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडली.



यावेळी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज व व्याज परतावा योजनांच्या सुधारित प्रारूपास मान्यता देण्यात आली. तसेच 'विहारधाम निर्माण योजना' आणि 'पाठशाळा आधुनिकीकरण व सक्षमीकरण योजना' राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व या संदर्भात राज्यभराचे सर्वेक्षण त्वरित पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित्त महामंडळाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या वसतिगृह उभारणीसंदर्भात प्राप्त मागण्यांवर चर्चा करून राज्यात मुंबई, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, छ. संभाजीनगर, कोल्हापूर या सात ठिकाणी विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.याशिवाय, 'मराठी जैन साहित्य विश्वकोष' निर्मितीसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना व इतर रोजगाराभिमुख योजनांचा जैन युवकांना लाभ मिळावा यासाठी उद्योग विभागाच्या सहकार्याने विशेष अभियान राबविणे, तसेच महिला व बाल विकास विभागाच्या सहकार्याने महिला बचत गटांसाठी विविध योजना राबविण्याबाबतही निर्णय घेण्यात आला.

महिलांना कुटीर उद्योगासाठी १० हजार ते १ लाख पर्यंतचे कर्ज बिनव्याजी देण्याच्या योजनेची अंमलबजावणी त्वरित सुरु करण्याचा निर्णय घेण्यात येवून येत्या पंधरावड्यात याचे अर्ज वितरीत केले जातील असे ललित गांधी यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार महामंडळाच्या विविध योजनांमध्ये जैन समाजाचा अधिकाधिक सहभाग वाढविण्यासाठी समाजातील प्रमुख व्यक्तींना योजनांची माहिती देण्याच्या उद्देशाने विविध ठिकाणी विशेष बैठका आयोजित करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

या बैठकीसाठी सचिव माधवी खोडे-चवरे, व्यवस्थापकीय संचालक मेघना शिंदे, महिला बालविकास अधिकरी गौरी दोंदे, वित्त विभागाच्या अधिकारी रचना दरेकर, कौशल्य विकास विभागाचे आनंद माळी, समन्वयक संदीप भंडारी, महामंडळाचे सदस्य रावसाहेब पाटील, सुनील पाटणी तसेच विकास अच्छा, अमित जैन, दर्शना जैन, विश्वजीत कोल्हापुरे, प्रशांत गौडाजे आदी उपस्थित होते.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.Publised at TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | RNI No. MAHMAR/2023/86468
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अध्यक्षपदी प्रा. राजू बटगिरे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ जुलै -**



सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने कार्यरत असलेल्या ड. शीतल चव्हाण फाउंडेशनच्या अध्यक्षपदी प्रा. राजू बटगिरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. फाउंडेशनच्या सर्वसाधारण सभेत हा निर्णय एकमताने घेण्यात आला.

स्थापनेपासून अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळणारे सामाजिक कार्यकर्ते सत्यनारायण जाधव यांनी नव्या नेतृत्वाला संधी देण्याच्या भूमिकेतून पदाची सूत्रे प्रा. बटगिरे यांच्याकडे सोपवली. प्रा. बटगिरे हे मागील सात-आठ वर्षांपासून फाउंडेशनच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय असून सामाजिक कार्य, पर्यावरण संवर्धन व जनजागृती क्षेत्रात कार्यरत आहेत.

यावेळी मावळते अध्यक्ष सत्यनारायण जाधव यांनी शुभेच्छा दिल्या, तर ॲड. शीतल चव्हाण यांनी प्रा. बटगिरे यांच्या नेतृत्वाखाली फाउंडेशनचे कार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमास फाउंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### माजी विद्यार्थ्यांकडून पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयाला स्कूल व्हॅन भेट

**तुळजापूर, दि.४ जुलै -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयाला माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शुक्रवार रोजी स्कूल व्हॅन भेट देण्यात आली. धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व विद्यालयाचे चेअरमन कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते व्हॅनचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी प्रभारी प्राचार्य एस.एस. माने, डी.व्ही. बडे, एम.पी. कुलकर्णी, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते. माजी विद्यार्थी अमोल गुंड व तुषार वाघमारे यांनी शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांना मेहनत, चांगला अभ्यास आणि ध्येय निश्चित करण्याचा संदेश दिला. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी नवोदय हे केवळ विद्यालय नसून संस्कार केंद्र असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी संधीचा लाभ घेऊन प्रामाणिकपणे कार्य करत आई-वडील, गुरु आणि शाळेचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. तसेच शाळेच्या अडचणी सोडविण्यासाठी भविष्यात मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रभारी प्राचार्य एस.एस. माने यांनी केले.



### रवि साळुंखेची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड

**लोहारा, दि.४ जुलै -**

लोहारा येथील शंकरराव जावळे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी रवी तुळशीदास साळुंके याची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर निवड झाली आहे. या यशाबद्दल महाविद्यालयात त्यांचा प्राचार्य डॉ. शेषेराव जावळे पाटील यांच्या हस्ते फेटा, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जनार्दन पाटील, डॉ. प्रतीक पाटील, डॉ. मनोज सोमवंशी, डॉ. शिवाजी कदम, डॉ. प्रभाकर गायकवाड यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक उपस्थित होते. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्याने मिळविलेल्या यशाबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले.



### रसायनशास्त्र विभागातील प्रा. सुशील जमाले यांना पीएच.डी.

**कळंब, दि.४ जुलै -**

येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक सुशील एकनाथराव जमाले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून रसायनशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. प्रा. जमाले यांनी डॉ. सुरेश वेदपाठ व डॉ. किशन हावळ यांच्या मार्गदर्शनाखाली Synthesis, Biological Evaluation Structure ctivity Relationship Study of Some New Carboxamide Derivatives या विषयावर संशोधन पूर्ण केले. या संशोधनामध्ये मलेरियाविरोधी प्रभावी औषधांच्या निर्मितीसाठी उपयुक्त ठरू शकणाऱ्या नवीन कार्बॉक्सामाइड संयुगांचे संश्लेषण व जैविक मूल्यमापन करण्यात आले आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, प्राचार्य डॉ. हेमंत भगवान, उपप्राचार्य डॉ. के. डी. जाधव तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# तुळजाभवानी देवीच्या ४ हजार एकर इनामी जमिनींच्या व्यवहारांची चौकशी होणार

**जिल्हास्तरीय समिती स्थापन होणार...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जुलै -**

श्री तुळजाभवानी मंदिर येथील लाखो हिंदू भाविकांचे कुलदैवत असलेल्या श्री तुळजाभवानी देवीच्या तब्बल ४ हजार १२१ एकरांहून अधिक इनामी जमिनीच्या कथित अनधिकृत हस्तांतरण आणि विक्रीप्रकरणी राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी धाराशिव जिल्हा प्रशासनाकडून चौकशी समिती स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानंतर जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी शनिवारी (४ जुलै) पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली.

पुढील आठवड्यात समितीची अधिकृत घोषणा करण्यात येणार असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ही कारवाई महाराष्ट्र मंदिर महासंघ चे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी शासनाकडे सादर केलेल्या निवेदनानंतर सुरू झाली आहे. महासंघाने तुळजाभवानी देवीच्या इनामी जमिनींच्या व्यवहारात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर महसूल विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी समिती नेमून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

पत्रकार परिषदेत बोलताना जिल्हाधिकारी पुजार यांनी सांगितले की, तत्कालीन निजाम शासनाने विविध अटी व शर्तींसह श्री तुळजाभवानी देवीसह काही मठांना इनाम स्वरूपात जमिनी दिल्या होत्या. या जमिनींची मालकी, वापर आणि त्यासंबंधित अटींचे पालन झाले की नाही, याची समितीमार्फत तपासणी केली जाणार आहे. समितीत वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांचा समावेश असेल आणि संपूर्ण प्रकरणाच्या कायदेशीर व प्रशासकीय पैलूंची तपासणी करण्यात येईल. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या तक्रारीनुसार, कायद्यानुसार या इनामी जमिनींची खरेदी-विक्री होऊ शकत नाही तसेच त्यांना 'कुळ कायदा' लागू होत नाही.

मात्र महसूल अधिकारी आणि काही खासगी व्यक्तींच्या संगनमतातून हजारो एकर जमीन बेकायदेशीररीत्या हस्तांतरित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, श्री तुळजाभवानी संस्थानच्या नावे कागदोपत्री ३,३९७ एकर जमीन असली तरी तिचा प्रत्यक्ष ताबा चार मठांशी संबंधित खासगी व्यक्तींकडे असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच जगदंबा न्यासाच्या नावे असलेली ४०३ एकर जमीन मुख्य न्यासाला अंधारात ठेवून खासगी व्यक्तींच्या नावे करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

याशिवाय ६३.०३ एकर जमिनीपैकी काही भाग 'संरक्षित कुळ' दाखवून विकण्यात आल्याचा तसेच एका अव्वल कारकुनाने अधिकाराचा गैरवापर करून २६१ एकर जमीन ७३ खासगी व्यक्तींच्या नावे ७/१२ उताऱ्यावर नोंदविल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अपसिंगा आणि उपळा गावांमधील १५८ एकर जमीनही फेरफार नोंदीद्वारे बेकायदेशीररीत्या हस्तांतरित करण्यात आल्याचे महासंघाने म्हटले आहे.

> **राज्याचे लक्ष चौकशीकडे...**
> श्री तुळजाभवानी देवीच्या इनामी जमिनींचा विषय धार्मिक, ऐतिहासिक आणि कायदेशीरदृष्ट्या अत्यंत संवेदनशील मानला जात असल्याने या चौकशीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्य शासनाच्या आदेशानंतर सुरू झालेल्या या चौकशीत नेमके काय निष्पन्न होते, संबंधितांवर कोणती कारवाई होते आणि मंदिराच्या जमिनींबाबत पुढे काय निर्णय होतो, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## तुळजाभवानी मातेच्या चरणी १००६ ग्रॅम चांदीचा मुकुट अर्पण



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जुलै -**



श्री तुळजाभवानी मंदिर येथे अखंड श्रद्धा आणि भक्तिभाव व्यक्त करत हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील डॉ. सौरभ माणिकराव मसारे यांनी कै. प्रभाकर मसारे (आजोबा) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिनांक ३ जुलै २०२६ रोजी श्री तुळजाभवानी मातेच्या चरणी सुमारे १००६.७३० ग्रॅम वजनाचा चांदीचा मुकुट अर्पण केला.

डॉ. मसारे यांनी सहकुटुंब श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन भक्तिभावाने देवीच्या चरणी हा मुकुट अर्पण केला. श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानने सदर देणगी अधिकृतरीत्या स्वीकारून तिची नोंद केली.

यावेळी कीर्ती किरण पुजार यांनी देणगीदारांचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा आणि महावस्त्र देऊन सन्मान केला.

प्रसंगी डॉ. मसारे यांनी श्री तुळजाभवानी मातेच्या चरणी सर्व भाविकांच्या सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना केली.

## जळकोट येथे स्वखर्चातून बसथांबा उभारणी; प्रवाशांच्या गैरसोयीला दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ जुलै -**



तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश सोनटक्के यांनी भाजपचे युवा नेते मल्हार पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत प्रवाशांच्या सोयीसाठी स्वखर्चातून बसथांब्याची उभारणी केली आहे. या बसथांब्याचे उद्घाटन दि.४ जुलै रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

जळकोट हे तालुक्यातील मोठ्या गावांपैकी एक असून येथील बाजारपेठेत नेहमी बाहेरगावच्या नागरिकांची वर्दळ असते. मात्र प्रवाशांना थांबण्यासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याने उन्हाळा, पावसाळा किंवा इतर परिस्थितीत नागरिकांना उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत होती. प्रवाशांची ही अडचण लक्षात घेऊन गणेश सोनटक्के यांनी स्वखर्चातून बसथांबा उभारण्याचा निर्णय घेतला.

या नव्याने उभारण्यात आलेल्या बसथांब्याचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. उद्घाटन धाराशिव जिल्हा परिषद बांधकाम समितीचे सभापती सिद्धेश्वर कोरे आणि तुळजापूर पंचायत समितीचे सभापती विक्रम देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे, पंचायत समितीच्या उपसभापती रोहिणी मेलगिरी, राष्ट्रीय बंजारा परिषद महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष विलास राठोड, माजी सरपंच अशोकराव पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचायत समिती सदस्य ॲड. आशिष सोनटक्के व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## धाराशिवमध्ये पेट्रो कार्ड गैरवापरकरून ९.२७ लाखांच्या अपहाराचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जुलै -**



आनंदनगर पोलीस ठाण्यात पेट्रो कार्डच्या कथित गैरवापरातून ९ लाख २७ हजार ८७५ रुपयांच्या अपहार आणि फसवणुकीप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अमजत अली कुदरत अली जहागीरदार (रा. ज्ञानेश्वर मंदिर परिसर, धाराशिव) यांच्याविरोधात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. फिर्यादी रहिम याकुब शेख (वय ३८, रा. मिल्ली कॉलनी, सफा मशिदीजवळ, धाराशिव) यांनी दि.३ जुलै रोजी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१ मे ते दि.४ जून या कालावधीत विश्वासाने सोपविण्यात आलेल्या पेट्रो कार्डचा कथित वापर करून एच.पी. पेट्रोल पंपावरून ९ लाख २७ हजार ८७५ रुपयांचे डिझेल घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीत पुढे नमूद केल्याप्रमाणे, संबंधित डिझेल वेगवेगळ्या ट्रक चालकांना विकून आर्थिक अपहार आणि फसवणूक केल्याचा दावा करण्यात आला आहे.

या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## भुम बसस्थानक परिसरातून ४६ हजारांचा ऐवज चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जुलै -**

भुम बसस्थानक परिसरात झोपलेल्या व्यक्तीच्या खिशातील ४६ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे.

रमेश अण्णा झोंबाडे (वय ६०, भुम) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २ जुलै २०२६ रोजी सायंकाळी चक्कर आल्याने ते बसस्थानकाजवळ झोपले होते. यावेळी त्यांच्या खिशातील ५ ग्रॅम सोन्याची अंगठी, मोबाईल फोन, कागदपत्रे व ६ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ४६ हजार रुपयांचा माल अज्ञात व्यक्तीने चोरून नेला. या प्रकरणी भुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शाळा एकत्रीकरण निर्णयावर ग्रामीण भागात नाराजी; विद्यार्थ्यांच्या हिताचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.४ जुलै -**

राज्य शासनाने एकाच कॅम्पसमध्ये भरत असलेल्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक मुलांच्या व मुलींच्या शाळा जिल्हा परिषद प्रशालेत एकत्र करण्याचा निर्णय घेतल्यानंतर ग्रामीण भागात विविध स्तरांतून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

या निर्णयामुळे भविष्यात शिक्षक, मुख्याध्यापक तसेच शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांची संख्या कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, याचा विद्यार्थ्यांवर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांच्या मते, जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामुळे शाळा एकत्रीकरणाच्या निर्णयाचा परिणाम गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधा आणि मूलभूत हक्कांवर होऊ शकतो, अशी चर्चा सुरू आहे.

धाराशिव जिल्ह्यातील अनेक शाळा व्यवस्थापन समित्यांनी या निर्णयाविरोधात ठराव मंजूर करून जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, खासदार, आमदार तसेच जिल्हा परिषद अध्यक्षांकडे पाठविल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच या निर्णयाचा फेरविचार न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

मात्र, या मागण्यांबाबत अद्याप ठोस निर्णय अथवा प्रतिक्रिया समोर आलेली नसल्याने ग्रामीण भागात विविध चर्चांना उधाण आले आहे.

विद्यार्थ्यांच्या हितासाठी शासन कोणती भूमिका घेणार, याकडे आता पालक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## आमदार कैलास पाटील यांच्यावर विधानसभेतील तालिका अध्यक्षपदाची जबाबदारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जुलै -**



महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात कळंब-धाराशिव मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील यांच्यावर तालिका अध्यक्ष म्हणून सभागृहाचे कामकाज चालविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली. लोकशाहीच्या सर्वोच्च व्यासपीठावर ही जबाबदारी पार पाडण्याचा मान मिळाल्याने धाराशिव जिल्ह्यासाठीही हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

तालिका अध्यक्ष म्हणून कामकाज सांभाळताना आमदार कैलास पाटील यांनी विधानसभेची प्रतिष्ठा, लोकशाही परंपरा आणि सभागृहाचे नियम यांचे काटेकोर पालन करत कामकाज शिस्तबद्ध आणि नियमबद्ध पद्धतीने पार पाडण्यावर भर दिला. सदस्यांना नियमांच्या चौकटीत राहून आपली मते मांडण्याची संधी मिळावी तसेच सभागृहातील चर्चा विधायक वातावरणात पार पडावी, यासाठी त्यांनी विशेष दक्षता घेतली.

यावेळी राज्याच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर सकारात्मक आणि लोकहिताला प्राधान्य देणारी चर्चा व्हावी, महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी ठोस निर्णय घेण्यास पोषक वातावरण निर्माण व्हावे आणि लोकाभिमुख धोरणांवर प्रभावीपणे विचारमंथन घडावे, यावर विशेष भर देण्यात आला.

या जबाबदारीबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना आमदार कैलास पाटील म्हणाले, लोकशाहीच्या या सर्वोच्च व्यासपीठावर तालिका अध्यक्ष म्हणून सभागृहाचे कामकाज चालविण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत सन्मानाची आणि अभिमानाची बाब आहे. सभागृहाची प्रतिष्ठा कायम राखत लोकहिताला प्राधान्य देणारे कामकाज पार पाडण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला.

विधानसभेतील या जबाबदारीमुळे आमदार कैलास पाटील यांच्या संसदीय कामकाजातील अनुभवाला आणखी एक मानाचा तुरा लाभला असून, धाराशिव जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# दोन वर्षांपासून तेरखेडा जलजीवन मिशन रखडले

**सुधीर घोलप**
**वाशी, दि.४ जुलै -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील जलजीवन मिशन योजनेचे काम गेल्या दोन वर्षांपासून रखडले असून योजनेच्या प्रगतीबाबत ग्रामस्थांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

योजनेचे काम नेमके कोणत्या टप्प्यावर आहे, किती निधी खर्च झाला आहे आणि उर्वरित काम कधी पूर्ण होणार, याबाबत माहिती मिळविण्यासाठी संबंधित अधिकारी व ठेकेदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला.

मात्र अनेक वेळा संपर्क साधूनही संबंधितांकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे.

कोट्यवधी रुपयांची योजना मंजूर होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली होती. काही भागात पाईपलाईन टाकण्यात आली, रस्ते खोदण्यात आले, तर काही कामे अर्धवट अवस्थेतच थांबली. परिणामी, अनेक ठिकाणी ग्रामस्थांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

> **१३ कोटींच्या योजनेबाबत ग्रामस्थांमध्ये नाराजी**

ग्रामस्थांच्या मते, योजना सुरू झाल्यानंतर घराघरात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा निर्माण झाली होती. मात्र दोन वर्षांचा कालावधी उलटूनही योजना पूर्णत्वास न गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी वाढत आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये सुरू केलेल्या जल जीवन मिशन अर्थात 'हर घर जल' योजनेचा उद्देश ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचविणे हा आहे.

या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असताना तेरखेडा येथील सुमारे १३ कोटी रुपयांची योजना मात्र दोन वर्षांपासून रखडल्याचे चित्र दिसत आहे.



त्यामुळे 'हर घर जल'च्या उद्दिष्टालाच तेरखेड्यात ब्रेक लागल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, यापूर्वी योजनेच्या रखडलेल्या कामाबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा करण्यात आली असता काम लवकरच सुरू करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र त्या आश्वासनानंतरही प्रत्यक्षात कामाला गती मिळालेली नसून योजना आजही रखडलेलीच आहे.

दुसरीकडे संबंधित ठेकेदारांनी आपण काम करण्यास तयार असल्याचे सांगितले आहे.

त्यामुळे दोन वर्षांपासून रखडलेल्या या १३ कोटी रुपयांच्या योजनेचा नेमका अडथळा काय, हा प्रश्न अधिकच गडद झाला आहे.

## संक्षिप्त...

# सुजल धुर्वे चीन येथे खेळल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ जुलै : तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा खेळाडू सुजल धुर्वे हा भारतीय व्हॉलीबॉल स्पर्धेत १८ वर्षे वयोगटातून भारतीय संघात खेळत आहे. चीन येथे खेळल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेत तो खेळत आहे.

एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ग्रामीण भागातील खेळाडूंना नेहमी प्रोत्साहन देत अनेक स्पर्धां खेळण्यासाठी खेळाडूंना मार्गदर्शन व प्रशिक्षण देत असते. यामुळेच अनेक खेळाडूंनी आपली चमक दाखवत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. सुजल धुर्वे हा देखील ग्रामीण भागातील तरुण व होतकरू विद्यार्थी असून भारतीय व्हॉलीबॉल संघात सध्या तो खेळत आहे. सुजल च्या माध्यमातून पुन्हा एकदा ग्रामीण भागातील विद्यालयाचे नाव देशपातळीवर नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहंचले आहे. या यशाबद्दल संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिध्दार्थ बोडके, सहसचिव प्रणयन चौधरी,संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, प्रयास चौधरी, प्रा. बी. एस. बाबळसुरे, रसूल पठाण, क्रिडा समन्वयक किरण हाळीघोंगडे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# लाल बहादूर शास्त्री विद्यालयात महिला तक्रार निवारण समितीची बैठक संपन्न



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ जुलै : येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात महिला तक्रार निवारण समितीची महत्त्वपूर्ण बैठक मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत नूतन कार्यकारणी जाहीर केली. त्यात अध्यक्ष म्हणून प्रमोदिनी रेड्डी उपाध्यक्ष बालासाहेब केंद्रे सचिव श्रद्धा पाटील तर सदस्यांत अनिता येलमटे सुरेखा गुजलवार संगीता हाळ्ळे एकनाथ राऊत यांचा समावेश करण्यात आला. आगामी वर्षभरात महिलांच्या व मुलींच्या सुरक्षितते संदर्भात बैठकीत चर्चा करण्यात आली. पुढील काळात महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने वर्षभरात ज्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येणार आहे त्यासंबंधीची चर्चा झाली.

यावेळी महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने तक्रार पेटी बसवण्यात आली.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्र म्हणाले की महिला व मुलीच्या सुरक्षेच्या संदर्भात आपण सगळ्यांनीच सजग व डोळस राहून कार्यवाही केली पाहिजे .शालेय परिसरात अनुचित प्रकार घडणार नाही याबाबतीत आपण दक्ष राहूया असे सांगितले.

या बैठकीचे सूत्रसंचालन श्रद्धा पाटील तर प्रास्ताविक व आभार प्रमोदिनी रेड्डी यांनी मानले.

# जानवळ येथील जनावरे मृत पावलेल्या शेतकऱ्यांना शासनाची आर्थिक मदत : ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते धनादेशाचे वितरण




तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ४ जुलै : चाकूर तालुक्यातील जानवळ येथे उन्हाळ्यात एप्रिल महिन्यामध्ये आगीमुळे कोट्याने पेट घेतला होता. त्यात जानवळ येथील ज्ञानोबा भोजने यांची जनावरे दगावली होती. ही घटना समजल्यानंतर राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी त्यांना भेट देऊन शासनाकडून सर्वो तपरी मदत देण्याचे आश्र्वासन दिले होते. आज सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते सदरील भोजने कुटुंबीयास एक लक्ष १२ हजार रुपयांच्या धनादेशाचे वितरण सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चाकुरचे तहसीलदार नरसिंग जाधव, जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, समाज कल्याण सभापती उत्तमराव माने, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष शिवाजीराव काळे, शिवानंद हेंगणे सह आदी उपस्थित होते.

# राजकारणाला सामाजिक सेवेची जोड !

## राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे तिन्ही नेत्यांचा वाढदिवस रुग्णांना फळवाटप व दर्ग्यावर चादर अर्पण करून साजरा



तभा वृत्तसेवा

देवणी दि. ४ जुलै : राज्याचे माजी मंत्री व आमदार मा. संजयभाऊ बनसोडे, मराठवाड्याचे लढवय्ये शिक्षक आमदार मा. विक्रमबाप्पा काळे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व युवकांचे मार्गदर्शक मा. सूरजदादा चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, देवणी तालुका व देवणी शहरच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी देवणी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. तसेच सर्वधर्मसमभावाचा संदेश देत हजरत बाबा दर्ग्यावर चादर अर्पण करून तिन्ही नेत्यांच्या निरोगी, दीर्घायुषी व यशस्वी वाटचालीसाठी प्रार्थना करण्यात आली. या सामाजिक उपक्रमामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे देवणी तालुकाध्यक्ष महेश जाधव, शहराध्यक्ष गफ्फूर कुरेशी, सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष निळकंठ बिरादार, देवणी नगरपंचायतीचे नगरसेवक अमित सूर्यवंशी, उबेद उंटवाले, सोहेल शेख, विद्यार्थी तालुकाध्यक्ष शिवानंद बिरादार, सुरेशदादा बिरादार, इश्माईल हाशमी, गोपाळ दापके, विनोद कापडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ५ जुलै : नुकताच शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल जाहीर झाला. यात लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गुणवत्तेची यशस्वी परंपरा राखली आहे.तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून आठवी वर्गातून दोन तर पाचवी वर्गातून एक विद्यार्थिनी शिष्यवृत्तीधारक झाले. आठवीतून श्रेयश खरात साधना बजगिरे तर पाचवीतून वेदिका मुळे हिने यश प्राप्त केले. आठवीला पंकज देशमुख मयूर कुलकर्णी दिलीप पाटील संदीप चाटे तर पाचवीला बालासाहेब खोडवे अनिता मुळखेडे मिनाक्षी कस्तुरे शैलेश बुरगे एकनाथ राऊत यांनी मार्गदर्शन केले

# ज्ञानेश्वर विद्यालयात पाचवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ४ जुलै : २१ वे शतक हे स्पर्धेचे युग असून स्पर्धेत टिकण्यासाठी शालेय जीवनापासून म्हणजेच बाल्यावस्थेपासून विविध स्पर्धा परीक्षेची तयारी करावी. असे आग्रही प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र महिला मोर्चाच्या सरचिटणीस तथा प्राचार्या रेखाताई हाके पाटील यांनी केले.

त्या संत ज्ञानेश्र्वर प्राथमिक विद्यालयात पाचवी शिष्यवृत्तीधारक झालेल्या २३ गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बबनराव ढोकाडे, केंद्रप्रमुख अरविंद पुलगुर्ले, संस्थेचे समन्वयक कुलदीप हाके पाटील, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे- तत्तापुरे, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका मीना तोवर, यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat
छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन /
इतर जाहिराती योग्य दरात छापल्या
जातील संपर्क –७३८५५६७०३१

# लातूर उदगीर महामार्गावर तिहेरी भीषण अपघात कार ,ऑटो रिक्षा आणि दुचाकीच्या धडकेत तिघे गंभीर जखमी



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ४ जुलै : येथुन जवळच असलेल्या मौजे अजनसोंडा पाटी येथे लातूर उदगीर महामार्गावर आज एक जीवाचा ठराव उडवणारी घटना घडली असून, महामार्गावरील अजनसोंडा पाटी जवळ कार, ऑटो, आणि मोटरसायकल या तीन वाहनांमध्ये अत्यंत भीषण तिहेरी अपघात झाला. या जोरदार धडकेत तिघेजण गंभीर जखमी झाले असून तिन्ही वाहनाचे प्रचंड नुकसान झाले आहे. मिळालेले प्राथमिक माहितीनुसार एक कार उदगीर कडून लातूरकडे भारधाव वेगात लातूरच्या दिशेने जात होती. दरम्यान अजनसोंडा पाटील जवळ ही कार एक ऑटो आणि समोरून येणारी दुचाकी यांच्यात जोरदार धडक झाली. हा अपघात इतका जोरात होता की, धडकेच्या आवाजाने परिसर हादरुन गेला.या मोठ्या आवाजाने परिसरातील नागरिक शेतकरी धावून आले. अपघातामुळे तिन्ही वाहनाचे प्रचंड नुकसान झाले असून रस्त्यावर काही काळ मोठ्या प्रमाणावर वात कोंडी निर्माण झाली होती. या अपघातात नळेगाव येथील रहिवासी असलेले पस्तीस वर्षीय प्रद्युम्न माचवे आणि तीस वर्षे कावेरी माचवे यांच्या सह उदगीर येथील रहिवासी असलेले पस्तीस वर्षीय गोपाळ माने हे तिघेजण गंभीर स्वरूपात जखमी झाले आहेत. अपघाताच्या आवाजाने परिसरातील नागरिक शेतकरी आणि प्रवाशांने अत्यंत सतर्कता दाखवत तात्काळ घटनास्थळाकडे धाव घेतली. सर्वांनी मदत कार्याला सुरुवात करून तिन्ही वाहनांमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढले. जखमीची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे वेळ न घालवता उपचारासाठी जवळच्या शासकीय दवाखान्यामध्ये दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर तातडीने वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले आहेत. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघात ग्रस्त वाहने बाजूला सारून विस्कळीत झालेली वाहतूक पूर्ववत केली. घटनास्थळाचा पंचनामा करून हा अपघात कोणत्या वाहनाच्या चुकीमुळे झाला याचा तपास पोलीस करीत आहेत.

# कर्तव्याला व्रत मानणारा शिक्षकच समाजाचा खरा शिल्पकार : प्रा. जाहुरे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ जुलै : कर्तव्याची अखंड साधना, संस्काराची समृद्ध परंपरा आणि विद्यार्थ्यांच्या मनामध्ये अढळ स्थान निर्माण करणारे बालाजी नरहरे हे खऱ्या अर्थाने आदर्श शिक्षक आहेत. शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असतो. काळ कोणताही असो, शिक्षकाने अध्यापन हे केवळ कर्तव्य नव्हे, तर व्रत मानून समाजाभिमुख कार्य केले तर त्याचा सन्मान काळाच्या पलीकडेही कायम राहतो. असे प्रतिपादन उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे प्रा. प्रवीण जाहुरे यांनी केले. ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. त्यांच्या या शब्दांनी उपस्थितांच्या भावना दाटून आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अर्जुन माणकेश्र्वरे होते.

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोमठाणा तसेच समस्त ग्रामस्थ मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सेवापूर्ती सत्कार व निरोप समारंभ भावनिक वातावरणात संपन्न झाला.

काही व्यक्ती केवळ नोकरी करत नाहीत, तर आपल्या कर्तृत्वाने एका पिढीचा विचार घडवतात. काही शिक्षक केवळ पाठ्यपुस्तक शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे पुस्तक समृद्ध करतात. अशाच ज्ञान, संस्कार, शिस्त आणि माणुसकीचा अखंड दीप तेवत ठेवणारे आदर्श शिक्षक बालाजी हरिश्र्चंद्र नरहरे यांच्या ३३ वर्षांच्या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेला सोमठाणा ग्रामस्थांनी अश्रुपूर्ण डोळ्यांनी, कृतज्ञ अंतःकरणाने आणि भरभरून प्रेमाने निरोप दिला.

बालाजी हरिश्र्चंद्र नरहरे यांनी तब्बल ३३ वर्षे निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि समर्पित भावनेने शिक्षणसेवा बजावत ३० जून २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती स्वीकारली. या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच शिस्त, संस्कार, प्रामाणिकपणा आणि माणुसकीची शिकवण दिली. त्यामुळे ते केवळ शिक्षक म्हणून नव्हे, तर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, पालक आणि प्रेरणास्थान म्हणून ओळखले जातात.

यावेळी ह.भ.प. संदीपान महाराज, किरण साकोळे, भरत पुंड, विजय गुरखेल, वसंत ढगे, तुकाराम पाटील, गोविंद हंदराळे, माधव फावडे, दीपक बिरादार आदी मान्यवरांनी आपल्या मनोगतात नरहरे यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या भावी आयुष्यासाठी मंगलमय शुभेच्छा व्यक्त करताना अनेकांनी भावनांना वाट मोकळी करून दिली.

मान्यवरांनी आपल्या भाषणातून सांगितले की, सेवानिवृत्ती हा सेवाप्रवासाचा शेवट नसतो; तो एका यशस्वी, कर्तृत्ववान आणि प्रेरणादायी पर्वाची सुवर्ण सांगता असतो. बालाजी नरहरे यांनी पेरलेले ज्ञानाचे बीज आज असंख्य विद्यार्थ्यांच्या यशाच्या रूपाने बहरले आहे. त्यांच्या कार्याचा सुगंध पुढील अनेक पिढ्यांपर्यंत दरवळत राहील.

यावेळी अनेक वक्त्यांनी बालाजी नरहरे यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. टापटीप राहणी, मनमिळावू स्वभाव, मैत्री जपण्याची वृत्ती, प्रत्येकाला आपलेसे करणारे व्यक्तिमत्त्व आणि विद्यार्थ्यांसाठी सदैव धावून जाणारा शिक्षक अशी त्यांची ओळख असल्याचे सांगत उपस्थितांनी त्यांच्याविषयीचा जिव्हाळा व्यक्त केला.

विद्यार्थ्यांच्या अडचणी स्वतःच्या समजून सोडविणारा आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशात आनंद मानणारा शिक्षक म्हणून त्यांची कायम स्मरणात राहणारी प्रतिमा असल्याचेही वक्त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला शिक्षण विस्तार अधिकारी अनिल पागे, शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भंडे, केंद्रप्रमुख किरण साकोळे, केंद्रीय मुख्याध्यापक विरेंद्र उस्तुर्गे, शिरूर अनंतपाळ तालुका शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष गोविंद हंदराळे, ह.भ.प. संदीपान महाराज, गोविंद भारसंगे, पत्रकार रमेश मुळे, माधव फावडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष विष्णू बिरादार, सरपंच उत्तम बिरादार, मुख्याध्यापक सुदर्शन पाटील तसेच शिक्षकवृंद, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात शाळा व ग्रामस्थांच्या वतीने बालाजी नरहरे, त्यांच्या धर्मपत्नी सौ. माधुरीताई नरहरे आणि मातोश्री श्रीमती चंद्रकला यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ तसेच वस्त्ररूपी पूर्ण आहेर देऊन अत्यंत सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

हा सन्मान स्वीकारताना नरहरे कुटुंबीयांसह अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन लोभाजी यांनी केले, सूत्रसंचालन संतोष सुतार यांनी प्रभावीपणे केले, तर आभार बिरादार यांनी मानले. या प्रसंगी बालाजी नरहरे यांची मुले, भाऊ, बहीण तसेच सर्व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सर्व ग्रामस्थांसमवेत आयोजित सहभोजनाने अत्यंत आत्मीय वातावरणात झाली.

ज्ञानदान हीच सर्वोच्च साधना मानून आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या मनात संस्कारांचे दीप प्रज्वलित करणाऱ्या बालाजी हरिश्र्चंद्र नरहरे यांच्या सेवापूर्तीचा हा सोहळा केवळ एका शिक्षकाचा निरोप नव्हता; तो एका आदर्श जीवनप्रवासाला, एका संस्कारवंत व्यक्तिमत्त्वाला आणि एका ऋषितुल्य शिक्षकाला संपूर्ण गावाने व्यक्त केलेला कृतज्ञतेचा भावपूर्ण प्रणाम होता.

# उदगीरचे सामान्य रुग्णालय ३०० बेडचे करावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांची मागणी



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ जुलै : उदगीर शहर हे एक लाख लोकसंख्येचे कर्नाटक सिमेवरील महत्वाचे शहर आहे. उदगीर हे कर्नाटकातील बिदर तसेच लातूर या दरम्यान आरोग्य सेवेसाठी अत्यंत महत्वाचे ठिकाण असुन सध्या उदगीर येथे २०० खाटांचे सामान्य रुग्णालय आहे. जिल्हयातील दोन तालुक्यातून मोठया प्रमाणात रुग्ण उदगीर येथे सेवा घेण्यासाठी येत असल्यामुळे सध्याची व्यवस्था अपूरी पडत आहे. दिवसेंदिवस शहर व परिसरातील वाढती लोकसंख्या तसेच ग्रामीण भागातील रुग्णांची संख्या लक्षात घेता उदगीर येथील सामान्य रुग्णालयाची क्षमता ३०० बेडपर्यंत वाढविण्यात यावी, अशी लेखी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देवुन याबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना आरोग्य विभागाच्या सचिवांना त्यांनी दिल्या आहेत.

उदगीर व जळकोट मतदारसंघातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपचारासाठी उदगीरच्या सामान्य रुग्णालयावर अवलंबून आहेत. मात्र, सध्याच्या रुग्णसंख्येच्या तुलनेत उपलब्ध खाटांची संख्या अपुरी पडत असून अनेक रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे रुग्णालयाची बेड क्षमता ३०० पर्यंत वाढवून अत्याधुनिक सोई - सुविधेसह नविन इमारतीत अधिक सक्षम आरोग्य व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी सांगितले.

यापूर्वीही आ. संजय बनसोडे यांच्या पाठपुराव्यामुळे उदगीरमध्ये विविध महत्त्वपूर्ण आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. यामध्ये ट्रामा केअर सेंटर, स्वतंत्र ओपीडी इमारत, आधुनिक ऑक्सिजन प्लांट, २०० खाटांचे रुग्णालय, तसेच अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज रुग्णवाहिका यांचा समावेश आहे. या सर्व सुविधांमुळे परिसरातील हजारो रुग्णांना मोठा दिलासा मिळाला असून उपचार प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे.

ग्रामीण भागातील गरीब व गरजू नागरिकांना वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण उपचार मिळणे ही काळाची गरज आहे म्हणून मतदार संघातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून आ.संजय बनसोडे यांनी वाढवणा बु. येथे ग्रामीण रुग्णालय उभारले त्याचबरोबर मंगरुळ व घोणसी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारुन ग्रामीण भागातील जनतेला आरोग्याच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

उदगीर येथील सामान्य रुग्णालयाची क्षमता वाढल्यास अधिक डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध होतील, तसेच गंभीर रुग्णांवरील उपचार अधिक प्रभावीपणे करता येतील, असे आ.संजय बनसोडे यांनी बोलताना सांगितले.

उदगीरच्या आरोग्य सुविधांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी आज केली आहे.

सामान्य रुग्णालय ३०० बेडचे झाल्यास उदगीर व परिसरातील लाखो नागरिकांना त्याचा थेट लाभ होणार असून आरोग्य सेवेचा दर्जाही मोठ्या प्रमाणात उंचावणार असल्याचे आ.संजय बनसोडे यांनी बोलताना सांगितले.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तुळजापूरात विद्यार्थी सुरक्षेसंदर्भात पालक बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जुलै -**

नगरपरिषद शाळा क्रमांक ३ मध्ये विद्यार्थी सुरक्षेसंदर्भात पालकांची बैठक आयोजित करण्यात आली. शहरात विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या काही वाहनचालकांकडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर शाळेने ही बैठक आयोजित केली होती.

या बैठकीस शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा किरण सुरवसे, समिती सदस्य सचिन ताकमोघे, सायली नगरे, नितीन गायकवाड तसेच पालक म्हणून तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने, जि.प.सदस्या शितल अनंत ढाले, भगवान सुरवसे, मुख्याध्यापक तुकाराम मोटे, अशोक शेंडगे, दत्ता मेढे, रणजीत नाईकवाडे, कुलकर्णी आणि पुष्पा काळे उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेविषयी पालकांना मार्गदर्शन केले. तहसीलदार माया माने यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी केवळ शाळेची नसून प्रत्येक पालकानेही वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी शाळेने अतिरिक्त तासिका आयोजित कराव्यात, जेणेकरून अधिकाधिक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करतील.



# बदलत्या हवामानात बीबीएफ तंत्रज्ञान सर्वोत्तम पर्याय; जिल्हाधिकाऱ्यांनी शेतात उतरून केले प्रात्यक्षिक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जुलै -**

बदलत्या हवामानामुळे निर्माण होणाऱ्या अनिश्चित परिस्थितीतही सोयाबीन उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी रुंद सरी-वरंबा तंत्रज्ञान हा सर्वोत्तम पर्याय असल्याचा संदेश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी प्रत्यक्ष शेतात उतरून दिला.

धाराशिव तालुक्यातील रुईभर येथील प्रगतशील शेतकरी किरण तीर्थकर यांच्या शेतात जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः बीबीएफ पेरणी यंत्र चालवत सोयाबीन पेरणीचे प्रात्यक्षिक केले.

तसेच टोकण पद्धतीने तूर लागवड करून आधुनिक व शास्त्रशुद्ध शेतीचा आदर्श शेतकऱ्यांसमोर ठेवला. खरीप हंगाम २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर आयोजित या प्रात्यक्षिक कार्यक्रमाला परिसरातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना जिल्हाधिकाऱ्यांनी जमिनीत आवश्यक ओलावा उपलब्ध असल्याने वेळेत पेरणी पूर्ण करण्याचे तसेच पारंपरिक सपाट पद्धतीऐवजी बीबीएफ तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले.




यावेळी बोलताना पुजार म्हणाले की, जिल्ह्यात पेरणीसाठी आवश्यक ओलावा उपलब्ध झाला असला तरी एल निनोचा संभाव्य परिणाम, अतिवृष्टी, पावसातील खंड आणि हवामानातील वाढती अनिश्चितता लक्षात घेता शेतीतील तंत्रज्ञान बदलणे ही काळाची गरज आहे. बीबीएफ पद्धतीमुळे अतिवृष्टीच्या वेळी अतिरिक्त पाण्याचा जलद निचरा होतो, तर पावसाचा खंड पडल्यास सरींमध्ये ओलावा अधिक काळ टिकून राहतो. त्यामुळे पिकांची मुळांची वाढ चांगली होऊन उत्पादनक्षमतेत वाढ होते.

टोकण पद्धतीने तूर पेरणीबाबत त्यांनी सांगितले की, योग्य अंतर व खोलीवर बियाणे पेरल्याने अपेक्षित रोपसंख्या मिळते, बियाण्यांची बचत होते आणि आंतरमशागत सुलभ होऊन उत्पादन वाढीस मदत होते.

कार्यक्रमात जिजाऊ महिला शेतकरी गटाच्या महिलांनी सोयाबीन बियाण्यांच्या रासायनिक बीजप्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच कामगंध सापळ्याचे महत्त्व उपस्थितांना सांगण्यात आले. दूध उत्पादक महिला शेतकऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते चारा पिकासाठी संकरित मका बियाण्यांचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत त्यांनी आंब्याचे रोपटेही लावले.

या कार्यक्रमाला प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी महादेव आसलकर, तालुका कृषी अधिकारी राहुल दिवाने, सरपंच भगीरथ लोमटे यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थित शेतकऱ्यांनी बदलत्या हवामानात अधिक सुरक्षित, शाश्वत आणि उत्पादनक्षम शेतीसाठी बीबीएफ तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# रत्नापूर येथे वॉटर प्लांट प्रकल्पाचे भूमिपूजन; ग्रामस्थांना मिळणार स्वच्छ पिण्याचे पाणी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ जुलै -**

परंडा तालुक्यातील रत्नापूर येथे वॉटर प्लांट प्रकल्पाच्या कामाचे भूमिपूजन दि. ३ रोजी उत्साहात पार पडले. स्वयंम शिक्षण प्रयोग संस्था आणि तोयम फाऊंडेशन यांच्या माध्यमातून जछत्रछ च्या सीएसआर निधीतून या प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे.

हा प्रकल्प स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नसीम शेख, जिल्हा समन्वयक किरण माने आणि तालुका समन्वयक शायदा मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे. स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेमार्फत परंडा तालुक्यातून रत्नापूर गावाची या प्रकल्पासाठी निवड करण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे ग्रामस्थांना स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून यासाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच गवळण देवकर यांनी पुढाकार घेतला आहे.

ग्राम पंचायतीच्या लोकवाट्यातून प्रकल्पासाठी पायाभरणी करण्यात येणार असून त्यानंतर संस्थेच्या वतीने पुढील जोडणीची कामे पूर्ण केली जाणार आहेत.

या भूमिपूजन कार्यक्रमास भाजपा नेते श्रीराम देवकर, ग्रामसेवक बालाजी माडजे, मुख्याध्यापक सुतार, नौशाद शेख, शिला राऊत, बाबुराव जतकर, चेतन जतकर, गणेश जहागीरदार, दिपक शेंडगे, प्रशांत देवकर, गोकुळ राऊत, राजकुमार गादिया यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरोग्य विभागातील कंत्राटी डेटा एन्ट्री ऑपरेटरांनी रोहित पवार यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जुलै -**

आरोग्य विभागातील विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये तसेच इतर शासकीय आरोग्य संस्थांमध्ये यशस्वी कंपनीमार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी डेटा एन्ट्री ऑपरेटर यांनी आपल्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी आमदार रोहित पवार यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, डेटा एन्ट्री ऑपरेटर हे आरोग्य विभागातील विविध ऑनलाइन पोर्टलवरील माहिती भरणे, रुग्णांची नोंद अद्ययावत ठेवणे, विविध योजनांचे ऑनलाइन कामकाज, दैनंदिन व मासिक अहवाल तयार करणे यासह आरोग्य यंत्रणेचे महत्त्वाचे काम सातत्याने पार पाडत आहेत. मात्र, अत्यल्प मानधन, मागील चार ते पाच महिन्यांपासून प्रलंबित वेतन आणि १२ महिने पूर्ण झाल्यानंतर सेवा समाप्त करण्याच्या पद्धतीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

कर्मचाऱ्यांनी आरोग्य विभागातील सर्व कंत्राटी डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचा राष्ट्रीय आरोग्य अभियान अर्थात राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये समावेश करावा, प्रलंबित मानधन तात्काळ अदा करावे, नोकरीची शाश्वती द्यावी, कामाच्या स्वरूपानुसार योग्य मानधन निश्चित करावे तसेच अनेक वर्षांपासून सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.

तसेच या सर्व प्रश्नांवर आगामी अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधून कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी विनंतीही आमदार रोहित पवार यांच्याकडे करण्यात आली आहे.

## आर्य चाणक्यचा प्रमोद गुरव ठरला शिष्यवृत्तीधारक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जुलै -**

धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयातील



इयत्ता पाचवी मध्ये शिकणारा प्रमोद प्रशांत गुरव हा विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक ठरला आहे.

राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या या परीक्षेत प्रमोद गुरव यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्याचे प्रशालेचे मुख्याध्यापक डॉक्टर मनीष देशपांडे आणि त्याला मार्गदर्शन करणारे शिक्षक शिक्षिका यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

# कात्राबादच्या संस्कृती देवकरचा राज्यात दुसरा क्रमांक; ‘इस्रो’ आणि ‘आयआयटी’ भेटीची संधी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ जुलै -**

तालुक्यातील कात्राबाद येथील विद्यार्थिनी संस्कृती समाधान देवकर हिने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत संपूर्ण जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. तिने उत्तुंग तेज बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेच्या गट (अ) अंतर्गत इयत्ता ८ वी ते १० वीच्या गुणवत्ता यादीमध्ये राज्यात द्वितीय क्रमांक मिळवत नेत्रदीपक कामगिरी केली आहे.

संस्कृतीच्या या घवघवीत यशामुळे तिला एक अत्यंत महत्त्वाची आणि अभिमानास्पद संधी मिळाली आहे. या गुणवत्ता यादीतील यशस्वी विद्यार्थ्यांना भारतीय अवकाश संशोधन संस्था आणि आयआयटी गांधीनगर यांसारख्या देशातील सर्वोच्च आणि उच्च तंत्रज्ञान संस्थांना भेट देण्यासाठी विनामूल्य अभ्यासदौऱ्यावर नेण्यात येणार आहे.

ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत संस्कृतीने मिळवलेले हे यश केवळ कात्राबाद गावासाठीच नव्हे तर संपूर्ण परंडा तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील देशातील सर्वोच्च संस्थांना जवळून पाहण्याची संधी मिळाल्याने तिच्यावर शिक्षक, ग्रामस्थ आणि नातेवाईकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यावेळी संस्कृती हिचा पंचायत समिती सभापती श्री. अण्णासाहेब जाधव, जिल्हा परिषदेचे माजी सभापती दत्ता अण्णा साळुंके, उद्योजक राजाभाऊ शेळके, पै. विशाल नाना देवकर, पंचायत समिती सदस्य तानाजी कोलते, उपसरपंच गणेश कोकाटे, कुमार वायकुळे, बालाजी नेटके, माऊली गोडगे, परसराम कोळी, अमोल गरड, श्रीमंत शेळके, सौदागर गरड, बालाजी नरसाळे, कोंडीराम कोकाटे, रोहित दोलतोडे यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच तिच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छाही देण्यात आल्या.

## संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान रखडले

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.४ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार योजना अंतर्गत देण्यात येणारे मासिक अनुदान गेल्या चार ते पाच महिन्यांपासून मिळाले नसल्याने लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. हे अनुदान तात्काळ वितरित करावे, या मागणीसाठी दिव्यांग बांधवांनी तहसीलदार तुळजापूर यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दैनंदिन उदरनिर्वाहासाठी या मासिक अनुदानाचा मोठा आधार लाभार्थ्यांना मिळत असतो. मात्र गेल्या चार ते पाच महिन्यांपासून अनुदान वितरित न झाल्याने अनेकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. तसेच प्रलंबित अनुदान तातडीने अदा करण्यात यावे, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

या निवेदनावर मनोज डोंगरे, बाळासाहेब बचाटे, लक्ष्मण पारध्ये, नवनाथ धुरगुडे, लहू डोंगरे यांच्यासह अनेक दिव्यांग बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# रुईभरच्या जयप्रकाश विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जुलै -**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत धाराशिव तालुक्यातील रुईभर येथील जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे.

इयत्ता पाचवीतील कुमार किरदत आयुष्य अमोल तसेच इयत्ता आठवीतील कुमारी माने अक्षरा रंजीत आणि कुमारी जगताप भैरवी शरद हे विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

या यशस्वी विद्यार्थ्यांना काकासाहेब डोंगरे, सचिन कांबळे, वसावे, अभिजित घोळवे, विनय सारंग आणि मोहन चव्हाण यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचा तसेच मार्गदर्शक शिक्षकांचा डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष (दादा) कोळगे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास आण्णा कोळगे, माजी ग्रामपंचायत सदस्य राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थित यावेळी होती.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व शेवटी उपस्थितांचे आभार सचिन कांबळे यांनी केले.

## मद्यपी चालकावर गुन्हा

**धाराशिव, दि.४ जुलै -**

मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविल्याप्रकरणी बालाजी सुभाष बेंडकाळे यांच्याविरुद्ध मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, त्यांनी बसवेश्वर चौक परिसरात एम एच-१३-व्ही-३७१८ क्रमांकाची मोटारसायकल मद्यधुंद अवस्थेत चालवून कायद्याचे उल्लंघन केल्याने कारवाई करण्यात आली.

# अणदूरमधील विविध प्रश्नांवर युवा ग्रामस्थ आक्रमक; १० जुलैला आंदोलनाचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.४ जुलै -**

अणदूर गावातील विविध प्रलंबित समस्या तातडीने सोडवाव्यात, या मागणीसाठी अणदूर युवा ग्रामस्थांच्या वतीने ग्रामविकास अधिकारी संजय माशाळे यांना निवेदन देण्यात आले. तसेच मागण्यांवर तात्काळ कारवाई न झाल्यास १० जुलै रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनात गावातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले आहे. यामध्ये अणदूर मुख्य प्रवेशद्वार आणि उड्डाण पुलाखालील परिसरातील अतिक्रमणे हटविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच गावातील शेतकऱ्यांना पाळीव डुकरांमुळे मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून पिकांचे नुकसान होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. काही लहान मुलांनाही डुकरांनी चावा घेतल्याच्या घटना घडल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. या समस्येवर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय श्री खंडोबा मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविणे तसेच गावातील कथित बेकायदेशीर दारू विक्री तात्काळ बंद करण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, या सर्व विषयांवर प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास १० जुलै २०२६ रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा युवा ग्रामस्थांनी दिला आहे.

यावेळी रवी मुळे, आण्णा महाराज घोडके, गणेश नरे, सुशांत राजमाने, राजकुमार गाढवे, संकेत चव्हाण यांच्यासह अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# आपदा मित्र नेटके यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ जुलै -**

आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल आपदा मित्र नेटके जी. व्ही. यांचा धाराशिव येथे प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर आणि तहसीलदार तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रकाश व्हटकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

आपदा मित्र ही संकल्पना आपत्कालीन किंवा नैसर्गिक संकटांच्या काळात स्थानिक पातळीवर मदतकार्य करणाऱ्या प्रशिक्षित स्वयंसेवकांशी संबंधित आहे. पूर, भूकंप, दरड कोसळणे किंवा आग यांसारख्या आपत्तीच्या वेळी सरकारी यंत्रणा किंवा बचाव पथके घटनास्थळी पोहोचेपर्यंत हे स्वयंसेवक

### तरुण पिढीला प्रशिक्षणासाठी आवाहन




‘प्रथम प्रतिसादक’ म्हणून नागरिकांना मदत करतात. या योजनेअंतर्गत १८ ते ४५ वयोगटातील युवक-युवती आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे १२ दिवसीय निवासी प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या स्वयंसेवकांना आपत्कालीन प्रतिसादासाठी आवश्यक ‘इमर्जन्सी रिस्पॉन्डर किट’ उपलब्ध करून दिले जाते. तसेच त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने जीवन व वैद्यकीय विमा संरक्षणही देण्यात येते.

दरम्यान, धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त अथवा आपत्ती संभाव्य गावांतील इच्छुक युवक-युवतींनी नैसर्गिक आपत्ती विभाग, धाराशिव येथे नावनोंदणी करून प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आपदा विभागाचे अविनाश हाजगुडे यांनी केले आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## २७ वर्षीय आरोपीवर हद्दपारीची कारवाई

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ४ जुलै : लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशान्वे सराईत गुन्हेगारांच्या गैरकृत्यांवर प्रभावी प्रतिबंध घालण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत सातत्याने प्रतिबंधात्मक कारवाया राबविण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर हद्दीतील गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार अभिषेक अशोक जावके (वय २७ वर्षे, रा. गायत्रीनगर, लातूर) याच्याविरुद्ध हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे.

या आरोपीचा हद्दपारीची प्रस्ताव तयार करून तो उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, लातूर यांच्याकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची छाननी करून उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, लातूर यांनी संबंधित इसमास लातूर जिल्हा तसेच लातूर तालुक्यास लागून असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव व कळंब तालुक्यांच्या हद्दीतून हद्दपार करण्याचा आदेश पारित केला.ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सफौ. संजय फुलारी, पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे, बालाजी कोतवाड, प्रशांत ओगले, अंकुलगे, माने, शिंदे यांनी पार पाडली.



## विविध वृत्त...

### ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना वरिष्ठ पदाची वेतन श्रेणी लागू



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : लातूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांना शासन निर्णय दि. २ मार्च २०१९ अन्वये सुधारित सेवांतर्गत आश्र्वासित प्रगती योजनेचा १०, २०, ३० वर्षाच्या सेवेनंतर अनुक्रमे पहिला, दुसरा आणि तिसरा लाभ देण्यात येतो. तसेच शासन निर्णय दि. २४ सप्टेंबर २०२४ अन्वये ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी ही दोन्ही पदे एकत्रित करुन त्यांना ग्रामपंचायत अधिकारी असे नामाभिदान करण्यात आले असुन पहिला लाभ एस-१४ विस्तार अधिकारी, दुसरा लाभ सहाय्यक गटविकास अधिकारी एस-१५, तिसरा लाभ गटविकास अधिकारी एस-२० असे करण्यात आले आहे. त्याचबरोबर शासन निर्णय दि. २ जुन २०२५ आणि दि. १३ ऑक्टोबर २०२५ अन्वये काल्पनिक रित्या वरीष्ठ पदाची सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यात आली आहे.

त्यानुसार लातुर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मिना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजेंद्र नागणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम वाखर्डे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, सर्व कक्षअधिकारी यांच्या सर्वांच्या अभ्यास पूर्ण मार्गदर्शनाने ग्रामपंचायत अधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मिना यांच्या स्वाक्षरीने सुधारीत वेतनस्तर लागु करण्याचे आदेश दि. २५ जुन रोजी

निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार लातुर जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांना यांचा लाभ होणार आहे. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत युनियन डी.एन. ई.१३६ जिल्हा शाखा लातूरच्या वतीने सर्व अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सी. ए. फाऊंडेशन विद्यार्थ्यांचे यश

तभा वृत्तसेवा

लातूर दि.४ जुलै : दयानंद वाणिज्य कनिष्ठ अंतर्गत महाविद्यालय, लातूर राबविण्यात येणाऱ्या सी.ए. व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांनी मे २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या सी.ए. फाउंडेशन परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण परंपरेला पुन्हा एकदा उजाळा दिला आहे. आज जाहीर झालेल्या निकालात महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रथमेश मोगल याने ४०० पैकी ३४६ गुण मिळवत देशात १६ वा क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

याशिवाय अर्पिता भराडिया २७२, अपूर्वा तुरे २७१, तनीश अग्रवाल २६३, अश्र्विन बजाज २५१, मृगनयनी औरादे २४७, मयुरी सोनवणे २३६, सावंत रोहित २२१, बिरादार श्रेया २१०, महेश हरडे २०४ आणि प्रीती राठी २०१ यांनीही उत्तम गुणांसह परीक्षा उत्तीर्ण होत महाविद्यालयाच्या यशस्वी परंपरेत भर घातली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, विशाल लाहोटी, प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख, डॉ. सुभाष मोरे, प्राचार्य डॉ. मान्नीकर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## मनपा आयुक्त पोहोचले कचरा डेपोवर



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : लातूर शहर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी शुक्रवार दि. ३ जुलै रोजी वरवंटी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट देऊन पाहणी केली. मनपा शाळेलाही त्यांनी भेट दिली.

आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी गुरुवारी लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला आहे. दुसऱ्याच दिवशी त्यांनी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट देऊन माहिती घेतली. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून तयार केलेले कंपोस्ट खत तसेच सुका कचरा प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प व जुन्या साठलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पांचीही त्यांनी माहिती घेतली. यावेळी कचरा व्यवस्थापन व प्रक्रिया करण्यासाठी

पूर्णपणे विलगीकृत कचरा येणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. या प्रक्रियेत काम करत असताना कर्मचाऱ्यांनी पूर्णपणे किटचा वापर करावा, असा आदेशही त्यांनी दिला. याप्रसंगी मनपा उपायुक्त वसुधा फड, कनिष्ठ अभियंता गणेश देवणीकर, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प प्रमुख धोंडीबा सोनवणे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

आयुक्तांनी शहरात मनपाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले मनपा शाळा क्र. ९ ला भेटी दिली. तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मनपा शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना संदर्भात त्यांनी चर्चा केली. आयुक्तांनी पदभार स्वीकारल्यानंतर लागलीच विविध ठिकाणी भेटी देऊन कामकाजाची माहिती घेत आहेत.

## अंधाराचा फायदा घेत चालक फरार
## सव्वा लाखाचा प्रतिबंधित गुटखा जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : राज्यात प्रतिबंधित गुटख्याची अवैध वाहतूक व विक्री रोखण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाने सुरू केलेल्या विशेष मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत १ लाख २० हजार ३२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली कार असा ४ लाख ७० हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांची चाहूल लागताच वाहनचालकाने कार रस्त्याच्या कडेला सोडून अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला. त्याचा शोध सुरू असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशानुसार तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान दि. २ जुलै २०२६ रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक देवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वलांडी येथे गस्त घालत असताना गुप्त माहितीदारामार्फत महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा मारुती सुझुकी सेलेरिओ (एमएच ०४ केएल १३७२) या कारमधून विक्रीसाठी आणला जात असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने वलांडीझदवणहिप्परगा मार्गावरील सापळा रचला. रात्री सुमारे १०.१० वाजण्याच्या सुमारास संशयित वाहन दिसताच पोलिसांनी ते थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांची उपस्थिती लक्षात येताच चालकाने कार रस्त्याच्या कडेला उभी करून अंधाराचा फायदा घेत शेतामध्ये पळ काढला.

पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता वाहनात महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेला मोठ्या गुटखा साठा आढळून आला.

### फत्तेपूर येथे सहकारी संस्थेच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा

औसा दि.४ जुलै : जागतिक सहकार दिनानिमित्त औसा तालुक्यातील फत्तेपूर येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते शनिवार दि.४ रोजी करण्यात आले.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले,ग्रामस्थांची स्वतंत्र सहकारी सोसायटी असावी, ही अनेक वर्षांपासूनची प्रामाणिक मागणी आज पूर्ण झाली आहे. यापूर्वी गाव दुसऱ्या गावातील सहकारी संस्थेशी संलग्न असल्यामुळे नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. आता स्वतंत्र सहकारी संस्था सुरू झाल्यामुळे गावाच्या विकासाला चालना मिळण्याबरोबरच शेतकरी आणि सभासदांची कामे अधिक सुलभ होणार असल्याचा विश्र्वास व्यक्त करण्यात आला.ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी तसेच शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या प्रगतीसाठी सहकार चळवळीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद करत, नव्या कार्यालयाच्या माध्यमातून फत्तेपूर व परिसराच्या विकासाला नवे बळ मिळेल, असा आशावाद आ. पवार यांनी व्यक्त केला.

अध्यक्ष व्यंकटराव पाटील, प्रविण फडणीस, औसा सहनिबंधक रमेश सगर, सहकार अधिकारी व्ही. एम. बोरफळकर, मारुती महाराज का. संचालक शामराव पाटील, सुभाषराव जाधव, औसा पंचायत समिती सदस्या सुकेशना श्रीधर पाटील, फत्तेपूरच्या सरपंच अनिता बलभीम माळी, सोसायटीचे चेअरमन ज्योतिराम साळुंखे, उपाध्यक्ष अनंत पवार, सचिव बलभीम एकंडे, माजी उपाध्यक्ष श्रीराम पाटील, नागरसोगाचे चेअरमन यशवंत शिंदे, शिरोडकर जाधव, सदाशिव जोगदंड, विश्र्वंभर धानूरे, चतुर्भुज जाधव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर फत्तेपूर येथील श्री नरसिंह मंदिरास भेट देऊन दर्शन घेत मंदिर परिसरातील सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करण्यात आली. ग्रामस्थांच्या मागणीनुसार मंदिर परिसरात सभागृह उभारण्यासाठी मूलभूत सुविधा (२५/१५) योजना निधीतून सुमारे ३० लाख रुपयांच्या कामास दोन टप्प्यांत मंजुरी देण्यात आली असून हे काम सध्या प्रगतीपथावर आहे. पाहणीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

## महावितरणचे नागरिकांना आवाहन । खबरदारी हीच सुरक्षा
## पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी सतर्क रहा!



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै :पावसाळ्यात पाऊस व वादळी वाऱ्यामुळे महावितरणच्या वीजयंत्रणेला मोठा फटका बसत असतो. विजेच्या तारा तुटने, विजेचे खांब कोसळणे, रोहित्र कोसळणे त्याचबरोबर करंट उतरणे अशा घटना घडत असतात. अशावेळी काही प्रसंगी दुर्घटनाही घडतात. त्यामुळे पावसाळ्यात होणारे संभाव्य विद्युत अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेचे सर्व नियम पाळण्याचे व खबरदारी घेण्याचे आवाहन महावितरणने नागरिकांना केले आहे.

मुसळधार पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे तुटलेल्या फांद्या वीज वाहीनीच्या तारांवर अडकून पडल्या असल्यास त्या स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. तसेच झाडे पडल्याने वीजखांब वाकला वा मोडला जातो. परिणामी वीजतारा तुटण्याचे प्रकार घडतात.

त्यात वीजप्रवाह असण्याची शक्यता असल्याने अशा तुटलेल्या, लोंबकळणाऱ्या वीजतारांपासून सावध राहावे. या तारांना हात लावण्याचा किंवा हटवण्याचा प्रयत्न करू नये आणि त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. घरात बसवलेल्या मीटरवर पाणी पडत असल्यास किंवा मीटर असलेली भिंत ओली असल्यास त्वरित महावितरणशी संपर्क साधावा. विजेच्या पोलला हात लावू नये. खांबाच्या स्टेवायरला गुरे-ढोरे बांधू नयेत तसेच कपडे वाळत घालण्यासाठी स्टेवायरचा वापर करू नये. घरामध्ये असलेली विद्युत यंत्रणा व घराजवळ असलेली अर्थिंग मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून तपासून घ्यावी. अपार्टमेंटच्या मीटर बॉक्सची स्वच्छता राखावी भिंतीमध्ये पाणी मुरणार नाही याची काळजी घ्यावी.

स्वीच बोर्डापासून मोटारीपर्यंत जाणाऱ्या वायरला जोड देऊ नये. घरात शॉर्टसर्किट झाल्यास मेन स्वीच तत्काळ बंद करावा. घरावरील दूरचित्रवाणीची डिश किंवा अँटेना वीज तारांपासून दूर ठेवावा. ओल्या कपड्यांवर विजेची इस्त्री फिरवू नये. विजेचे स्वीच बोर्ड किंवा कोणत्याही उपकरणाला पाणी लागणार नाही याची दक्षता घ्यावी. विशेषतः टिन पत्र्यांच्या घरात राहणाऱ्या नागरिकांनी

पावसाळ्यात अतिदक्ष राहून विजेपासून सुरक्षित राहण्यासाठी उपाययोजना कराव्यात. अशा प्रसंगी खबरदारीचा उपाय म्हणून रोहित्र आणि फिडर बंद करण्यात येतो. त्यामुळे वीजपुरवठा काही कालावधीसाठी बंद होतो. अशा स्थितीत संभाव्य धोका टाळण्यासाठी नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे.

शहरी व ग्रामीण भागातील वीजग्राहकांना खंडित वीजपुरवठ्याची माहिती देण्यासाठी वा तक्रारीसाठी २४ तास सुरू असणाऱ्या कॉल सेंटरवर संपर्क करता येईल. टोलफ्री क्रमांकाद्वारे केलेल्या सर्व तक्रारी सीआरएम सॉफ्टवेअरमध्ये नोंदविल्या जातात आणि निपटारा करण्यासाठी एसएमएस पाठवून संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्याला देण्यात येतात. यासाठी ग्राहकांनी १९१२,१८००२१२३४३५, किवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, तसेच लातूर जिल्हयाच्या ७८७५७६२०२१ या सनियंत्रण कक्षाच्या मोबाईल क्रमांकावरती संपर्क साधावा सदरील क्रमांकावरती व्हॉटसअॅप सेवाही कार्यरत असल्याने टेक्स्ट मेसेजसह तक्रारींशी निगडीत फोटोही वीजग्राहकांना शेअर करता येणार आहेत.

## रजिस्ट्री कार्यालय परिसरातील अतिक्रमण काढले



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : लातूर शहर महानगरपालिका अतिक्रमणविरोधी पथक, महसूल विभाग आणि पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई करीत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील जुने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागील रजिस्ट्री कार्यालयाच्या परिसरातील अतिक्रमण दि. ३ जुलै रोजी पुन्हा एकदा काढण्यात आले. यामुळे रजिस्ट्री कार्यालय परिसरात एकच खळबळ उडाली होती.

सरकारला मोठा महसूल मिळवून देणाऱ्या या परिसरात दोन रजिस्ट्री (नोंदणी) कार्यालये आहेत. या कार्यालयांच्या परिसरात मोठ्याप्रमाणात मुद्रांक विक्रेते, बॉण्ड रायटर यांनी टपऱ्या टाकुन,

टेबल मांडून अतिक्रमण केले होते. काहींनी तर वाहनाच्या पार्कींग शेडमध्येही अतिक्रमण केले होते. याच परिसरातील मोकळ्या जागेत चहा, नाष्टा इतकेच नव्हे तर शासनाने प्रतिबंध केलेला गुटखासुद्धा विकला जात होता. सुमारे ३-४ महिन्यांपुर्वी महानगरपालिकेने हेच अतिक्रमण काढले होते. परंतु, थोडा कालावधी जाताच पुन्हा पुर्वीप्रमाणेच अतिक्रमण झाले.

अतिक्रमण पुन्हा वाढल्याचे येताच लातूर शहर महानगरपालिका अतिक्रमणविरोधी लक्षात पथक, तहसील कार्यालय लातूर व पोलिस विभागाने संयुक्त कारवाई करीत हे अतिक्रमण काढले. या परिसरात अक्षरशः मुद्रांक विक्रेत्यांनी अनधिकृतपणे पत्र्यांचे शेड मारले होते. जेसीबीच्या सहाय्याने पत्र्याचे सुमारे २० शेड उध्वस्त करण्यात आले. गेल्या काही दिवसांत मुद्रांक

आहेत. चहा, नाष्टा, पान, तंबाखू, गुटखा, सिगारे सर्वच या ठिकाणी मिळते. शासनाच्या जागेवरच शासनाने प्रतिबंध केला गुटखा विकला जातो आहे. त्याचा त्रास शासकीय कार्यालयात कामासाठी आलेल्या नागरिकांना होतो आहे.

विक्रेत्यांच्या दुकानांवर अशी कारवाई करण्यात आलेली आहे. वारंवार होत असलेल्या अशा कारवायांमुळे मुद्रांक व्यवसायिक संभ्रमात आहेत. प्रशासकीय इमारतीच्या परिसरात छोटे-छोटे हॉटेल्स मोठ्या प्रमाणात

रजिस्ट्री कार्यालयाच्या परिसरातील अतिक्रमण दोनवेळा काढण्यात आले आहे. मुद्रांक विक्रेत्यांनी त्यांना दिलेल्या जागेवरच आपला व्यवसाय करावा. या पुढे या जागेवर अतिक्रमण होऊ देणार नाही. झाले तर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा तहसीलदार सौदागर तांदळे यांनी दिला आहे.

## लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीचा पदग्रहण सोहळा दिमाखात



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जुलै : लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवारी एमआयडीसी येथील हॉटेल आरोमा येथे अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात पार पडला. लायन्स क्लबच्या ध्वजवंदनाने आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी इन्स्टॉलेशन ऑफिसर पीडीजी लायन दिलीप मोदी नांदेड यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. माधवराव गव्हाणे उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष अनिलकुमार झंवर, सचिव ईश्र्वरप्रसाद व्ही. चांडक आणि कोषाध्यक्ष संजय एन. राजुळे यांनी आगामी कार्यकाळात शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, रक्तदान, नेत्रतपासणी, युवा विकास तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमास पी. विवेकानंद, डॉ. अजय नारायणकर, शरद मोरे, नागनाथ गित्ते, कृषि उत्पन्न बाजार समिती उदगीरचे सभापती शिवाजी हुडे, सत्यनारायण सोनी, ओमजी लोया, गिरीश गर्थे, भालचंद्र रामदास, राजकुमार मुंडडा, जयप्रकाश खटोड, धीरज पलोड, सुरज मुंडडा, राम कांबळे, आनंदशेठ बहेती, महेंद्र दुर्गकर, बंकट भांगडिया, श्रीनिवास जाजू, बाबा भांगडिया, अरविंद लखोटिया, सुनील बेडमुथा, सिद्रामप्पा चाकोते, हरिभाऊ साबदे, सुनील झंवर आदी उपस्थित होते.